# अनुक्रमणिका


**4**
प्रारंभिक
मानसिकता पुनरागमाची
– जयंत पाटील

**5**

प्रबंध संपादकीय
अहिंसेची ऐसीतैशी
– दिलीप वळसे पाटील

**6**


संपादकीय
अकलेचे दिवाळे!
– डॉ. सुधीर भोंगळे

**12**


शेतकरी व कामगारांच्या आंदोलनाला राष्ट्रवादीचा पाठिंबा
– शरद पवार यांची पत्रकार परिषद

**24**

कायदा धाब्यावर बसवणारे शासन आणि शासक?
– अवलोकितेश्वर


**32**

करू भागवत धर्म...
– अभय टिळक

**44**

लडाख पेच दीर्घकाळ चालणार?
– गहिनीनाथ

**54**

सरकारचे लज्जाहीन आचरण
विधेयकांच्या मंजुरीचा सपाटा
– **आकाश,** नवीदिल्ली (वार्तापत्र)

**66**

महात्मा गांधींजींची आत्मकथा, महाराष्ट्र व महाराष्ट्रीयन नेतृत्व
– प्रा. गणेश राऊत

**72**

बिहारची रंगतदार लढत : भाजप दुहेरी भूमिकेत!
– तथागत


**80**

पुष्पाबाई : परखड व ठाम विचारवंत
– डॉ. विद्युत भागवत

**84**

कानोकानी
(राजकीय विनोदी हलके-फुलके किस्से)
– घंटाकर्ण

**100**
‘एलजीबीटी’च्या राज्यप्रमुखपदी प्रिया पाटील यांची नियुक्ती

**101**

शेवटचे पान-
अजरामर ग.दि. माडगूळकर
– हेमन्त टकले









**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
वार्षिक रु. ५००/-
वर्गणीचा धनादेश
‘हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.’
या नावाने काढावा.
www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध
**छायाचित्रे**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी **‘हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.’** च्या वतीने मीडिया आर अ‍ॅण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.



राष्ट्रवादी
स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

## प्रारंभिक



# मानसिकता पुनरागमनाची

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. रोज खूप मोठ्या संख्येने प्रवेशाचे कार्यक्रम होताहेत आणि आम्ही देखील या प्रवेश करणाऱ्या नेते, कार्यकर्त्यांचे मनापासून स्वागत करतो आहोत. यातले काही लोक पूर्वी आमच्या बरोबरच होते. आम्ही एकत्र पक्षात आणि सभागृहातही काम केले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काही सत्तेवर येणार नाही असा समज वा भावना निर्माण झाल्यामुळे काहीजण आम्हाला सोडून गेले. निवडणुकीच्या अगोदर जाणाऱ्यांची संख्या बरीच होती. त्यातल्या काही जणांना जनतेने पराभवाची वाट दाखविली. काहीजण विजयी झाले पण विरोधात बसायची पाळी आली म्हणून दु:खी कष्टी झाले आहेत. आता यातले अनेकजण पश्चात्तापाची भावना व्यक्त करुन पुन्हा राष्ट्रवादीत येण्यास इच्छुक आहेत. अनेकांची आता परत मा. शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची मानसिकता दिसते आहे. तशी ती त्यांनी व्यक्तही केली आहे. शेवटी राजकारण हे बेरजेचे करायचे असते हे मा. यशवंतराव चव्हाण साहेबांनी आपल्या सर्वांना शिकविले आहे. त्याच मार्गावरुन मा. पवार साहेब आयुष्यभर वाटचाल व मार्गक्रमणा करीत आले आहेत. भागाकार व वजाबाकीचे राजकारण फार काळ टिकत नाही. त्यामुळे राजकीय पक्षाची व नेत्यांचीही वाढ होत नाही, उलट घटच होते. म्हणून चांगले लोक पक्षात यावेत व जाणीवपूर्वक आणावेत असा आपला प्रयत्न असतो. पक्ष बळकट करण्याची इच्छा बाळगून तो मोठा करण्यासाठी आपण जे विविध कार्यक्रम राबवितो त्यातलाच हा एक उपक्रम समजायला हरकत नाही.

राजकारणात शेवटी संख्याबळाला जास्त महत्व असते. संख्या बरोबर व जास्तीची असेल तरच राजकीय प्रगती साधता येते. अन्यथा १०५ जागा मिळूनही व सर्वाधिक आमदार पक्षाचे निवडून आलेले असतानाही विरोधात बसण्याची वेळ येते हे महाराष्ट्रातील भाजपच्या स्थितीवरुन आपल्या लक्षांत आलेच असेल. महाआघाडी सरकारमध्ये सहभागी झालेल्या तीनही पक्षांनी एकजुटीने आपले बळ उभे केले. त्यामुळे भाजपच्या मस्तीचा नांगा मोडला आणि तो मोडावा हेच जनतेच्या **(पान ९८ वर)**



प्रबंध संपादकीय



# अहिंसेची ऐसीतैशी

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५१ वी जयंती आपण नुकतीच साजरी केली. संयुक्त राष्ट्र संघटनेने महात्मा गांधींचा जन्मदिवस म्हणजे २ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून घोषित केला आहे. संघटनेचे महासचिव अंतोनिओ गुटेरस यांनी मानवी प्रतिष्ठा, सुरक्षेची समानता आणि सर्व संप्रदायांचे शांततामय सहजीवन याचे महत्व अधोरेखित करुन यंदाच्या या खास दिवशी अहिंसा आणि शांततामय आंदोलनांच्या प्रभावीपणावर भर दिला आहे. याच दिवशी भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने ''आदरणीय बापूंचे जीवन आपल्याला आठवण करून देते की, आपण याची खात्री करावी की आपले प्रत्येक कार्य अशा प्रकारे करावे की त्यामुळे गरिबांना आणि वंचितांना लाभ होईल...,'' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विधान आवर्जून उद्‌घृत करीत सर्व वर्तमानपत्रांमध्ये देशाचे दोन महान सुपुत्र असलेल्या महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त राष्ट्राकडून आदरांजली वाहणारी जाहिरात दिली आहे. योगायोगाची आणखीन एक गोष्ट म्हणजे महात्म्यांच्या जयंतीच्या आदल्याच पूर्वसंध्येला हाथरस पिडीत तरूणीवर १४ सप्टेंबरला जो बलात्कार होऊन त्यात तिचे निधन झाले होते, त्या पीडित तरुणीच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी निघालेल्या काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांना उत्तर प्रदेशच्या पोलिसांनी धक्काबुक्की व मारहाण केली आहे. त्यात ते खाली पडले. तसे घडल्याने पोलिस आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली. त्यांना नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. राहुल गांधी यांच्याबरोबरच काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी-वढेरा यांनाही पोलिसांनी रोखून ताब्यात घेतले. याबाबतची सर्व चित्रे आपण प्रसार (पान ९९ वर)



संपादकीय



# अकलेचे दिवाळे!

कृषि उत्पन्न बाजार समितीचा कायदा महाराष्ट्रात १९६३ साली लागू झाला. पण तत्पूर्वीही बाजार समित्या अस्तित्त्वात होत्या. अगदी १८८५ मध्ये सुद्धा काही बाजार समित्या स्थापन झाल्या होत्या. जळगाव जिल्ह्यातल्या बोदवड बाजार समितीला आता शंभर वर्षे उलटून गेली आहेत. अर्थात त्याकाळी त्यांना वेगळ्या नावाने संबोधले जायचे. कापूस हाच एकमेव माल बाजारात त्याकाळी विक्रीला यायचा. म्हणून खानदेश व विदर्भात त्यांना 'कॉटन मार्केट' म्हणायचे. आजही विदर्भात काही ठिकाणी तेच नाव प्रचलित आहे. प्रामुख्याने सावकारांच्या छळ व पिळवणुकीतून शेतकऱ्यांची सुटका व्हावी या मूळ उद्देशाने त्यावेळी बाजार समित्यांचा ढाचा उभा करण्यात आला. कारण सावकार व्याज व मुद्दलापोटी शेतकऱ्याचा उत्पादित झालेला सगळा माल उचलून न्यायचे. तो रोजच्या अन्नाला मोताद व्हायचा. कष्ट करूनही उपासमारीचा सामना तो अनुभवित होता. त्यामुळे त्याचा जो श्वास गुदमरत होता त्यातून मोकळीक मिळावी या हेतूने मुख्यत्वे तीन गोष्टी समोर ठेवून कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा सांगाडा उभा करण्यात आला.

पहिली गोष्ट, शेतकऱ्याच्या मालाचे अचूक वजन झाले पाहिजे. त्याला वजनात कोणी मारता किंवा फसवता कामा नये. दुसरी गोष्ट, शेतकऱ्याला मालाचे पैसे २४ तासाच्या आत मिळाले पाहिजेत आणि तिसरी गोष्ट, शेतकऱ्याच्या मालाची विक्री स्पर्धात्मक पद्धतीने म्हणजे लिलावाद्वारे झाली पाहिजे. ज्यामुळे मालाचे भाव चढते राहून रास्त किंमत शेतकऱ्याला मिळू शकेल. या तीनही उद्दिष्टांची पूर्ती कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या स्थापनेमुळे होऊ शकली हे निर्विवाद सत्य आहे. किंबहुना त्याचमुळे आज बाजार समित्या टिकून राहिल्या आहेत ही वस्तुस्थिती आपण मोकळेपणाने मान्य केली पाहिजे. याचा अर्थ बाजार समित्यांमध्ये दोष नाहीत असा नाही. त्या पूर्ण निर्दोषी वा दोषमुक्त आहेत असेही नाही. पण बाळाने मांडीवर घाण केली म्हणून आई मांडी कापून टाकत नाही. घाण योग्य जागी टाकून ती आपले व बाळाचे कपडे बदलते, स्वच्छ धुते. बाजार समित्यांमध्ये जे दोष आहेत, घाण झालेली आहे ती धुण्याचा कार्यक्रम हाती न घेता सरकार बाळाची आणि आईचीही मांडी कापायला निघालेले आहे असे केंद्राच्या नवीन कृषी पणन कायद्याचे स्वरुप आहे. नीट बारकाईने पाहिले तर आपल्या लक्षात येईल की बाजार समित्या स्थापन झाल्यापासून खरेदीदाराने किंवा व्यापाऱ्याने वजनात लुटले अशी तक्रार कधीही आलेली नाही. शेतकऱ्याला मालाचे पैसे मिळायला कदाचित उशीर झाला असेल पण बाजार समितीच्या आवारात विक्री झालेल्या मालाचे पैसे बुडाले असेही घडलेले नाही. शिवाय खुल्या पद्धतीने म्हणजे लिलावाद्वारे माल विकला गेला तरच भाव जास्त मिळतो याचा अनुभव शेतकऱ्यांनी घेतलेला आहे आणि आजही घेत आहे.

## दोषांचे निर्मूलन अशक्य नव्हते पण...

खरेदीदार, व्यापारी, आडत्या किंवा दलाल, हमाल माथाडी, वाहतुकदार आणि शेतकरी असे बाजार समितीचे पाच मुख्य घटक आहेत. शेतकरी हा असंघटित आहे. तो वेगवेगळ्या भागातून माल घेऊन येतो. कालांतराने असे घडले की शेतकरी सोडून बाकी सर्व घटक संघटीत झाले. त्यामुळे व्यवस्थेत जास्तीची आडत कापणे, हमाली-तोलाई चढती राहणे, काही खर्च लावणे, कट्टी लावणे म्हणजे मालाच्या वजनात मारणे, हातावर रुमाल टाकून बोटे दाबणे व भाव निश्चित करणे ज्याला हत्ता पद्धत म्हणतात यासारखे काही दोष शिरले. हे दोष दूर करणे सरकारला अशक्य होते अशातला काही भाग नाही. त्यांनी मनावर घेतले असते आणि शुद्ध भावनेने कायद्याची कडक अंमलबजावणी केली असती तर हे सर्व दोषही नष्ट करता आले असते. यात खूप मोठी व महत्त्वाची जबाबदारी बाजार समित्यांच्या संचालक मंडळाने पार पाडणे अभिप्रेत होते. हे सगळे संचालक शेतकरी आहेत व शेतकऱ्यांची मुले आहेत. शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून ते पाच वर्षांसाठी संचालकपदी निवडून येतात. पाच वर्षांनी ते बदलतात. इतर घटक मात्र तिथे कायमचे ठाण मांडून बसलेले आहेत. त्यामुळे त्यांचे प्राबल्य आणि मक्तेदारी निर्माण होऊन

ज्यांच्या हितासाठी बाजार समित्या काढल्या तो शेतकरी घटक मात्र दुर्लक्षित व उपेक्षित राहिला आहे. संचालक मंडळाची कर्तव्यच्युती आणि पाप आज शेतकऱ्यांना भोगावे लागते आहे. हे शब्द थोडे कठोर असून काहींना ते बोचण्याची वा टोचण्याची शक्यता आहे. पण सत्य नेहमीच कटू असते आणि साधे नसते.

## पापाचे खापर समितीच्या नावावर

या पाचही घटकांच्या कारभाराचे खापर सरकार बाजार समिती नावाच्या संस्थेवर वा संरचनेवर फोडू पाहते आहे. या सर्व गैरगोष्टींचे मूळ बाजार समित्यातच आहे अशी धारणा किंवा चुकीचा गैरसमज सरकारने करवून घेतला आहे आणि त्यामुळे ते या बाजार समित्याच मोडायला, बरखास्त किंवा उध्वस्त करायला निघाले आहेत. यात राजकारणाचाही भाग काहीसा निश्चित आहे. कारण या संस्था केंद्र सरकार ज्या पक्षाचे व विचारसरणीचे आहे त्या पक्षाच्या व विचारांच्या लोकांच्या हाती नाहीत. त्यामुळे 'तुला न मला घाल कुत्र्याला' अशी अवस्था करण्याच्या मागे ते लागले आहेत. बाजार समितीतल्या सत्तेचा मलिदा भाजपाच्या नेत्यांनाही चाखण्याची वारंवार अनावर उर्मी होते. पण समित्या आपल्या पक्षाच्या ताब्यात नाहीत हेच त्यांचे मोठे दुःख व शल्य आहे. म्हणूनच ऐनकेन प्रकाराने त्या ताब्यात घेण्याचा अट्टाहास भाजप नेत्यांनी चालविलेला आहे. श्री. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक कृषि उत्पन्न बाजार समित्या बरखास्त करुन त्या ठिकाणी भाजप कार्यकर्त्यांची प्रशासकीय मंडळात वर्णी लावली होती. हे प्रशासकीय मंडळ काही प्रामाणिकपणाने शेतकऱ्यांची सेवा करेल व त्यांना न्याय मिळवून देईल अशी अपेक्षा होती. पण त्यांची अवस्था 'कधी ना मिळलं, पटकन गिळलं' अशी असल्यामुळे बोक्यांनी हाणला हो हाणला, उघड लोण्याचा गोळा हेच चित्र सर्वांना पाहायला मिळाले. प्रशासक मंडळाने ज्या बाजार समित्या धुवून काढल्या आणि भ्रष्टाचाराचे सचेल कंठस्नान केले त्याची एकदा डोळे उघडे ठेवून जाहीरपणे चौकशी करा. म्हणजे भाजपचे दाखवायचे आणि खाण्याचे दात किती वेगवेगळे आहेत हे पुन्हा एकदा सिद्ध होईल. अर्थात सध्या अनेक घटनांमधून ते वारंवार सिद्ध होतच आहे. 'मी नाही त्यातली आणि कडी लावा आतली' असाच हा प्रकार आहे.

केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने कृषि उत्पन्न बाजार समित्या ही 'दुकानदारी' आहे. त्यांना ती बंद पाडायची आहे. त्यामुळे ते दोषांचे निर्मूलन किंवा उच्चाटन करण्याचा विचारच करीत नाहीत. ते सरळ म्हणा किंवा अप्रत्यक्षरीत्या म्हणा संस्थांचा मुडदा पाडण्याचीच भाषा करुन त्या दृष्टीने व त्या दिशेने धोरणांची रचना करताना दिसताहेत. संसदेमध्ये कोणतीही चर्चा न करता अत्यंत घाईघाईने केंद्र सरकारने जी कृषि क्षेत्राशी संबंधित अशी तीन विधेयके आणून मंजूर करुन घेतली आणि राष्ट्रपतींची लगेच त्यावर सहीही घेऊन कायदा पारित केला व त्याच्या अंमलबजावणीचा त्वरित लेखी आदेश काढून तो राज्यांना पाठविला. महाराष्ट्रातील महाआघाडी सरकारने या आदेशाला स्थगिती दिलेली असली तरीही तेवढ्याने प्रश्न सुटणार नाही. केंद्र सरकारच्या या निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या समस्या आणि हालअपेष्टांमध्ये आणखीन वाढच होण्याची भिती व शक्यता आहे. त्यामुळे केंद्राच्या आदेशाला नुसती केराची टोपली दाखवून उपयोगी नाही. त्या आदेशाला पुरते गाडले पाहिजे पण त्याच वेळी बाजार समित्यांच्या कारभारात जे अनेक दोष व गैरव्यवहार शिरले आहेत त्यांचेही समूळ उच्चाटन करण्याचा कार्यक्रम राज्य सरकारने हाती घेतला पाहिजे. अन्यथा शेतकऱ्यांच्या दृष्टीने केंद्र आणि राज्य ही दोन्ही सरकारे पुतना मावशीच्याच भूमिकेत राहतील. असो.

## समस्यात नव्याने भरच पडेल

आता या बिलामुळे जे प्रश्न नव्याने निर्माण होणार आहेत त्यांच्याकडे वळतो. महाराष्ट्रात आज जवळपास ३०० कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत व सातशे उपबाजार आहेत. या सर्वांनी मिळून जवळपास ५० ते ७५ हजार कोटी रुपयांची मालमत्ता निर्माण केलेली आहे. हे इन्फ्रास्ट्रक्चर ही राष्ट्रीय संपत्ती आहे आणि ती शेतकऱ्यांनी दिलेल्या करातून, शेसमधून म्हणजे एक प्रकारे त्यांच्या कष्ट व घामातून उभी राहिलेली आहे. कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या आवार व उपआवारांमध्ये माल विक्रीसाठी जे ओटे किंवा लिलावगृहे बांधली आहेत, पाणी, रस्ते, वीज, शेतकरी निवास या सुविधा पुरविल्या आहेत त्या काही केंद्र किंवा राज्याने दिलेल्या पैशातून उभ्या केलेल्या नाहीत. त्या सगळ्या शेस, हमाली माथाडी, तोलाई, वाराई, देखभाल खर्च, आडत व इतर अनेक अशा वेगवेगळ्या नावाने शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री लावून त्यातून काढलेल्या रकमेतून या सोयीसुविधा उभ्या करण्यात आल्या आहेत. आता त्या सर्व उध्वस्त करुन

त्यांचे नामोनिशाण पुसून मोदी सरकार कोणत्या मूठभर, नव्हे नव्हे हाताच्या बोटांवर मोजता येईल अशा धनिक भांडवलदार व उद्योगपतींचे उखळ पांढरे करायला निघाले आहे? शेतकऱ्याचा मुडदा पाडायचा आणि त्याच्या मढ्यावरचे लोणी देश लुटारु उद्योगपतींच्या मुखात भरण्याचा हा डाव देशातल्या समस्त शेतकरी वर्गाने वेळीच ओळखला म्हणून तो संघर्षासाठी रस्त्यावर उतरला आहे.

## अनेक संस्था मोडल्या

मोदी सरकार हे शेतकऱ्यांच्या विरोधात आहे, शेतकऱ्याच्या नरडीचा घोट घ्यायला ते निघाले आहे याची जाणीव थोडी उशीरा का होईना पण झाल्यामुळे अकाली दलाने भाजपची साथ सोडली आणि त्या पक्षाच्या प्रतिनिधी म्हणून मंत्रीमंडळात असलेल्या श्रीमती हरसिम्रत कौर बादल यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. एवढेच नव्हे तर देशभर मोदी सरकार विरुद्ध आंदोलने होताहेत. लाखो शेतकरी त्यात सहभागी होताहेत. देशाची सगळी व्यवस्थित बसलेली घडी मोडून तोडून उध्वस्त करण्याचे काम पंतप्रधान झाल्यापासून नरेंद्र मोदी यांनी हाती घेतले आहे. पहिला घाव नियोजन आयोगावर घातला. त्यानंतर एका पाठोपाठ एक म्हणजे नोटबंदी, जीएसटी, रिझर्व्ह बँकेची स्वायत्तता, विद्यापीठ अनुदान आयोग, राफेल विमानांची चढ्या दराने खरेदी, एनआरसी, एनपीआर, सीएए आणि सीएबी, राष्ट्रीयकृत बँकांची मोडतोड व विलीनीकरण किती म्हणून गोष्टी सांगाव्यात ज्यामुळे देशातल्या जनतेची शांतता व स्वातंत्र्य, स्वायत्तता, मूलभूत अधिकार व हक्क यावर गदा आली आहे. एक प्रकारची अघोषित आणिबाणी देशातली जनता अनुभवते आहे. अनेक संस्थांची मोडतोड करुन देश उध्वस्तीकरणाच्या वाटेवर नेण्याचे काम मोदी सरकारने चालविले आहे. हे राजकीय हेतूने लिहिलेले नाही यावर विश्वास ठेवा. आहे ती व्यवस्था जर मोडून पडली, उखडून टाकली तर नवीन व्यवस्था पुन्हा कोण निर्माण करेल असा प्रश्न ११ व्या शतकातच स्वामी चक्रधरांना पडला होता. म्हणून त्यांनी लिहून ठेवले

**''येथोनी अवस्था व्हावी**
**तो व्यवस्था कोठोनी होईल?''**

जबाबदार, जाणत्या माणसांनी असलेली व्यवस्था सुधारून अधिक चांगली करण्याचा प्रयत्न करावा. ती मोडू नये हे मोदींना कुणी सांगायचे? जनता आता रस्त्यावर येऊन आंदोलनातून ते सांगते आहे!

## बिहारचा अनुभव काय सांगतो?

श्री. नितीश कुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्रीपदी आल्यावर तिथल्या कृषि उत्पन्न बाजार समित्या २००६ मध्ये बंद केल्या. मागील १४-१५ वर्षांत तिथल्या शेतकऱ्यांची किती वाईट अवस्था आहे जे जाणकारांनी व धोरणकर्त्यांनी थोडे डोळे उघडे ठेवून पाहावे. तिथला शेतकरी आज गंगेच्या पाण्यावरती, प्रचंड शेतीमाल पिकवितो आहे. खरे तर बिहार हा 'स्लिपींग पायथॉन' (झोपलेला अजगर) आहे. तो जर व्यवस्थितपणे जागा होऊन उठला आणि शेतकऱ्यांनी प्रचंड मेहनत केली तर संपूर्ण देशाची धान्य व भाजीपाल्याची गरज भागविण्याची ताकद एकट्या बिहारमध्ये आहे. परंतु त्या





दृष्टीने त्याच्याकडे कधी पाहिले गेले नाही आणि दुर्दैवाने तशी दृष्टी असणारे नेतृत्वही बिहारला कधी लाभले नाही. आज तर तिथल्या शेतकऱ्यांचे हाल कुत्रादेखील खात नाही अशी परिस्थिती आहे. जरा तिथे जाऊन बघा. तो शेतकरी उत्पादित केलेला माल विकण्यासाठी कुठल्यातरी पुलाखाली, नदीकाठी, सार्वजनिक शौचालयांजवळ, बस स्टॅन्ड, रेल्वेस्टेशनबाहेर जिथे जागा मिळेल तिथे बसतो आहे. तिथे कुठल्याही सुविधा नाहीत. नितीश कुमारांनी बिहारच्या शेतकऱ्यांना बाजार समित्या नसलेल्या युगात नेऊन ठेवले आहे. शेतकरी पूर्णपणे अधोगतीला गेलेला आहे आणि माल वेळेत विकला न गेल्याने तो खराब होतो आहे, सडतो आहे. परिणामी फेकून द्यावा लागतो आहे. शेतकऱ्याच्या अन्नात नितीश कुमारांनी जी माती कालवली तशीच माती आता देशातल्या संपूर्ण शेतकरी वर्गाच्या अन्नात मोदींना कालवायची आहे काय?

## केंद्राचा अध्यादेश अविचारी

केंद्र सरकारने संसदेत बील मंजूर करुन घाईघाईने जो अध्यादेश काढला आहे त्यात शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मालाचे अचूक वजनमाप, स्पर्धा नाही आणि पैसे निश्चित मिळण्याची खात्री नाही. या तीनही गोष्टींची अनुपलब्धता आहे. त्याचा विचारच या अध्यादेशाने व बीलाने केलेला दिसत नाही. शेतकऱ्याला माल विक्रीसाठी जागा कुठे मिळेल? खासगी जागेत त्याला रोज फुकट कोणी बसू देईल का? बाहेरचे जे व्यापारी निर्यात व प्रक्रियेसाठी माल खरेदी करायला येतील ते सरसकट सगळा माल घेणार आहेत का? ते निर्यातीसाठी चांगला नं. १ चा माल घेतील. तो माल १०-२० टक्के असतो. उरलेल्या मालाचे शेतकऱ्याने करायचे काय? प्रक्रियादार त्याच्या क्षमतेइतका म्हणजे पुन्हा १०-२० टक्के आणि तोही नं. ३ व नं. ४ चा माल घेणार. चांगल्या उत्कृष्ट गुणवत्तेचा माल प्रक्रियादाराला चढ्या भावाने खरेदी करणे परवडतच नाही. त्याला शक्यतो अगदी फुकटातला म्हणजे नाममात्र किमतीतला माल हवा असतो. याचा अनुभव एकदा आपल्या महाराष्ट्रातील सातारा व अहमदनगर जिल्ह्याने घेतलेला आहे. सगळ्या आयुर्वेदिक औषध बनविणाऱ्या कंपन्यांनी शेतकऱ्यांना कोरफड लावायला सांगितली. हजारो एकरांवर कोरफड लागून प्रचंड उत्पादन झाले. राज्यात त्यावेळी ७५० आयुर्वेदिक औषध बनविणाऱ्या कंपन्या होत्या. कुणीही ती कोरफड खरेदी करायला पुढे आले नाही. शेवटी ती फेकून द्यावी लागली. मोदींनी १० हजार रु. भावाने तूर खरेदी करायचे आश्वासन दिले होते. विदर्भ, मराठवाडा, खानदेशातल्या शेतकऱ्यांनी तुरीचे प्रचंड उत्पादन केले. बाजार समितीच्या आवारात शेतकरी महिनोन् महिने झोपले पण सरकारने तूर खरेदी केलीच नाही हाही अनुभव त्यांच्या गाठीशी आहेच. विलासराव देशमुख सहकार मंत्री असताना केंद्राने दिलेल्या हमीभावाप्रमाणे व्यापाऱ्यांनी उडीदची खरेदी

केली नाही. त्याबाबत शेतकऱ्यांनी सरकारकडे तक्रार केली. शेवटी तत्कालिन पणन संचालक श्री. बी. डी. पवार यांनी ५-६ व्यापाऱ्यांविरुद्ध केसेस केल्या तेव्हा व्यापाऱ्यांनी माफी मागितली व माल कमी किमतीला खरेदी केल्याचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. यदाकदाचित जर त्या व्यापाऱ्यांनी आम्ही माल खरेदी केलाच नाही अशी भूमिका घेऊन माल खरेदीची कोणतीही कागदपत्रे व नोंदी ठेवल्या नाहीत तर सरकार काय भूमिका घेऊन कारवाई करू शकेल आणि न्यायालयात ती टिकेल का? कितीतरी द्राक्ष उत्पादक

गुंतवणूक केली नाही. त्या सर्वांनी भाड्याने जागा घेतल्या व तात्पुरता काही काळ व्यवसाय केला. पुढे तो बंद करुन टाकला. अनेकांचे मॉल्स बंद झाले. मी येथे मुद्दाम कुणाचे नाव घेत नाही. पण या सगळ्या भांडवलदारांना शेतकऱ्यांना लुटून आणखीन श्रीमंत व्हायचे आहे आणि त्यांच्या मदतीसाठी केंद्रातले भाजप सरकार धावून जाते आहे हेच या देशातल्या शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. अगदी ताजा अनुभव कोरोनामुळे निर्माण झालेल्या लॉकडाऊन काळातला आहे. महाराष्ट्रात थेट माल विक्रीचा (डायरेक्ट मार्केटींग) परवाना



शेतकरी, बटाटा व कांदा पिकविणारे शेतकरी यांना करार करुनही प्रक्रिया कंपन्यांनी व निर्यातदारांनी ठरलेला भाव दिलेला नाही. इतकेच काय खुद्द दिल्लीतल्या कितीतरी व्यापाऱ्यांनी महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचा माल घेऊन पैसे दिलेले नाहीत. त्या शेतकऱ्यांना फसविले याची शेकड्यांनी उदाहरणे सांगता येतील.

## न्या. नरिमन यांचा सवाल

२००६-०७ पासून खाजगी बाजाराची स्थापना करुन थेट माल विक्री करण्याची व्यवस्था आपण केली. अनेक मॉलमधून माल ठेवण्याची परवानगी दिली. मॉल उभारणारे मोठमोठे धनाढ्य उद्योगपती व भांडवलदार या कृषीपणन क्षेत्रात उतरतील असे वाटले होते. मोठी वातानुकूलित शीतगृहे उभी राहतील. कुलिंग चेन सांभाळणाऱ्या असंख्य एअरकंडिशन्ड व्हॅन्स येतील. काहीच झाले नाही. मोठमोठ्या कॉर्पोरेट हाऊसेसने कृषीपणन क्षेत्रात कोणतीही भांडवली

पणन संचालकांनी ११०० व्यक्ती व संस्थांना दिला होता. लॉकडाऊनच्या काळात या सर्वांनी शेतकऱ्यांचा माल विकावा आणि ग्राहकांना मालाचा पुरवठा चालू ठेवावा अशी सरकारची अपेक्षा होती. त्यावेळी श्री. सुनिल पवार हे राज्याचे पणन संचालक होते. त्यांनी थेट मार्केटींगचे लायसन दिलेल्या सर्व लोकांना बैठकीसाठी बोलाविले. ११०० पैकी फक्त एकजण बैठकीला आला. पण त्याच वेळी राज्यातील ३०० पैकी २५० मार्केट कमिट्यांनी आपले बाजार चालू ठेवून शेतकऱ्याचा कमी-अधिक प्रमाणात जो काही माल येईल तो विकण्याची व्यवस्था केली. शासनाच्या हातात ही जी कृषि उत्पन्न बाजार समित्यांची यंत्रणा आहे ती प्रभावीपणे वापरली तर काय घडू शकते याचे दर्शन शेतकरी आणि जनता या दोघांनाही लॉकडाऊनच्या काळात झाले आहे. शहरातल्या सर्व लोकांना भाजीपाला, फळे मिळत राहिली. ही उत्तम व्यवस्था तुम्ही कशी राखली याबाबत वॉशिंग्टनमधल्या वर्ल्ड बँकेकडून पणन संचालक श्री. सुनिल पवार यांच्याकडे

कौतुकाने विचारणा झाली. खाजगी लोक संकटकाळात पळून जातात. धनिक भांडवलदार सेवेच्या कामात पाठ फिरवितात आणि नफा लाटायला पुढे सरसावतात हेच यातून दिसून आले. उद्या देशावर काही संकट आले, युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली तर हे भांडवलदार व खाजगी लोक धैर्याने उभे राहणार आहेत का? तेव्हा या बाजार समित्यांची जी व्यवस्था भक्कमपणाने उभी राहिलेली आहे ती कृपा करुन मोडू नका हेच सर्वोच्च न्यायालयातले न्यायमूर्ती रोहिंग्टन नरिमन यांना सुचवायचे होते. म्हणूनच त्यांनी या बाजार समित्यांचे काय



करणार? कोणती पर्यायी व्यवस्था उभी करणार आहात? ती सक्षम राहील का? आणि बाजार समित्यांनी निर्माण केलेल्या या प्रचंड इन्फ्रास्ट्रक्चरचे काय करणार आहात? असे प्रश्न विचारले. या प्रश्नांनी केंद्र सरकारचे दात घशात गेले. आज बिहारमध्ये पूर्णपणे अराजक निर्माण झाले आहे आणि सरकारने शेतकरी संकटांच्या खाईत ढकलून वाऱ्यावर सोडून दिला आहे. तिच स्थिती मोदी सरकारला देशातल्या सगळ्या शेतकऱ्यांची करावयाची आहे काय?

## 'नाम' हा एक फार्स !

भारतातला ८५ टक्के शेतकरी छोटा, अल्पभूधारक आहे. मोठे शेतकरी कोरडवाहू आहेत. प्रत्येक शेतकरी उत्पादित करीत असलेला माल हा अल्प प्रमाणात आहे. त्याला आपण जागतिक बाजाराशी आणि राष्ट्रीय मार्केटशी जोडण्याची जी भाषा केंद्र सरकार वापरते आहे ती वांझोटी आणि अर्धवट ज्ञान व अभ्यासावर आधारलेली असून वस्तुस्थितीशी पूर्ण विसंगत आहे. हुबळी येथे 'नाम'च्या तत्त्वावर उभारण्यात आलेल्या एका बाजाराचे 'सिटा' मार्फत ८ दिवस मूल्यमापन करण्यात आले. तेव्हा हे 'नाम' म्हणजे एक फार्स आहे हे ठळकपणाने अधोरेखीत झाले. शेतकऱ्याची खरी गरज व समस्या आहे उत्पादित झालेली २ पोती बाजरी आणि १०० मेथीच्या पेंढ्या यांची कुठे विक्री करायची याची. बाजार समिती आवाराच्या बाहेर विक्री झालेल्या व्यवहाराचे मायबाप कोण? शेतकऱ्याला पैसे मिळाले नाहीत आणि बाहेरचा व्यापारी माल घेऊन पळून गेला तर त्याला शोधायला महसूल खात्याच्या प्रांत जाणार आहे का? त्याला एवढाच धंदा आहे का? राज्यशासनाची ही महसूल यंत्रणा वापरण्यापूर्वी राज्यांना केंद्राने विचारलेच नाही. कुणाला काय काम द्यावे याचे तरी भान केंद्र सरकारला हवे होते. प्रांत हा जणूकाही बुधवार पेठेतल्या मजूर अड्ड्यावर उभा आहे आणि काम मागतो आहे असा विचार केंद्राने केला काय? एकंदरीत केंद्र सरकारने संपूर्ण पाऊले चुकीच्या दिशेने टाकली आहेत. घरात ढेकूण झाले म्हणून केंद्र सरकार घरच जाळायला निघाले आहे. केंद्र सरकारच्या अकलेचे दिवाळे निघाले आहे हे सिद्ध करायला हे कृषि विधेयक पुरेसे आहे!

शेतकऱ्याला मूळ उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा गृहित धरुन जी येईल ती आधारभूत किंमत देण्याची शिफारस स्वामिनाथन आयोगाने केली होती. तिची अंमलबजावणी करण्याचे वचन भाजपने जाहिरनाम्यात दिले होते ते अजून पूर्ण झालेले नाही. शेतकऱ्याचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचेही वचन भाजपने दिलेले आहे. बुहधा ते हे वचन विसरले असावेत. त्याची पूर्तता करण्याच्या दिशेने पाऊले टाका. आधारभूत किंमत रद्द करण्याचा विचारही मनात आणू नका. जनतेने मोठ्या विश्वासाने तुमच्या हाती सत्ता सोपविली आहे. तो विश्वास सार्थ ठरावा. मोदीसाहेब, मागील सहा वर्षाच्या आपल्या सत्ताकाळात नवे काही उभारण्यापेक्षा सर्व काही मोडण्याकडेच आपला कल असल्याचे दिसते. तुमच्या भाषणांनी जनतेला भुरळ पाडण्यापेक्षा व 'मन की बात' पेक्षा विधायक कामाची व शेतकऱ्यांच्या कल्याणाची बात करा. तुम्ही मर्त्य आहात. देश अमर्त्य आहे. तेव्हा हात जोडून विनंती करतो, कृपा करुन देशाची बसलेली घडी व व्यवस्था मोडू नका आणि धनिक भांडवलदारांना हा देश विकूही नका! सुज्ञास अधिक सांगणे न लगे !

डॉ. सुधीर भोंगळे

काल पार्लमेंटमध्ये, विशेषत: राज्यसभेमध्ये काही सहसा घडत नाहीत, किंवा बघायला मिळत नाहीत, असे प्रकार घडलेले आहेत. त्याच्यासंदर्भात मला आपल्याशी बोलायचं होतं.

एकतर काल मला दिल्लीला जाता आलं नाही आणि त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे सुप्रिम कोर्टानं मराठा आरक्षणासंबंधी काही निर्णय दिलेले आहेत, आणि त्याबाबतीत राज्य सरकारची भूमिका स्पष्ट आहे, की त्याच्यामध्ये जे आरक्षणासंबंधी यापूर्वी महाराष्ट्राच्या कोर्टामध्ये अपिल दाखल केले आहे. त्या कामामुळं मला काल दिल्लीला जाता आलं नाही. कारण हे अपिल लवकर करण्याची आवश्यकता होती. महाराष्ट्रामध्ये विशेषत: तरूण पिढीच्यामध्ये या प्रश्नाच्या संबंधी अस्वस्थता आहे हे ठिकठिकाणी आपल्याला दिसत होतं. आणि त्यासाठीही हे अपिल लवकर करावं हा आग्रह आम्हा लोकांचा होता. हे माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केलं आणि त्याबद्दलची काळजी त्यांनी घेतली. त्या कामासाठी मला इथं मुंबईत थांबावं लागलं.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये २२ सप्टेंबर २०२० रोजी पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारने सभागृहात घाईघाईने मंजूर केलेले कृषी व कामगारविषयक बिल, कांदा निर्यातीवर घातलेली बंदी व मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती आदी विविध विषयांवर आपली मते मांडली.

# शेतकरी व कामगारांच्या आंदोलनाला राष्ट्रवादीचा पाठिंबा

## शरद पवार यांची स्पष्टोक्ती

विधिमंडळाने एकमतानं निर्णय घेतला, तो जतन केला पाहिजे, टिकवला पाहिजे. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. आणि ते जर करायचं असेल तर सुप्रिम कोर्टामध्ये याबाबतीत अपिल करण्याची गरज असते. आणि त्यासंदर्भात गेले दोन दिवस मी इथं राज्याचे मुख्यमंत्री, राज्याचे अन्य मंत्री या सगळ्यांशी विचारविनिमय करतोय. काही कायदेशीर जाणकारांशीसुद्धा विचारविनिमय केला. आणि आपण आज छापलंय, की काल राज्य सरकारनी सुप्रिम

देशाच्या राज्यसभेमध्ये कृषि विषयक बिलं येणार होती. त्याची साधारणत: एक, दोन, तीन बिलं असतील त्यावर दोन दिवस, तीन दिवस चर्चा होईल अशी अपेक्षा होती. पण असं दिसलं, टीव्हीवर सभागृहाचं काम पाहात होतो, त्याच्यातनं असं दिसलं, की ही बिलं तातडीनं मंजूर करावी या प्रकारचा आग्रह सत्ताधारी पक्षाचा होता. टिव्हीवरून सदनाची जी कामगिरी मी पाहात होतो, त्याच्यातून या बिलाच्या संदर्भात सदस्यांना काही प्रश्न,

त्यांच्या काही शंका आणि मतं ही व्यक्त करायची होती, आणि त्यासंबंधीचा आग्रह त्यांनी धरलेला होता. हा आग्रह बाजूला ठेऊन सदनाचं काम रेटून नेण्याचा प्रयत्न असावा असं सर्वसाधारपणे त्याठिकाणी दिसत होतं. हे नियमाच्या विरूद्ध आहे हे पुन्हा पुन्हा काही सदस्य नियमाच्या पुस्तकाचा आधार घेऊन त्या नियमाचा उल्लेख करून माननीय उपाध्यक्षांना सांगत होते. पण असं असतानासुद्धा सदस्यांना प्रतिसाद न मिळाल्यामुळं सदस्यांनी वेलमध्ये धाव घेतली, नियमांचं पुस्तक पुन्हा पुन्हा दाखवूनसुद्धा आणि ते मतदानसुद्धा आवाजी पद्धतीनं. आज मतदानाच्या दोन-तीन पद्धती आहेत, हे सर्वांना ठाऊक आहे. एकदम आवाजी पद्धतीनं मतदान घेऊन ही बिलं मंजूर झाली. अशा प्रकारची भूमिका घेण्यांसबंधीचा प्रयत्न हा त्याठिकाणी चाललेला होता आणि त्यामुळं साहजिकच सदस्यांची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र होती. माझ्यासारख्याची अपेक्षा सरकारच्या प्रमुखांकडून, उपाध्यक्षांकडून, जे चेअरवर होते त्यांच्याकडून, की या सगळ्या प्रश्नाकडं गांभीर्यानं बघणं, सदस्यांना त्यांचं मत मांडायची संधी देणं अशा प्रकारची



त्याच्याकडं पूर्णपणानं दुर्लक्ष करण्याची भूमिका घेतली गेल्यामुळं ते नियमांचं पुस्तकसुद्धा फाडण्याच्यासंबंधीचा प्रकार घडला.

खरं सांगायचं तर या नियमांचा आधार सदस्य घेत असतील, तर कमीत कमी कोणता नियम ते सांगतायंत हे ऐकून घेण्याबद्दलची अपेक्षा माननीय उपाध्यक्षांकडून होती. पण त्यासंबंधीचा विचार न करता त्याठिकाणी तातडीनं मतदान घेण्याच्याबद्दलची भूमिका त्याठिकाणी घेतली गेली. होती पण त्याठिकाणी ते पाळलं गेलं नाही.

मी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विधिमंडळामध्ये आणि संसदेमध्ये सतत ५० वर्षाच्यापेक्षा जास्त काम केलंय, पण पीठासीन अधिकाऱ्यांच्याकडून सदस्यांबद्दलचं असं वर्तन मी कधी पाहिलं नव्हतं. मला आणखी एका गोष्टीचा धक्का बसला, की माननीय उपाध्यक्ष श्री. कर्पुरी ठाकूर, बिहारमधले अत्यंत ज्येष्ठ नेते आणि संसदीय पद्धती, लोकशाही पद्धती, अधिकार याच्याबद्दलचे अतिशय जाणकार यांच्या

विचाराप्रमाणं वागणं अशा प्रकारचं त्यांच्याबद्दल बोललं जातं, त्या सगळ्या विचारांना तिलांजली देण्यासंबंधीचं काम हे त्यांच्याकडनं झालेलं आहे. आणि हे सगळं करत असताना सदस्यांनी काही मतं व्यक्त केली, प्रतिक्रिया तीव्र झाली तर त्यांना ताबडतोब सदस्यपदावरून निलंबित करण्यात आलं आणि त्यांच्या अधिकार हिरावून घेण्यात आला. आता साहजिकच याची प्रतिक्रिया होणार होती आणि म्हणून ते सगळे सदस्य गांधींजींच्या पुतळ्याच्या समोर उपाध्यक्षांच्या या भूमिकेबद्दलचा आत्मक्लेष करण्याच्यासाठी काल संध्याकाळपासून धरणे धरून बसले आहेत. उपोषणही केलं. त्यांनी आत्ता उपोषण सोडलं असावं. हा जवळपास दोन दिवसांचा कालची संध्याकाळ, कालची रात्र, आजची सकाळ ही त्याठिकाणी उपोषणासंबंधीची भूमिका घेवून उपोषण त्यांनी पुढेही चालू ठेवले.

खरं तर हा एका दृष्टिनं गांधीगिरीचा मार्ग असं म्हटलं जातं, माझ्यादृष्टिनं गांधीगिरी, गांधी विचार यांची एवढी बेइज्जत यापूर्वी कधी झालेली मी पाहिली नाही. आणि ती त्याठिकाणी घडली. आणि त्याशिवाय असं एक वेगळं वर्तन करून सदस्यांचा मुलभूत अधिकार छिनून आपण काहीतरी वेगळं करतोय असं दाखवण्याच्यासंबंधीचा प्रयत्न केला जातोय, याचा अर्थ एकच आहे, की कर्पुरी ठाकुरांच्या विचारानं काम करणारे व्यक्तिमत्व म्हणून आम्ही ज्यांच्याकडं बघत होतो, ते आमच्या अपेक्षा पूर्णपणानं चुकीच्या आहेत हे मला याठिकाणी नमूद करायला पाहिजे. सदस्यांनी कालपासून अन्नत्याग केलांय हे मला आज कळलं, त्यांना पाठिंबा देण्याच्यासाठी आज मी स्वत:ही



संबंध दिवसभर अन्नत्याग करणार आहे आणि सदस्यांच्यात सहभागी होण्याची भूमिका घेतली आहे. अर्थात ही अशी भूमिका सदस्यांनी घेतली किंवा मी घेतली किंवा आणखीन कुणी काही घेतली तरी हल्ली ज्या पद्धतीनं उपाध्यक्षांची भूमिका सदनामध्ये दिसते त्याच्यामध्ये काही परिवर्तन होईल असं म्हणणं हे अत्यंत धाडसी आहे आणि ते धाडस मी काय करू इच्छित नाही.

यासंबंधी पत्रकारांना काही प्रश्न विचारायचे आहेत का?

**प्रश्न : राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यसभेतून जो वॉकआऊट**



**केला त्यासंदर्भात काहीजण प्रश्न उपस्थित करतायंत की राष्ट्रवादीने आपली भूमिका स्पष्टपणानं मांडायला हवी होती, विरोधासाठी तिथं थांबायला हवं होतं.**

**शरद पवार :** कसं आहे की, हे अर्धवट माहितीच्या आधारावर बोललं जातं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीनं प्रफुल्ल पटेलांनी सविस्तर भाषण सदनामध्ये केलं. या बिलाच्या संबंधी ज्या पद्धतीनं त्याठिकाणी काय होतं, आज त्या सदनाची रचना वेगळी आहे. पत्रकारांना सदनामध्ये काय चाललंय हे लक्षात यायला वेळ लागतो आणि याचं कारण, आम्ही राज्यसभेत बसतो, आमची गॅलरी आहे तिथं काही सदस्य बसतात, काही सदस्य लोकसभेमध्ये बसतात, काही सदस्य लोकसभेच्या गॅलरीमध्ये असतात. त्यामुळं साहजिकच पत्रकारांना या सगळ्या ठिकाणी एकाचवेळी कोण कुठं आहे, म्हणजे सदनात मी बसल्यानंतरसुद्धा अ,



ब, क बोलायला उभे राहिले तर आम्हाला शोधावं लागतं ते कुठं आहेत, इथं आहेत का, तिथं आहेत या पद्धतीनं आणि त्यामुळं कोण काय बोललं किंवा बोलतंय हे पत्रकारांनाही कळत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीनं राज्यसभेतील भूमिका ही स्वच्छपणानं प्रफुल्ल पटेल यांनी मांडली आणि लोकसभेमध्ये सुप्रिया सुळे अनेक प्रश्नांवर बोललेल्या आहेत. मी सभागृहात नव्हतो ही गोष्ट खरी आहे, पण बाकीचे आमचे सहकारी त्याठिकाणी होते. त्याठिकाणी वंदना चव्हाण होत्या. त्याठिकाणी आमच्या फौजिया खान होत्या. प्रफुल्ल पटेल प्रत्यक्ष बोललेले आहेत. त्यामुळं आम्ही त्याठिकाणी आमची भूमिका स्वच्छपणानं मांडली आहे. आणि ज्यावेळेला त्याला विरोध केला, आणि जी काही मतं मांडायची होती ती आम्ही मांडली आहेत. पण नंतर मांडून देण्याची भूमिकाच घेतली जात नाही हे दिसल्याच्यानंतर त्यांनी त्याच्याबद्दलची तीव्र भावना व्यक्त करणं आणि बाहेर पडणं याच्याशिवाय काही दुसरा पर्याय नव्हता. त्यामुळं कळत नकळत त्याला पाठिंबा आहे असं म्हणण्यात काही अर्थ नाही. ही वस्तुस्थिती नीट समजून घेवून भाष्य करायला हवं होतं.



**प्रश्न : सर, शिवसेनेनेसुद्धा लोकसभेमध्ये पाठिंबा दिला आणि राज्यसभेमध्ये तुमच्याप्रमाणे या बाजूने मतदान केलं नाही. शिवसेनेच्या भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**

**शरद पवार :** शिवसेनेच्या बाजूने काय केलंय हे मला माहित नाही. मी काही लोकसभेत नव्हतो. पण राज्यसभेमध्ये शिवसेनेनी या बिलाला विरोध करण्याची भूमिका घेतली आणि त्यासंबंधीचं त्यांच्या प्रतिनिधींचं म्हणणं मी ऐकलं आहे.

**प्रश्न : हे जे बिल पास झाले आहे, त्या बिलांचा कुठे परिणाम होऊ शकतो का. म्हटले जाते, की हमी भावावर याचा परिणाम होऊ शकतो, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाच्यासंदर्भात जो अधिकार होता, त्यावर परिणाम होवू**



**शकतो. भाजप असा दावा करतंय, की आता मार्केट जे आहे, ते शेतकऱ्यांसाठी खुलं झालंय.**

**शरद पवार :** या कृषि बिलांमध्ये तीन-चार गोष्टी आहेत. एकतर ही दोन्ही तिन्ही बिलं अशी झटक्यात पास करायची आवश्यकता नसावी. प्रत्येक बिलावर सविस्तर चर्चा होवू शकली असती. असो, पण एक बिल त्याच्यामध्ये आहे, की कार्पोरेट सेक्टर आज ते ॲमेझॉन किंवा यासारख्या सगळ्यांना एखाद्या राज्यामध्ये किंवा गावामध्ये जावून एखाद्या पिकाच्यासंबंधीची पूर्ण खरेदी करण्याचा अधिकार मिळणार



आहे आता. आजपर्यंत तसा नव्हता. म्हणजे गावातला दुकानदार, व्यावसायिक शेतमालाची खरेदी-विक्री करतो त्याला कुणाचा विरोध नव्हता. आज तुम्ही जर बघितलं, की त्या मार्केट कमिटीच्यासंबंधीचा उल्लेख केला गेला, मार्केट कमिटी आणि तिथं देशात शेतकऱ्याला कुठेही माल विकायची परवानगी आहे या प्रकारचं जे सतत सांगितलं जातं त्यात नवीन काय दिसतंय? म्हणजे याच्यात विरोधाभास आहे. आता उदाहरणार्थ कोकणातला हापूसचा आंबा तुम्हाला मुंबईत, दिल्लीतही मिळतो. तुम्हाला कोलकत्यातही मिळतो. कुणी बंदी घातलीय त्याला. किंवा नाशिकची द्राक्षं ही देशात कुठेही आपल्याला







विकता येतात. तर अशा अनेक गोष्टी आहेत, की त्या राज्यामध्ये पूर्वीसुद्धा होत्या. प्रश्न कुठे आलेला आहे, कृषि बाजार समितीमध्ये काही गोष्टींची खरेदी ही विशेषत: पंजाब, हरियाना आणि वेस्टर्न यूपी इथून केली जाते. उदाहरणार्थ गहू, तांदूळ आणि ती खरेदी प्रामुख्यानं फूड कार्पोरेशन ऑफ इंडिया यांच्यावतीनं एमएसपी जाहीर करून केली जाते. हे काम मी दहा वर्षे बघितलंय त्यामुळं मला त्याची थोडीफार माहिती आहे. आणि त्यामुळं ही जी कोट्यवधीची खरेदी करण्याचं काम बाजार समितीमधून होतं, सदस्यांचं म्हणणं होतं, की तुम्ही याच्यात सवलत दिली म्हणता ना, पण त्या कायद्याचं सांगा ना, की आम्ही एमएसपी कायम ठेवू. हा अधिकार आम्ही राखून ठेवू. पण त्याच्यासंबंधीचं काय स्पष्टीकरण त्याठिकाणी झालेलं नाही. आता देतायंत, हे सगळं झाल्याच्यानंतर सांगितलं जातंय.

पण त्यावर सदनामध्ये, चर्चेमध्ये काही करता आलं असतं तर बरं झालं असतं. आणि ही शंका लोकांच्यासमोर का येत होती? एका बाजूने तुम्ही मार्केट खुलं आहे असं म्हणता आणि दुसऱ्या बाजूने नाशिकचा कांदा परदेशी जाण्यावर बंदी घालता. मग बंदी का घातली तुम्ही. त्याठिकाणी सांगण्यात




आलं, की कांद्याचे भाव वाढल्यामुळे महागाई वाढली. आम्हा लोकांचं म्हणणं एकच होतं, की तुम्ही रोजच्या जेवणामध्ये तुमचा जो खर्च आहे, त्यामध्ये कांद्याचा शेअर किती. दैनंदिन लंच आणि डिनरमध्ये कांद्याचं कॉंट्रिब्यूशन तुमच्या जेवणामध्ये किती आहे तर क्षुल्लक आहे. असं असताना कांद्यामुळं महागाई आणि महागाई झाल्यामुळं

लगेच परदेशातले सगळे कॉन्ट्रॅक्ट हे रद्दबातल करायचे किंवा थांबवायचे, हा धोकादायक प्रकार आहे. सरकारच्या मनात येईल त्यावेळी सरकार त्याठिकाणी निर्णय घेवू शकते आणि ते तुम्ही कायद्याच्याच हवाल्याने द्या हा आग्रह त्याच्यामागे होता. तो अभिप्राय त्याठिकाणी पाळला गेला नाही.

आज हे जे सकाळ, दुपार निर्णय घेतले जातात, त्याचे परिणाम बाहेरच्या बाजारामध्ये भारताबद्दल वाईट होतात. मी स्वत: एक़दा देशाचा अन्न खात्याचा मंत्री म्हणून त्यावेळचे आमचं नियोजन केलेलं असतं आणि ते तुम्ही पाळलं नाही तर आमची फजित होते आणि नेमकं हेच बांगलादेशमध्ये काल झालं. कांद्याच्या बंदीच्यानंतर बांगलादेशने आपली नापसंती व्यक्त केली. तर याच्यामध्ये या प्रकारची धोरणं ही शेती, शेतमाल, शेतकऱ्यांच्या दृष्टिनं आणि ग्राहकांच्या दृष्टिनी आणि आंतरराष्ट्रीय बाजाराच्या दृष्टिनं योग्य नाहीत. या सगळ्या गोष्टींच्यासंबंधीचा विचार कुठेना कुठे केला पाहिजे. आज जे सांगितलं जातंय, की आता सगळीकडं







पंतप्रधान नरसिंहराव यांच्या सांगण्यावरून श्रीलंकेचे राष्ट्रपती राजपक्षे यांना भेटायला गेलो, आणि आम्ही तुम्हाला पाहिजे तसा सप्लाय करायला तयार आहोत वगैरे वगैरे सगळी चर्चा केली, पण त्यांनी काही गोष्टींवर बंदी घातली होती. त्यांनी सांगितलं, की आम्हाला तुमच्याकडून माल घेणं केव्हाही फायद्याचं आहे, जवळ आहे. पण रिलायबल सप्लाय म्हणजे तुमच्या देशामध्ये कमतरता भासली किंवा किंमती वाढल्या की तुम्ही बॅन करता, आणि तुम्ही बॅन केलं, की आमची फजिती होते. कारण आम्ही तुमच्याकडून माल येईल या अपेक्षेवर

माल विकायला परवानगी आहे. ठीक आहे. पण परवानगी असेल तर कांद्यावरील बॅन काढून टाका. पण हे बॅन आजही आहे. आज नाशिकचा कांदा परदेशात जावू शकत नाही. आता जेएनपीटीला जो माल





पडलेला होता, केवळ मी बोलणं योग्य नाही, पण आम्ही फार आग्रह केला तिथे की तो माल तरी जावा. शेवटी त्याला परवानगी देण्यात आली आणि तो माल कॉमर्स मिनिस्ट्रीनी सहकार्य केल्यावर आज बाहेर जायला लागला. तो माल गेला, पण बाकीच्याला काय हात लावलेला नाही. त्याला परवानगी नाही. तर हा विरोधाभास आहे. एका बाजूला तुम्ही कृषि बाजार समितीवर सगळी बंधनं काढली आणि देशाचं मार्केट खुलं केलं हे सांगता आणि नंतर या प्रकारची बंधनं घालता. याबद्दल आम्हा लोकांची एक प्रकारची नाराजी आहे. या बिलांवर हवी तशी चर्चा करू दिली नाही. त्यामुळं आज काहीही सांगितलं, कितीही जाहिराती केल्या, ठीक आहे वृत्तपत्राच्या दृष्टिनं चांगलं आहे, संबंध फुलपेज ॲड मिळते, त्यावर वाईट वाटायचं काही कारण नाही विशेषत: वृत्तपत्रांनी असं मला सकाळमधनंही कळलं. आणि त्यामुळं या गोष्टी घडतायंत. पण हे याचवेळेला करण्याची वेळ का आली यावर विचार करण्याची आवश्यकता आहे.

**प्रश्न : उपाध्यक्ष हरिवंश यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहिले आहे, की हे जे निलंबित खासदार आहेत त्यांनी लोकशाहीचे वस्त्रहरण केलेलं आहे आणि ते स्वत:च एक दिवस उपोषण करणार आहेत.**

**शरद पवार :** नाही..नाही...उपाध्यक्षांची एकंदर भूमिका सदनाकडं आणि सदस्यांकडं बघण्याची आहे ती सदनाच्या प्रतिष्ठेचे अवमूल्यन करणारी आहे. आणि त्यामुळंच मी स्वत: आज सदस्यांच्या एक दिवसाच्या उपोषणामध्ये सहभागी होणार आहे.

**प्रश्न : सर, यामध्ये बिहारचासुद्धा इश्यू आणला जातोय, की बिहारच्या एका नेत्याचा अशा पद्धतीनं अपमान करण्यात आला.**

**शरद पवार :** असं आहे, की त्यांचं वर्तन चांगलं आहे हे संबंध देशानं बघितलंय. आता काळजी आहे, की बिहारच्या लोकांनासुद्धा चिंता वाटली असेल की आपला प्रतिनिधी हे काय करतोय.

**प्रश्न : मराठा आरक्षणाच्या संदर्भात ऑर्डिनन्स काढून आपण एक पर्याय दिला होता....**

**शरद पवार :** त्याच्यासाठी तीन चार पर्याय होते. त्याच्यात तज्ज्ञांचा सल्ला शेवटी महत्त्वाचा आहे. अनेकांचा सल्ला घेण्यात आला आणि यामध्ये सर्वांचं सामुदायिक मत हे होतं, की अपिल करणं हे गरजेचं आहे आणि स्थगिती उठवण्याची मागणी करणं गरजेचं आहे. मी काय कायदेशीर तज्ज्ञ नाही. त्यातल्या तज्ज्ञांनी सांगितलं आणि तो विचार राज्य सरकारनी स्वीकारला.

**प्रश्न : धनगर समाजातल्या लोकांनीही आरक्षणासाठी परभणीमध्ये अनेक ठिकाणी आंदोलने केली आहेत. त्यासंदर्भात सरकारची भूमिका काय असणार आहे.**




**शरद पवार :** मी आजच्या वर्तमानपत्रामध्ये वाचलंय की, त्याच्यामध्ये आम्हा लोकांची भूमिका यापूर्वी स्पष्ट केलेली आहे. आदिवासींच्यासाठी राखीव ठेवलेल्या जागांना धक्का न लावता धनगर समाजाच्यासाठी स्वतंत्र तरतूद करायला आम्हा लोकांचा राष्ट्रवादी काँग्रेस म्हणून पाठिंबा आहे. ही भूमिका आज नाही, मागे एकदा हा प्रश्न आला होता त्यावेळेला आम्ही जाहीर केला होता.

**प्रश्न : अशोक चव्हाण म्हणतात, की कोऑर्डिनेशन अजून चांगलं होवू शकलं असतं. ज्याप्रमाणं राज्यात तिन्ही पक्षांचं कोऑर्डिनेशन आहे तर ते दिल्लीत किंवा**










**संसदेत दिसलं असतं, तर कदचित हे कन्फ्युजन टाळता आलं असतं. तुम्हाला काय वाटतं?**

**शरद पवार :** मला काय तसं वाटत नाही. पण काय आहे, सुप्रिम कोर्टात ही केस आहे आणि कपिल सिब्बलसारखे एक देशातले अतिशय उत्तम लॉयर त्याठिकाणी नेमलेले आहेत. दुसरे अभिषेक सिंघवी हेसुद्धा देशातले एक मोठे लॉयर आहेत. ते त्याठिकाणी आहेत. रोहतगी त्याठिकाणी होते. देशातले हे सगळे टॉपमोस्ट लॉयर हे सगळे त्याठिकाणी सरकारच्यावतीनं आरक्षणाच्या बाजूनं भूमिका मांडत होते. त्यांचं कोऑर्डिनेशन होतं. त्यांनी आपली बाजू अतिशय उत्तमपद्धतीनं मांडली आहे. मी स्वत: केस फॉलो करत होतो. मी काय कोर्टात गेलो नाही, वकील नाही. पण काय चाललंय याची माहिती घेत होतो.

**प्रश्न : सर, काँग्रेस कदाचित शेतकरी विधेयकावरून रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची तयारी करत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अशा पद्धतीने काँग्रेससोबत रस्त्यावर आंदोलन करणार?**

**शरद पवार :** मला फारसं काही माहिती नाही. कारण मी वर्तमानपत्रामध्येच वाचलं आहे. पक्षाचे लोक त्यांच्याशी बोलतील आणि नंतर याबाबतचा निर्णय घेतला जाईल.

**प्रश्न : सर, शेतकरीसुद्धा विधेयकाच्या विरोधात रस्त्यावर उतरणार आहे. देशभरात २५ तारखेला आंदोलन केलं जाणार असल्याची माहिती मिळत आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका काय असणार आहे?**

**शरद पवार :** असं आहे, की संबंध देशातल्या १००-१२५ संघटना एकत्र येत आहेत. आणखी एक कामगारांच्या बिलाच्या संबंधीसुद्धा देशातल्या काही कामगार संघटना काही पावलं उचलत आहेत. त्या सगळ्यामध्ये आपण सहभागी व्हावं असं आमच्या सहकाऱ्यांचं मत आहे. पण तो निर्णय ते अधिकृतपणानं जाहीर करतील. आम्ही देशात पाठिंबा देणार आहोत, सहभागी होणार आहोत.

**प्रश्न: अभिनेता सुशांत सिंह राजपूत मृत्यूप्रकरणात ड्रग्जचा नवा अँगल पुढे आला आहे. अनेक अभिनेते-अभिनेत्रींची नावे यामध्ये आली आहेत.**

**शरद पवार :** मला फारसं माहित नाही. मी फारसे लक्ष देत नाही. मला वाटते, की कोणाचीही आत्महत्या असली तरी दु:ख होते. वाईट एवढेच वाटते, की एका आत्महत्येचा






मुद्दा गेल्या तीन महिन्यांपासून संपूर्ण देशात गंभीरपणे चर्चिला जात आहे. मला भीती एवढीच वाटते, की दर महिन्याला ५० शेतकरी आत्महत्या करतात, त्याकडे दुर्लक्ष करणं मला योग्य वाटत नाही.

**प्रश्न : कोरोनाच्या परिस्थितीत काही सुधारणा झालीय असं वाटतं का? पुणे, नागपूर, नांदेड यांसारख्या ठिकाणी परिस्थिती आटोक्याबाहेर गेली आहे.**

**शरद पवार :** मला माहिती नाही. पण मी अधिकाऱ्यांशी दररोज बोलतोय. मला पुण्याचा ग्राफ म्हणजे कालची जी परिस्थिती आहे, परिस्थिती चिंताजनक होती, तो आता खाली यायला लागलांय असं दिसतंय. तुम्ही आजचा आकडा पेशंटचा बघा आणि काल-परवाचा पण बघा, हा आकडा थोडाबहुत खाली येत असल्याचं दिसतंय. पण त्याच्याकडं अतिशय काळजीपूर्वकच लक्ष द्यावं लागेल याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

**प्रश्न : राज्यात टप्प्याटप्प्याने अनलॉक होतंय. प्रवासावरील बंदी उठवण्याची मागणी लोकांकडून होत आहे. अनलॉकमुळे परिस्थिती बिघडू शकते. अशा परिस्थितीत राज्य सरकारची भूमिका काय असेल.**

**शरद पवार :** हे राज्य सरकारने ठरवायचेय. पण मला विचारलं तर राज्य सरकारला मी सांगेन की तुम्ही सोशल डिस्टन्ससंबंधीची काळजी घ्या आणि हळूहळू सगळ्या गोष्टींचा सामना आपल्याला करावा लागेल, त्याच्याबरोबर जगावं लागेल ही स्थिती निर्माण करा.











**प्रश्न : पवार साहेब, एक बातमी अशी आली होती, की सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्या निवडणुकीतील ॲफिडेव्हेटची कुठेतरी चौकशी चालू होतेय, इन्कम टॅक्सकडून त्याची पाहणी होतेय. त्याकडे तुम्ही कसं पाहतांय?**

**शरद पवार :** मला वाटतं, की तुम्ही फारशी माहिती घेतलेली दिसत नाही. सुप्रियाच्या आधी पहिली नोटीस मला आलीय. मला असं वाटतंय, की या दोघांच्यापेक्षा माझी ग्रेड थोडी वर असावी. आता जी नोटीस मला दिली, सुप्रियाला येणार आहे असं ऐकतोय. अजून हातात पडलेली नव्हती. कदाचित काल संध्याकाळी मिळणार होती असं कळलं होतं. तर ती आता येवू द्या. चांगली गोष्ट आहे. पण संबंध देशातल्या इतक्या सदस्यांच्यामध्ये आम्हा लोकांबद्दल एक प्रेमाची भावना ही जी दिसतेय त्याच्याबद्दल एक प्रकारचा आनंद आहे आम्हाला. इलेक्शन कमिशनच्या सांगण्यावरून मला काल नोटीस आली आहे आणि त्यामध्ये काही गोष्टींची माहिती विचारली आहे. उत्तरे दिली नाहीत तर एक दिवसाला दहा हजार रूपये दंड आहे असा त्यामध्ये उल्लेख आहे.



**प्रश्न : गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी विविध लोकांकडून येत आहे.**

**शरद पवार :** हे विविध लोक कोण आहेत, ज्याचा परिणाम संबंध महाराष्ट्रावर, देशावर होईल? राष्ट्रपती राजवट काय गंमत आहे का? त्याला काही कारण आहे का?

**प्रश्न : देशाची अर्थव्यवस्था संकटात आहे आणि त्याचं कारण अर्थमंत्र्यांनी हे ॲक्ट ऑफ गॉड असल्याचे वक्तव्य केलं होतं. त्याचं राष्ट्रवादीच्या काही खासदारांनी कौतुक केल्याची बातमी होतं. यावर काय सांगाल?**

**शरद पवार :** कुठं कौतुक केलं आणि कुणी केलं? माझ्या कानावर आलेलं नाही. या सगळ्या प्रश्नाच्यासंबंधी आम्ही चर्चा केलेली आहे.

●●●

## उत्तर प्रदेशच्या हाथरसमधील सामूहिक बलात्कार प्रकरण

# कायदा धाब्यावर बसवणारे शासन आणि शासक ?

अवलोकितेश्वर





उत्तर प्रदेशाचे रुपांतर 'उत्तम प्रदेश' मध्ये करण्याचे अनेक दावे झाले. अद्याप ते दावेच राहिले आणि वास्तव वेगळेच! हाथरसमध्ये एका दलित मुलीवर झालेला सामूहिक बलात्कार आणि अत्याचारामुळे झालेला तिचा मृत्यु या घटनेने निर्भया प्रकरणाची पुनरावृत्ती झाली. १९ वर्षाच्या मुलीवर चारजणांकडून झालेला बलात्कार आणि त्यानंतर तिची जीभ कापणे, तिला तिचाच दुपट्टा गळ्याभोवती बांधून फरफटत नेणे आणि मारहाणीत तिच्या मणक्याला मानेला झालेल्या जबर दुखापती! ही शारीरिक विटंबना आणि छळ ती सहन करणे अशक्यच होते. तिला अलिगढ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार होऊ न शकल्याने तिला दिल्लीच्या सफदरजंग रुग्णालयात हलविण्यात आले. परंतु ती जगू शकली नाही. तिने मृत्युपूर्व जबानीत तिच्यावर सामूहिक बलात्कार झाल्याचे आणि संबंधित चौघांची नावे देखील सांगितली. मृत्युपूर्व जबानी ही अंतिम मानली जाते. जगभरातल्या कायद्यात ही बाब सर्वमान्य आहे. असे असतानाही चार आरोपींना वाचविण्याचे प्रकार सुरु झाले आहेत. यामध्ये जिल्हा प्रशासन, उत्तर प्रदेश पोलिस आघाडीवर आहेत. यासाठीच उत्तर प्रदेशातल्या पोलिसांनी या बलात्कार पीडित





मुलीचा मृत्यु झाल्यानंतर जोरजबरदस्तीने चक्क पेट्रोल टाकून अग्निसंस्कार करुन टाकला. मृत्युनंतर देखील या मुलीची बळजबरी चुकली नाही!

दलित - वाल्मिकि - समाजातल्या या मुलीवर १४ सप्टेंबर रोजी सामूहिक बलात्कार झाला. संदीपसिंग, रामू, लवकुश सिक्करवार आणि रवि अशा चारजणांनी हे दुष्कर्म केले. हे चौघेही ठाकूर म्हणजेच राजपूत किंवा क्षत्रिय आहेत. प्रथम अलिगढ रुग्णालयात आणि नंतर दिल्लीच्या सफदरजंग रुग्णालयात त्या मुलीने प्राणांतिक झुंज दिली पण ती यशस्वी ठरली नाही. २८ सप्टेंबरला ती ही लढाई हरली. सुरुवातीला भारतीय दंडविधानाच्या कलम ३०७ खाली(खुनाचा प्रयत्न) प्रकरण नोंदविण्यात आले. तेही केवळ एकाच आरोपीविरुध्द! त्यानंतर कलम ३५४ खाली विनयभंगाचा गुन्हा जोडण्यात आला आणि सरतेशेवटी ३७६-ड खाली सामूहिक बलात्काराचा गुन्हा नोंदविण्यात आला. हा गुन्हा चारही आरोपींविरुध्द नोंदविण्यात आला तो देखील प्रचंड आरडाओरडा झाल्यानंतर!

जेव्हा या प्रकरणाला तोंड फुटले आणि देशातल्या माध्यमांनी ते उचलून धरले त्यानंतर त्याला वेगळे वळण मिळाले. सुरुवातीला केवळ या प्रकरणाचा निषेध करणाऱ्या राजकीय पक्षांनी त्यात सक्रियता दाखविण्यास सुरुवात

केली. या मुलीच्या मृतदेहावर पोलिसांनी ज्या अनाकलनीय घाईघाईने अग्निसंस्कार केले त्याच्या चित्रफिती सार्वजनिक झाल्यानंतर आक्रोश वाढायला लागला. राजधानी दिल्लीतही मोठी निदर्शने होऊ लागली आणि हे प्रकरण जड जाणार याची जाणीव उत्तर प्रदेश सरकारला आणि विशेषतः मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना होऊ लागली. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने तर या प्रकरणी त्यांच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे तोंडात गुळणी धरण्याचे धोरण स्वीकारले. खुद्द योगी आदित्यनाथ यांनीही फारसे जाहीर वक्तव्य न करण्याचे धोरण अंगिकारले. एखादे प्रकरण अंगाशी आले की मौनव्रत धारण करायचे किंवा लपून बसायचे हे भाजपचे अघोषित राष्ट्रीय धोरण आहे. पंतप्रधानांनी केवळ एका फोनद्वारे आदित्यनाथ यांना या प्रकरणाची वेगवान तपास करुन दोषींना कडक कारवाईची सूचना केली. रविशंकर प्रसाद, स्मृति इराणी, निर्मला सीतारामन आणि इतरही मंडळी जणूकाही गायबच झाल्यासारखी होती. मागाहून अतिशय सौम्य पध्दतीने व बचावाच्या मुद्रेत यातील काहींनी निवेदने देऊन या प्रकरणाचे राजकारण न करता दोषींना सजा होईल असे पहावे असे म्हटले. तर इराणी मॅडमनी काँग्रेसवर यावेळीही टीका करताना काँग्रेस राजकारण करीत आहे आणि मुलीला न्याय मिळण्यासाठी काही करीत नसल्याचे म्हटले. निर्भयाच्या वेळी भाजपनेही राजकारण केले होते असा याचा अर्थ घ्यावा लागेल. परंतु या घटनेमुळे बचावात जावे लागलेल्या भाजपने त्यांच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे राजकीय







जिल्हाधिकारी प्रविणकुमार लक्सकार




पोलीस अधीक्षक विक्रांत वीर

कांगावखोरी सुरु केली. या कांगावखोरीसाठी त्यांच्या प्रचारकी टोळ्याही सक्रिय झाल्या. यानंतर मूळ घटनेपेक्षा ती दाबून टाकण्याच्या हालचालींना जोर चढला.

यासंदर्भात उत्तर प्रदेश पोलिस आणि हाथरस जिल्हा प्रशासन आणि मुख्यतः हाथरस जिल्हाधिकारी प्रवीणकुमार लक्सकार यांच्या भूमिका वादग्रस्त ठरल्या आहेत. एवढा गदारोळ झाल्यानंतर उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी लाजेकाजेस्तोवर ज्या पोलिसांनी मुलीवर बळजबरीने अंत्यसंस्कार केले त्यांना फक्त निलंबित केले. खरेतर त्यांच्या दुष्कृत्याचा ढळढळीत पुरावा समोर असताना त्यांची तत्काळ हकालपट्टी करायला हवी होती परंतु केवळ निलंबनाची तोंडदेखली कारवाई करण्यात आली. समोर आलेल्या माहितीत घाईघाईने अंत्यसंस्काराचा निर्णय, त्याचा आदेश आणि पोलिसांना त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सांगण्याचे काम प्रवीणकुमार या जिल्हाधिकाऱ्यांनी केल्याचे निष्पन्न झाले आहे. परंतु मुख्यमंत्र्यांचा या अधिकाऱ्यावर एवढा नितांत विश्वास आहे की त्याच्यावर मात्र कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. एवढेच काय परंतु अद्याप या चार आरोपींबाबत देखील मवाळ भूमिका घेण्याचे धोरणच आढळून येते.


असे का ? उत्तर प्रदेशात आजही सर्व क्षेत्रात जात हा घटक सर्वात प्रबळ मानला जातो. भाजपच्या राज्यात उच्चवर्णीय समाजांमध्ये वर्चस्ववादी भावना विशेषत्वाने आढळून येते. मुख्यमंत्री हे क्षत्रिय म्हणजेच ठाकूर आहेत. त्यांच्या राजवटीत हा समाज



स्वतःला सत्ताधारी समजू लागला नाही तरच नवल. पोलिस, प्रशासन, नोकरशाही आणि सर्वच क्षेत्रात सध्या या समाजाचे वर्चस्व असल्याची उत्तर प्रदेशात सार्वत्रिक चर्चा आहे. हाथरसमध्ये मीडिया, विरोधी पक्षांचे नेते यांना मज्जाव करण्यासाठी प्रशासनाने जमावबंदी, प्रवेशबंदीचे आदेश लागू करुन या गावाची पार नाकेबंदी करुन टाकली.

परंतु जमावबंदी असताना जिल्हाधिकाऱ्यांच्या मूकसंमतीने गावातील उच्चवर्णीयांनी २ ऑक्टोबरला महापंचायत घेतली आणि त्यात चारही बलात्कारी तरुण हे





निर्दोष व निरपराध आहेत आणि त्यांच्या सुटकेसाठी वाटेल ते करण्याची प्रतिज्ञा केली. प्रतिबंधात्मक आदेश लागू असताना उच्चवर्णीयांची तथाकथित महापंचायत कशी होऊ शकते याचा जाब कोण कुणाला विचारणार ? एवढेच नव्हे तर या प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करावी आणि फिर्यादी म्हणजे मुलीच्या कुटुंबियांची नार्को टेस्ट करावी वगैरे मागण्या देखील या महापंचायतीने मंजूर केल्या. चोर ते चोर आणि वर शिरजोर किंवा चोराच्या उलट्या बोंबा अशा म्हणी केवळ वाचलेल्या किंवा ऐकलेल्या असतील परंतु त्याचा साक्षात व प्रत्यक्ष आविष्कार असा पाहण्यास मिळत आहे. उत्तर प्रदेश सरकारने तीन उच्चपदःस्थांची 'एसआयटी' म्हणजेच 'स्पेशल इन्व्हेस्टिगेशन टीम' स्थापन केली आहे. या महापंचायतीने म्हणजेच उच्चवर्णीयांनी या टीमला भेटण्याची आणि हे चौघेजण निर्दोष असून त्यांना तत्काळ सोडण्यात यावे अशी मागणी करण्याचे ठरविले आहे. या आरोपींना शासन-प्रशासन आणि शासक आणि पोलिस सामील आहेत की काय असे वाटू लागले आहे. कारण जिल्हाधिकारी महोदयांनी या दलित कुटुंबाच्या घरी जाऊन त्यांना त्यांचे पोलिसांना दिलेले निवेदन बदलण्यास सांगितले. मीडिया आणि राजकीय पक्षाचे लोक काय दोन दिवस येथे येतील आणि जातील पण तुम्हाला आमच्याबरोबरच दिवस काढायचे आहेत अशी जवळपास धमकावणी त्यांनी या कुटुंबाला दिल्याची फीतही सर्वत्र जारी झाली आहे. एवढे सर्व पुरावे मिळूनही मुख्यमंत्र्यांची या अधिकाऱ्यावरची मर्जी हटायला तयार नाही हे एक महाआश्चर्य आहे. कदाचित त्याची जात त्याला मदत करीत असावी असे लोक म्हणू लागले आहेत.

हे प्रकरण दाबण्यासाठी किती आटापिटा चालू आहे ?

राष्ट्रवादीचे माजी आमदार प्रकाश गजभिये यांनी हाथरस येथे जाऊन पीडीत कुटुंबाचे सांत्वन केले.



बलात्कार झालाच नसल्याचे म्हटलेले आहे आणि महापंचायतीने बरोबर तो धागा पकडून या चौघांच्या सुटकेची मागणी करण्यास सुरुवात केली आहे. म्हणजेच आता देशातील सध्याच्या राजवटीत कायदे देखील धाब्यावर बसण्याचे काम सुरु झाले आहे. परंतु या मुलीच्या वैद्यकीय तपासणीबाबतही उत्तर प्रदेश प्रशासनाने आणि पोलिसांनी कसा खेळखंडोबा केला तेही समजणे अत्यावश्यक आहे आणि एखादे प्रकरण दाबण्यासाठी शासक आणि शासकीय यंत्रणा कोणत्या थरापर्यंत जाऊ शकतात हे लक्षात येईल. या मुलीवर १४ सप्टेंबर रोजी बलात्कार





झाला. सरकारी नियमानुसार बलात्कार झाल्यानंतर पहिल्या ७२ तासात तिची वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक असते अन्यथा बलात्कारात पुरुषांचे वीर्य आणि इतर गोष्टी त्या महिलेच्या शरीरात असतात त्या नष्ट होतात. अलिगढ वैद्यकीय रुग्णालयाने सुरुवातीला दिलेल्या अहवालात तिच्यावर बलात्कार झाल्याचे म्हटले होते. त्याला प्राथमिक अहवाल मानले गेले. परंतु आग्रा येथील प्रयोगशाळेने तो केवळ शारीरिक दुखापतीच्या खुणा आढळल्याचे म्हटले. आता ताज्या माहितीनुसार अलिगढ वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाने देखील आपला मूळचा अहवाल विसरुन दिल्लीच्या प्रयोगशाळेचा अहवाल योग्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. परंतु हे वस्तुस्थितीला धरुन नाही. मुलीवर बलात्कार व शारीरिक अत्याचार १४ सप्टेंबरला झाला. २२ सप्टेंबरला म्हणजे तब्बल आठ दिवसांनी तिचे नमूने प्रथम आग्रा येथील प्रयोगशाळेकडे पाठविले गेले त्यांनी तिच्या या नमुन्यात संभोग, जबरी संभोग असे काही झाल्याच्या खुणा सापडल्या नसल्याचे म्हटले. म्हणजेच सरकारी नियम ७२ तासांचा असताना आठ दिवसांनी तिचे नमूने पाठवून तिच्यावर बलात्कार झालेलाच नाही असा अहवाल तयार करण्याचा हा खटाटोप आहे असा निष्कर्ष कुणी काढल्यास तो गैर ठरणार नाही. आता पोलिस प्रमुख आणि सरकारी अधिकारी हा अहवाल सर्वत्र नाचवीत बलात्कार झालेलाच नाही असा दावा करीत सुटले आहेत. अलिगढ रुग्णालयातले डॉक्टर्स आणि वैद्यकीय क्षेत्रातले



तज्ञ तसेच अनेक माजी पोलिस अधिकाऱ्यांनी देखील हे सर्व अनुचित आणि नियमबाह्य असल्याचे म्हटले आहे.

क्षणभर असे गृहीत धरु की त्या मुलीवर बलाकार झालेला नाही. मग तिच्या मृत्युपूर्व जबानीचे काय हा प्रश्न उरतोच! न्यायदंडाधिकाऱ्यांच्या समोर तिने तो नोंदविलेला आहे आणि भारतीय पुरावा कायद्याच्या कलम ३२(१) खाली मृत्युपूर्व जबानी ही ग्राह्य पुरावा म्हणून मानण्यात येते. तो एक प्रकारे अंतिम पुरावाच मानला जातो. परंतु तिच्या मृत्युपूर्व जबानीकडे जाणूनबुजून प्रशासन व पोलिस दुर्लक्ष करीत आहे आणि ज्या वैद्यकीय तपासणीच्या अहवालाबाबत शास्त्रीय आधारावर विश्वास ठेवणे अशक्य आहे त्याचा आधार घेऊन आरोपींचा आणि पर्यायाने स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न पोलिस व प्रशासन करीत आहे. एका दलित मुलीची विटंबना झाल्यानंतर देखील विशिष्ट समाजाच्या आणि त्या समाजातून मुख्यमंत्रीही येतात, त्यांना वाचविण्याची ही आटोकाट शर्थ कशासाठी हे न उलगडणारे कोडे आहे. मुख्यमंत्री त्यांच्या स्वजातिप्रेमाने एवढे आंधळे झाले आहेत ? योगींच्या उत्तर प्रदेशात हिंदू, हिंदूमध्येही उच्चवर्णीय यांना झुकते माप असावे अशी समजूत व्हावी अशा या घटना आहेत. त्यांच्या लेखी दलित, अल्पसंख्यक यांचे अस्तित्वच नसावे असे दिसून येऊ लागले आहे. ही मनोवृत्ती व त्याचे होत असलेले आविष्कार हे भयावह आहेत.

उत्तर प्रदेशातील राजकारणात जात ही नेहमीच










निर्णायक राहिली आहे. भाजपने हिंदुत्वाच्या एका व्यापक आवाहनाच्या आधारे ब्राह्मण, ठाकूर, वैश्य आणि काही प्रबळ ओबीसी जातींना तसेच काही दलित घटकांना आपलेसे करुन महाकाय यश मिळवले खरे. परंतु आता त्यांच्या राजकारणाचे खरे रंग उघड होऊ लागले आहेत. भाजपच्या राजकारणाचा मुख्य आधार हा उच्चवर्णीय वर्चस्वाचा असल्याचे उत्तर प्रदेशातल्या घटनांवरुन स्पष्ट होऊ लागले आहे. उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड येथील मुख्यमंत्री क्षत्रिय आहेत. राजस्थान आणि छत्तीसगढमध्ये त्यांची सरकारे असतानाही त्यांनी तेथे क्षत्रिय समाजाचे प्रतिनिधीच मुख्यमंत्री म्हणून नेमले होते. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान हे किराड-ठाकूर समाजाचे आहेत आणि मध्य प्रदेशात हा समाज ओबीसी म्हणून ओळखला जातो. परंतु शिवराजसिंग हे चौहान हे नाव धारण करतात. या समाजात अशी प्रथा रूढ नाही. कर्नाटकातही भाजपचा मुख्य जनाधार प्रबळ असा लिंगायत समाज आहे व मुख्यमंत्री येद्युरप्पा त्यांचेच प्रतिनिधित्व करतात. भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाचे मौन देखील अनाकलनीय आहे. शेतकरी, कामगार यांच्या हिताला धक्का पोहोचविणारे कायदे करुन समाजातल्या आर्थिक वर्गाला केंद्र सरकारने दुखावले आहे. सामाजिक पातळीवर दलित, गरीब आणि कष्टकरी व अल्पसंख्यक समाजाला दुर्लक्षिण्याचे प्रकार चालू आहेत. हे वर्ग तुटत गेल्यास येणारे राजकीय आव्हान भाजपला न पेलवणारे असेल!



**Nanded City, Pune**
*The Maximum City*
Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY
*The pride of Pune*

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com


# करू भागवत धर्म...

**अभय टिळक**

काळाच्या विशाल आणि विराट प्रवाहामध्ये विस्मयकारक असे काही योगायोग आढळून येतात. प्रबोधन पर्वाच्या १२व्या शतकादरम्यान युरोपमध्ये प्रथम ऐकू येऊ लागलेला पायरव आणि त्याच्याच आगेमागे भारतामध्ये अंकुरू लागलेला संतविचार या दोहोंतील काही साम्यस्थळे हा असाच एक योगायोग गणावा लागेल अथवा लागतो. एतद्देशीयांच्या सत्तेचा विलय घडून येऊन ब्रिटिश अंमल तत्कालीन हिंदुस्थानात स्थिरपद झाल्यानंतर १९व्या शतकात इथे जे वैचारिक नवजागरण घडले त्याला 'प्रबोधन' असे संबोधावयाचे अथवा नाही, यासंदर्भात पोथीनिष्ठ सैद्धान्तिक विश्वामध्ये मतमतांतराच्या फैरी झडत असतात. त्यांतच, १९व्या शतकातील मराठी मुलुखात जी काही वैचारिक घुसळण साकारली तिच्या पहिल्यावहिल्या पाउलखुणा, १२व्या १३व्या शतकापासून या भूमीमध्ये अंकुरलेल्या संतविचारांमध्ये शोधता येतात अथवा येतील, असे प्रतिपादन कोणी केले तर मतमतांतराचा फुफाटा अधिकच जोराने उसळावा हेही अनपेक्षित वा अतर्क्य म्हणता येणार नाही.


परंतु, तशा प्रकारचा पूर्वपक्ष मांडण्यास, उपेक्षा करता न येण्याजोगी, भरीव सामग्री सकृतद्दर्शनी तरी हाताशी लागते. प्रबोधन युगाची आद्य बीजे १२व्या शतकादरम्यान





युरोपमध्ये रुजत असताना त्या प्रक्रियेची म्हणून जी काही गाभामूल्ये गणली जातात, सर्वसाधारणपणे, त्याच प्रकारच्या मूल्यसंचिताचे शिंपण १२व्या-१३व्या शतकापासून मराठी भूमीमध्ये रुजलेल्या संतविचाराद्वारे घडून येऊ लागले, असे निरीक्षणवजा अनुमान उपलब्ध संदर्भसाहित्याच्या परिशीलनाद्वारे मांडता येते. या प्रक्रियेमध्ये घसघशीत योगदान दिसते ते भागवत धर्म विचाराचे. या भागवत धर्मविचाराची तात्त्विक बैठक आणि तिच्यातून उमलणारी जीवनविषयक दृष्टी ज्यांच्या कार्यकर्तृत्वाद्वारे प्रकर्षाने उमलून पुढ्यात साकारते त्या संत नामदेवांचा ७५०वा जन्मोत्सव म्हणजे सध्या चालू असलेले २०२० हे वर्ष.

अभ्यासकांनी निश्चित केलेल्या तपशीलानुसार, कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशी ही नामदेवांच्या अवतरणाची तिथी गणली जाते. इंग्रजी कालमापन पद्धतीनुसार ९ नोव्हेंबर १२७० हा तो जन्मदिवस येतो. त्यामुळे, २०१९ सालातील नोव्हेंबर महिना ते २०२० सालातील नोव्हेंबर





महिना हे संपूर्ण वर्ष नामदेवांच्या जन्मस्मरणाचे सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष ठरते. इ. स. १२७० ते इ. स. १३५० असे ८० वर्षांचे प्रदीर्घ आयुर्मान लाभलेल्या नामदेवांचे जीवन म्हणजे अखंड प्रयत्न आणि उदंड उद्यमशीलता यांचे मूर्तिमंत दर्शन होय. निव्वळ पारलौकिकाच्या पाठलागामध्ये संपूर्ण मध्ययुगादरम्यान मग्न झालेल्या मराठी समाजमनाला निकोप ऐहिकतेचे पाठ पढवणाऱ्या भागवत धर्मविचाराची ध्वजा महाराष्ट्राबाहेर थेट पंजाबातील घुमानपर्यंत घेऊन जाणारी समाजमनस्क विभूती, हीच नामदेवांची सम्यक् ओळख ठरावी अथवा ठरते. समाजप्रबोधनाचा वसा स्वीकारलेला नीतीमान असा प्रगल्भ समाजशिक्षक म्हणजे 'संत', ही भागवत धर्मविचाराला अभिप्रेत असलेली संतत्वाची व्याख्या समूर्त साकार करणाऱ्या नामदेवांच्या व्यक्तित्वाचे आणि कर्तृत्त्वाचे आजच्या संदर्भात आकलन करण्यास त्यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जन्मस्मरणानिमित्ताने प्रवृत्त होणे संयुक्तिक ठरेल.

सामाजिक, राजकीय तसेच बौद्धिक क्षेत्रांतील नवप्रवाहांची जी मालिका १२व्या शतकाच्या प्रारंभी युरोपमध्ये साकारली त्यांतच युरोपातील प्रबोधनाची आद्य बीजे रुजल्याचा दावा काही इतिहासाभ्यासक करतात. जीवनाबद्दलच्या ऐहिक दृष्टिकोनाचे अंकुरण त्या बीजांद्वारे तिथे घडून आले. मानवी अस्तित्त्व हे त्या जीवनविषयक ऐहिक भूमिकेच्या केंद्रस्थानी होते. मानवी अस्तित्त्वाची


महत्ता सर्वोच्च मानणाऱ्या मानवतावादाचा उगम त्यांतूनच घडून आला. विशुद्ध मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या बुद्धिवादी चळवळीद्वारे युरोपात प्रबोधनाची पहाट झाली, असे प्रबोधन पर्वाचे अभ्यासक मानतात. ऐहिक जीवनाबाबत कमालीचा सकारात्मक दृष्टिकोन बाळगणारे तत्कालीन समाजव्यवहारांतील सुशिक्षित समाजघटक मानवतावादाचे पुरस्कर्ते व प्रवर्तक होते. मध्ययुगादरम्यान कडव्या धार्मिक पुराणमतवादाच्या पुरत्या आहारी गेलेल्या युरोपीय समाजमनाभोवती करकचून आवळलेल्या शृंखलांमधून सुटका होण्याच्या दिशा मानवतावादाच्या पुरस्काराद्वारे उजळल्या.

## मानवतावादाचे बहुविध पैलू

प्रबोधनपर्वाचा गुरुत्वमध्य असलेल्या मानवतावादाची जी प्रेरणा युरोपामध्ये उगम पावली तिला अनेकविध पैलू होते. ते सारे पैलू व प्रबोधनपर्वादरम्यान तिथे उदयाला आलेली नवीन मूल्यप्रणाली आणि १३व्या शतकापासून मराठी मातीमध्ये शिंपणी चालू झालेली भागवत धर्मप्रणीत मूल्यप्रणाली यांच्यादरम्यान आश्चर्य वाटावा इतका सुसंवाद दिसतो. दळणवळण, संपर्क आणि संवाहन यांची त्या काळातील प्रचलीत यंत्रणा बघता, युरोपमध्ये उगम पावलेल्या त्या युगमूल्यांचा प्रभाव इथल्या समाजमनावर समांतर पद्धतीने घडून येणे अगदी सर्वतोपरी अशक्य जरी नसले तरी प्रचंड दुस्तर होते अथवा असावे, हे तर उघडच आहे. त्या पार्श्वभूमीवर, युरोपीय प्रबोधन युगादरम्यान प्रसवलेली मूल्यसंपदा आणि भागवत धर्मविचाराने जागविलेली मूल्यप्रणाली यांच्यातील साम्यस्थळे निश्चितच विस्मयचकित करणारी ठरतात. हे कसे घडले असावे, याचा उलगडा आज करणे फार अवघड आहे. साधारणपणे एकाच काळात जगाच्या वेगवेगळ्या भागांत सर्वसाधारणपणे एकाच प्रकारची मूल्यव्यवस्था अवतरण्यास कारणभूत ठरणारे पूरक घटक जगाच्या पाठीवर समांतरपणे सक्रिय बनले असावेत, एवढेच काय ते आपण या संदर्भात म्हणू शकतो. बुद्धिवादाची कास धरणाऱ्या समाजघटकांनी युरोपीय प्रबोधनादरम्यानच्या मूल्यव्यवस्थेचे संगोपन-संवर्धन घडविले. तर, विवेकाधिष्ठित ऐहिकतेचा पुरस्कार करणाऱ्या भागवत धर्मविचाराचे जागरण घडविणाऱ्या मराठी संतमंडळाने इथल्या नवचिंतनाची मूस घडविली. त्या नवचिंतनाच्या आद्य शिल्पकारांचे जणू मुकुटमणी म्हणजे नामदेव.

मानवी अस्तित्त्व आणि मानवी कर्तबगारी हेच जिज्ञासेचे मुख्य प्रांत असल्याची जाणीव नवप्रचलीत मानवतावादाने तत्कालीन समाजमनात रुजविली. त्या





काळातील प्रचलीत धर्मशास्त्रे आणि तत्त्वज्ञाने यांच्या शाखोपशाखांमधून, नानाविध प्रणालींमधून सत्यविषयक ज्या संकल्पना मुखर होत आलेल्या होत्या त्या संकल्पनांच्या आंतरिक ऐक्यावर तसेच त्यांच्यादरम्यान नांदणाऱ्या सुसंवादावर मानवतावादी भूमिकेचा भर राहिला. मानवी अस्तित्त्व हे पूजनीय होय, हा त्या साऱ्या



नवदृष्टीचा गाभा होता. मानवी जीवनाबाबत संपूर्ण मध्ययुगात नांदणाऱ्या भावनाप्रेरणांच्या तुलनेत या नवदृष्टीचे आगळेपण प्रकर्षाने प्रतीत होत राहिले. पूर्वजन्मांमध्ये केलेल्या पापांचे प्रायश्चित्त या जन्मामध्ये घ्यायचे असते, अशा अपराधी भूमिकेतून मानवी अस्तित्त्वाकडे बघण्याची मानसिकता ही मध्ययुगाची देणगी होती. त्यांमुळे, पश्चात्तापदग्ध, प्रायश्चित्तमय जीवन व्यतीत करत राहणे, हा मध्ययुगीन सामाजिक-सांस्कृतिक विश्वातील सर्वोच्च आदर्श गणला जात असे. मानवी जीवनाकडे बघण्याच्या या भूमिकेमध्ये प्रबोधन युगाने आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. प्रायश्चित्तमय जगण्याच्या जागेवर प्रबोधनपर्वाने प्रतिष्ठापना केली ती क्रियाशील जीवनक्रमाच्या वस्तुपाठाची. जगण्याकडे बघण्याची एक अपूर्व अशी नजरच जणू त्यांतून निपजली. या परिवर्तनाचे दोन मुख्य परिणाम झाले. मानवी प्रज्ञेचे पुनरुज्जीवन घडण्यास त्यांमुळे चालना मिळाली, हा झाला त्यांतील पहिला भाग. तर, जीवनविषयक नवीन दृष्टिकोणाचे संगोपन निकोप बुद्धिनिष्ठतेच्या पायावर घडून येण्यास सुरुवात झाली, ही त्यांतील दुसरी कमाई.



प्रबोधनपर्वाने प्रवर्तित केलेल्या मानवतावादी जीवनदृष्टीची सर्वांत मोठी आणि महत्त्वाची परिणती म्हणजे केवळ पारलौकिक निःश्रेयसावरच खिळून राहिलेली तत्कालीन समाजमनाची दृष्टी इहवादी बनण्याची प्रक्रिया चालू झाली. चर्च आणि चर्चमधील धर्मगुरूंच्या माध्यमातून प्रसृत होणाऱ्या आज्ञा, दैव आणि देवविषयक जाणिवा, पापपुण्याचे संकेत यांच्या कुंपणांमध्ये बंदिस्त बनलेला लोकव्यवहार हळूहळू मोकळा होण्याला सुरुवात झाली. सभोवतालच्या व्यवहारासंदर्भातील मुक्त जिज्ञासेची कवाडे त्यांतून सताड खुली बनली. समाजमनाच्या भाबड्या श्रद्धेला चिकित्सेची जोड लाभली. ऐहिक लोकव्यवहारातील मानवी कर्तृत्वाबद्दल समाजमानसाला खात्री वाटायला लागली. याचा परिणाम म्हणजे त्यांतून लोकव्यवहाराचा पोत बदलायला सुरुवात झाली. दिवसातील बहुतांश वेळ पारलौकिक बाबींशी संबंधित क्रियाकर्मांमध्येच व्यतीत करण्याकडे झुकलेला कल पालटू लागला.

ऐहिक जीवनाला हातभार लागेल अथवा लागावा अशी कामे करण्याकडे सर्वसाधारण जनमानस प्रवृत्त बनू लागले. निकोप आणि जबाबदार अशी ऐहिकता या सगळ्या घडामोडींमधून साकारली आणि प्रतिष्ठित बनली.

## नवचिंतनाची पार्श्वभूमी

मानव आणि देव यांच्यादरम्यानच्या नात्याचा पूर्णपणे नवीन भूमिकेतून पुनर्विचार, हा प्रबोधन युगातील नवचिंतनाचा गाभा होय. मुक्तीसाठी मनुष्यमात्राने अहोरात्र



प्रयत्नशील राहिले पाहिजे, या भावनेचा प्रचंड पगडा तत्कालीन सर्वसामान्यांवर होता. केवळ इतकेच नाही तर, अशा मुक्तीसाठी आवश्यक असणारी प्रगल्भता केवळ आणि केवळ चर्च व चर्चचे अध्वर्यू असणारे धर्मगुरू यांच्यापाशीच काय ती असते, अशीही समाजमनाची त्या काळी प्रगाढ धारणा होती. मुक्तीसाठी अनिवार्य असलेल्या प्रज्ञेची मक्तेदारी चर्च आणि धर्मगुरू यांच्याकडेच असते अथवा आहे, या प्रस्थापित समजाबाबत प्रश्नचिन्ह उभे करत प्रबोधन युगाच्या प्रारंभपर्वातील चिकित्सेचा उदय घडून आला. मानवी शक्ती-बुद्धीच्या विकासाची चरमसीमा गाठण्याची ऊर्मी व तसा आदर्श प्रबोधन युगाच्या आगमनाद्वारे प्रसवलेल्या मानवतावादाने समाजापुढे उभा केला. समजुतदारपणा, परोपकार, दया, कणव, अनुकंपा यांसारख्या निखळ मानवी मूल्यांचे जागरण संगोपन-संवर्धन त्याच मानवतावादाद्वारे लोकव्यवहारात स्थिरावू लागले. विचार आणि तारतम्यपूर्ण विचारातून साकारणारी कृती यांचे साहचर्य मानवतावादाला अपेक्षित होते. पोपटपंचीप्रधान, पुस्तकी शब्दबंबाळपणा आणि धर्मशासकांनी त्यांना लाभलेल्या धार्मिक सत्तेचा केलेला गैरवापर या दोन बाबी टाळत पूर्वकालीन खिस्ती धर्मविचाराची पुनर्स्थापना करण्यास इरॅस्मससारखे प्रगल्भ बुद्धिवादी प्रबोधन पर्वाच्या प्रथम चरणात मग सरसावले. तर, मध्ययुगात उदंड बोकाळलेल्या बौद्धिक शब्दच्छलाला नकार देत अभिजात अशा ग्रीक व रोमन साहित्यातील नैतिक मूल्यांचा स्वीकार





पंजाबातील घुमान येथे संत नामदेवांचे २२ वर्ष वास्तव्य होते. घुमानचा हा गुरुद्वारा भगत नामदेव गुरुद्वारा याच नावाने ओळखला जातो आणि तिथे रोज लंगरही चालतो.



करण्याचा वस्तुपाठ समाजमनापुढे ठेवत पेट्रार्कसारख्या समाजमनस्कांनी मध्ययुग आणि प्रबोधन पर्व यांना जोडणारा मानवतावादाचा सेतू बुलंद बनविण्याचे शिवधनुष्य ताकदीने पेलले.

साधारणपणे १२व्या शतकापासून युरोपामध्ये साकारू लागलेल्या या नवचिंतनाशी साधर्म्य दर्शविणारे नवप्रबोधन भागवत धर्मविचारातील मूल्यसंचयाने मराठी सांस्कृतिक विश्वामध्ये कसे प्रवर्तित केले, याचे आकलन या सगळ्या पार्श्वभूमीवर करून घेणे या टप्प्यावर उचित ठरेल. मध्ययुगीन महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक पर्यावरणच केवळ नव्हे तर सर्वसामान्य लोकव्यवहारही, जवळपास, प्रबोधनपूर्व काळातील युरोपसारखाच होता. फरक असेल तर तो निव्वळ संस्थात्मक. धर्मशरण मानसिकता आणि पुराणमतवाद दोन्हीकडे तितकाच बळकट होता. युरोपात सांस्कृतिक धार्मिक वर्चस्व होते ते 'चर्च' नामक बलशाली संस्थेचे. तर, मध्ययुगीन महाराष्ट्रावर वैचारिक-सांस्कृतिक अंमल होता तो वणवर्चस्वप्रधान धर्मप्रणालीचा. जन्मजात जातवर्णभेदानुसारी उतरंडमय व्यवस्था लोकव्यवहारात नांदणाऱ्या त्या वैचारिक पर्यावरणामध्ये उतरंडीच्या तळाशी असणारे आणि उतरंडीच्या कक्षेबाहेर ठेवलेले समाजसमूह सर्व प्रकारच्या गुलामीचे बळी होते. केवळ गुलामीचेच बळी नव्हे तर तिच्यातून निपजणाऱ्या विषमतापूर्ण लोकव्यवहाराचे आणि त्यांत अनुस्युत असणाऱ्या पिळवणुकीचेही. पूर्वजन्मामध्ये केलेल्या भल्याबुऱ्या कर्माचे फळ प्रत्येक जीवाला या पृथ्वीतलावर भोगायला लागते आणि हातून घडणाऱ्या प्रत्येक कर्माचे फळ त्याला सदैव


चिकटलेले असल्याने कर्मांची साखळी कधीच न संपणारी असते, हा कर्मविपाकाचा सिद्धान्त पारंपरिक धर्मधारणेने प्रत्येकाच्या मनावर पक्का बिंबवलेला होता. परिणामी, मागच्या कोणत्या तरी जन्मात केलेल्या पापाचे फळ भोगून संपविण्यासाठी आपल्याला जन्म घ्यावा लागलेला आहे, अशा अपराधभावाचा गंड सगळ्यांनाच कमी-अधिक प्रमाणात घेरून राहिलेला असे. जन्ममरणाच्या या फेऱ्यातून सुटका होण्यासाठी मोक्षाची साधना करणे, हीच माणसाच्या जन्माची इतिकर्तव्यता गणली जात असे.

मोक्षप्राप्तीसाठी ज्ञान हेच एकमात्र अमोघ साधन असल्याचा पुकारा यच्चयावत धर्मशास्त्रे करत असत आणि तत्कालीन समाजव्यवस्थेने ज्ञानाचा अधिकार फक्त उच्चवर्णियांना बहाल केलेला होता. उतरंडप्रधान समाजव्यवस्थेमध्ये चौथ्या वर्णात गणले जाणारे शूद्र आणि चारही वर्णांतील स्त्रिया यांना ज्ञानप्राप्तीचा अधिकार तत्कालीन धर्मव्यवहाराने पूर्णपणे नाकारलेला होता. मोक्षसाधनेसाठी कराव्या लागणाऱ्या कथित कर्मकांडांचे आणि ती करणाऱ्या याज्ञिकांचे प्रचंड वर्चस्व लोकव्यवहारावर होते. अशा परंपराशरण आणि विषमतापूर्ण वातावरणापायी एकंदर समाजव्यवस्थाच कमालीची स्थितिशील, पूर्वगौरवशाली आणि दांभिक बनलेली होती.

## भागवत धर्मविचाराचा उतारा

समाजव्यवहारातील ही कोंडी फोडण्यासाठी संतमंडळाने उतारा शोधून काढला भागवत धर्मविचाराचा. संकुचित, वर्णवर्चस्ववादी, उतरंडप्रधान, कर्मकांडप्रवण, भेदमूलक आणि विषमतापूर्ण अशा तत्कालीन व्यवस्थेला पूर्णपणे नवीन पर्याय उभा करण्यासाठी संतमंडळाने उपयोजन घडवून आणले ते भागवत धर्मविचाराचे. त्या नवव्यवस्थेच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान उभे केले ते ज्ञानदेवांनी. तर, तो मूल्यठेवा व्यवहारात उतरविण्यासाठी संस्थात्मक संरचना उभी केली ती नामदेवांनी. आपण जगतो ते जग आभासी, मायामय नसून ते पूर्णतः सत्य आहे एवढेच केवळ नव्हे तर, या जगाच्या पलीकडे, या जगापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे कोणतेही जग नाही अशी अत्यंत स्पष्ट आणि विशुद्ध इहवादी जीवनदृष्टी प्रस्थापित करणारे शैवागमप्रणित चिद्विलासाचे तत्त्वज्ञान प्रतिष्ठित करत ज्ञानदेवांनी वेदांताला एक पर्यायी सैद्धान्तिक प्रारूप उभे केले. या पृथ्वीतलावर माणुसपण जपणे हे प्रत्येक मनुष्याचे आद्य कर्तव्य आहे, या जाणिवेचा उगम घडण्यास त्यांमुळे भूमी तयार झाली.

मनुष्याचे या पृथ्वीवरील अस्तित्त्व सर्वोच्च मानणाऱ्या



भक्त पुंडलिकाच्या भेटीला पांडुरंग घरी आले.

युरोपीय प्रबोधनाद्वारे प्रसृत झालेल्या मानवतावादाने, त्याच मनुष्यप्राण्याचे सर्वांगीण उन्नयन घडवून आणण्याचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवलेला होता. याच भूमिकेला जवळपास समांतर असणारा विचारव्यूह मराठी विचारविश्वात रु जविण्यास भागवत धर्मविचाराने सुरु वात केली. ज्ञानदेवांनी मुखर केलेल्या चिद्विलासाच्या तत्त्वदृष्टीद्वारे त्याची पायाभरणी घडून आली. जगण्याच्या निव्वळ प्राथमिक गरजा भागवण्यातच मनुष्यजन्म खर्च करण्यात हशील नाही, असा इशारावजा

सल्ला ज्ञानदेव

**दुर्लभुरे दुर्लभुरे दुर्लभु संसारू तुम्हीं कां नेणां ।**
**ऐ आहारनिद्रेसाठी दवडितां माणुसपणा ।।**

अशा शब्दांत देतात, हे या संदर्भात मननीय ठरते. 'माणुसपण जपण्यासाठी, शरीराच्या किमान गरजा भागविण्यापलीकडेही अधिक काही तरी करणे गरजेचे आहे ही भावना रुजवित असतानाच, माणसाचा जन्म मिळणे हे दुर्लभ आहेच परंतु, 'माणुसपण' हस्तगत करणे हे तर त्यांहूनही अधिक अवघड आहे, असेही ज्ञानदेव **दुर्लभ दुर्लभ संसार त्यांत दुर्लभ माणुसपण'**, अशा शब्दांत अधोरेखित करतात.

ऐहिक जगण्याकडे बघण्याचा हा पूर्णतः नवीन आयाम होता. इहलोकामधील जीवनाबाबत मध्ययुगीन युरोपात ज्या प्रमाणे एक प्रकारची अपराधी अथवा प्रायश्चित्तमय भावना सर्वसामान्यांच्या मनात नांदत असे सर्वसाधारणपणे तशाच प्रकारची भूमिका, निवृत्तिप्रधान जीवनाचे माहात्म्य मनावर बिंबवणाऱ्या पारंपरिक निगमप्रणित विचारव्यूहाने इथे स्थिर केलेली होती. ऐहिक जीवन म्हणजे पूर्वकर्मांची शिक्षा नसून तो विलास आहे, त्या जगण्याचा आनंद घ्यावयाचा असतो, असा पर्यायी विचारव्यूह ज्ञानदेवकथित आगम तत्त्वदृष्टीने १३व्या शतकातील समाजमानसाच्या पुढ्यात मांडून युगप्रवर्तनाचे संकेत प्रसृत केले. साहजिकच, ऐहिक जगणे हा मोक्षप्राप्तीच्या प्रवासादरम्यानचा केवळ एक थांबा आहे, ही जगण्यामागील तिथवर पोसली गेलेली भावना बदलण्याच्या वाटा त्यांमुळे प्रशस्त बनू लागल्या. इहलोकातील जगणे अधिक अर्थपूर्ण, समाधानी, उन्नत बनविण्यासाठी झटणे ही विवेकशीलतेची खूण गणण्याची दृष्टी भागवत धर्माने प्रदान केली. विवेकशीलतेचे हे भान जपत समाजजीवन प्रगल्भ बनविण्यासाठी आयुष्य झिजवणाऱ्या विभूतीला 'संत' हे बिरुद भागवत धर्मविचाराने बहाल करावे, हे या संदर्भात लक्षणीय ठरते. पारंपरिक धर्मविचारातील जुनाट, स्थितीशील आणि भेदकारक अंशांबाबत प्रश्न उपस्थित करण्याचे भान आणि धैर्य याच विवेकशीलतेद्वारे समाजव्यवहारात निपजायला लागले. परंतु, त्यासाठी प्रथम माणुसपणाची जाणीव आणि ते माणुसपण जपण्याची जबाबदारी व्यापक स्तरावर जागृत करणे, हा एक मोठाच टप्पा बाकी होता.

ज्ञानदेव-नामदेवांच्या समकालीन धर्मविचाराने मुदलात किमान माणुसपण नाकारलेलेच समाजघटक बहुसंख्य होते. ज्ञान, ज्ञानसंपादनाची साधने, संपत्ती, गावगाड्यात स्थान, लौकिक, लोकव्यवहारात किमान मान, प्रतिष्ठा...नाकारलेल्या समाजघटकांना त्यांच्या मानवी अस्तित्त्वाची स्वायत्त अशी सार्वभौम आत्मखूण प्रथम प्रदान करणे हेच भागवत धर्ममूल्यांची पताका खांद्यावर घेतलेल्या



पंढरपुरातील पुंडलिकाचे मंदिर

संतमंडळापुढील मुख्य व आद्य आव्हान होते. ते आव्हान पेलले नामदेवांनी.

**आह्मी दैवाचे दैवाचे । दास पंढरीरायाचे ॥**' असा पुकारा करत, इहलोकातील मानवी अस्तित्त्वाला सज्जड प्रतिष्ठा प्राप्त करून देत नामदेवांनी पहिले पाऊल उचलले.

## कष्टकरी प्रापंचिक दैवत

पारलौकिक श्रेयसाच्या प्राप्तीसाठी कर्मकांडे करण्याइतपत वेळ, पैसा आणि धार्मिक अनुमती गाठीशी नसलेल्या बहुजन समाजाला, तो दररोज करत असलेल्या काबाडकष्टांच्या साधनेद्वाराच प्रसन्न होणारे असाधारण दैवत सुप्रतिष्ठ करीत नामदेवांनी दुसरे पाऊ ल उचलले. पंढरपूरचा पांडुरंग हा जरी आठव्या-नवव्या शतकापासून दैवतमंडलामध्ये विख्यात पावलेला असला तरी त्याचे असे आगळेवेगळे 'देव' पण प्रस्थापित केले ते नामदेवांनीच. महाविष्णूचा अवतार गणला गेलेला असला तरी पंढरीच्या पांडुरंगाचे 'विठ्ठल' हे नाव ना संध्येच्या २४ नावांत दिसते ना विष्णुसहस्त्रनामांत आढळते! विठ्ठलाचे हे आगळेवेगळेपण नामदेव, **चोविसांवेगळे सहस्त्रां आगळे** अशा शब्दांत नोंदवितात. आपल्या भक्ताने सर्वसंगपरित्याग करावा, घरदारकुटुंब यांच्यावर तुळशीपत्र ठेवावे, अशी हा देव अपेक्षा धरत नाही. उलट, भक्ताच्या कष्टांचा भार आपल्या परीने कमी करण्यासाठी तो मदत करण्यास कसा तत्परतेने सरसावतो हे नामदेव पूर्वकालीन दाखले देऊन अनेक अभंगांद्वारे सांगतात. पंढरपूरला पुंडलिकासाठी आलेला हा देव पूर्वावतारात बळीच्या दरवाजात द्वारपाल म्हणून उभा ठाकला, याने धर्मराजाच्या राजसूय यज्ञादरम्यान भोजनाच्या पंगतींमध्ये पाणी वाढले इतकेच केवळ नाही तर उष्ट्या पत्रावळीही गोळा केल्या, अर्जुनाच्या रथाचे घोडे यानेच वागवले...असे याच्या 'देव' पणाचे आगळे आयाम नोंदवत नामदेवांनी 'कष्टकरी प्रापंचिक देव' ही विठ्ठलाची प्रतिमा समाजमानसामध्ये प्रकर्षाने प्रतिष्ठित केली. भागवत धर्माने प्रसृत केलेल्या इहवादी जीवनदृष्टीचा सन्मान करणारे असे आगळे दैवत प्रस्थापित करणे, हे नामदेवांचे त्या प्रबोधन पर्वाला एक मुख्य योगदान ठरते.



पंढरपुरातील नामदेव पायरी



तीर्थयात्रा केल्याने गाठीशी पुण्य जमा होते आणि देह पडल्यानंतर स्वर्गलोकामध्ये जीवाला घेऊन जाण्यास हेच पुण्य कामी येते, ही मध्ययुगातील एक प्रधान धर्मधारणा. त्या पार्श्वभूमीवर, भागवत धर्माचे आराध्य दैवत असणाऱ्या विठ्ठलाच्या पंढरपूर या क्षेत्राचे नामदेववर्णित आगळेपणही भागवत धर्माने प्रवर्तित केलेल्या ऐहिक जीवनदृष्टीशी संवादी असेच आहे. मोक्ष अथवा स्वर्गप्राप्ती सुलभ बनविणे हे पंढरपूर तीर्थाचे मुख्य वैशिष्ट्य नव्हे, तर, तिथे जाणाऱ्या प्राणिमात्रांची बुद्धी विशुद्ध बनविणे हा पंढरपूर क्षेत्राचा खरा महिमा होय, असा नामदेवांचा सांगावा आहे. **'ऐसें तीर्थ कोणी दाखवा निर्मळ । जेथें नासे मळ दुष्टबुद्धी ॥**" हे नामदेवांचे उद्गार या संदर्भात मननीय ठरतात. कोणाच्याही ठिकाणी वसणारी दुष्टबुद्धी एकंदरच लोकव्यवहार नासून टाकण्यास कारणीभूत ठरत असते. त्यामुळे, ऐहिक जीवन



निकोप बनवायचे असेल तर प्रथम दुर्बुद्धीचे निवारण घडवून आणावयास हवे आणि तीर्थयात्रेचा मूळ व मुख्य हेतू तोच होय, हेही नामदेव इथे सूचित करतात.

मानवकेंद्रितता हा युरोपीय प्रबोधनपर्वाचा गुरुत्वमध्य होता. प्रबोधन युगाने प्रवर्तित केलेल्या मानवतावादाचा उगम त्याच मानवकेंद्रिततेमधून घडला. मनुष्यप्राण्याचे पृथ्वीवरील अस्तित्व गहर्णीय नाही, ही भावना मानवी जाणिवेमध्ये प्रस्थापित करणे ही त्या सगळ्या परिवर्तनाची फलश्रुती. मोक्ष हीच अंतिम जीवननिष्ठा मानणाऱ्या मध्ययुगीन मूल्यचौकटीचा पगडा असणाऱ्या काळात, निदान भक्तीच्या प्रांतापुरता तरी, मोक्षविचार अप्रस्तुत असल्याचा पर्यायी विचारव्यूह भागवत धर्माने प्रवर्तित केला. आपल्या ठिकाणी असणारी दुष्टबुद्धी शुद्ध करून घेण्यासाठी पंढरीला येणारे भाविक मोक्षाला कणभरही गणत नसल्याने हवालदिल झालेले मोक्षमुक्ती पंढरीच्या रस्तोरस्ती दीनवाणे फिरत असतात, असा भक्तिमय जीवनातील ऐहिकतेचा जोरकस पुकारा नामदेव,

**मुक्तिपद कोणी नेघे फुकासाठीं ।**
**हिंडे वाळवंटी दीनरूप ॥**
**भक्तांचिया पायां पडतो पुढतां पुढती ।**
**मज करा सांगतीं मोक्ष म्हणे ॥**

इतक्या ऊर्जस्वल शब्दांमध्ये करतात.

युरोपातील प्रबोधन युगाने व्यक्तीची स्वायत्तता सर्वोच्च मानली. भारतीय दर्शन परंपरेवर एकंदरीनेच प्रचंड पगडा असलेला वैदिक विचारव्यूहही व्यक्तिकेंद्री असाच होता व आहे. मोक्षसाधना हा त्या विचारव्यूहाचा केंद्रबिंदू. या पृथ्वीवर जन्म घेतलेल्या मनुष्याने मोक्ष हेच परमसाध्य मानून त्यासाठीच प्रयत्नशील राहिले पाहिजे, ही त्या विचारव्यूहाची गाभाशिकवण. तत्कालीन पारंपरिक धर्मविचाराने जिची महत्ता सर्वोच्च मानलेली होती ती मोक्षमुक्तीची संकल्पना स्वरूपतःच व्यक्तिकेंद्रीत होती. त्या व्यक्तिकेंद्रीततेच्या ऐवजी 'फड' ही समूहवाचक संकल्पना रूढ करणे, ही नामदेवांची वैशिष्ट्यपूर्ण देणगी. भागवत धर्मविचाराने प्रसृत केलेल्या भक्तितत्त्वाचे लोकसंग्रह हे जे दुसरे अंग त्याचे प्राथमिक रूप म्हणजे सामूहिकता अथवा समाजभावना. 'समाज' नावाची समूहप्रधान संस्था त्यांद्वारे तत्कालीन चिंतनविश्वाच्या केंद्रस्थानी आली अथवा आणली गेली.

भागवत धर्माने प्रवर्तित केलेल्या भक्तिसंकल्पनेच्या 'नामचिंतन' या पहिल्या आणि सर्वांत महत्त्वाच्या अंगाला शिरोधार्य मानत नामदेवांनी जो नामयज्ञ संपूर्ण जीवनभर आचरला त्याने त्या काळातील केवळ धार्मिक-आध्यात्मिकच नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक व्यवहारातही अपूर्व असे स्थित्यंतर घडवून आणले. भागवत धर्मविचारातील 'नामस्मरण' या उपासना साधनाचे केवळ आणि केवळ आध्यात्मिक पैलूच काय ते आजवर उदंड चर्चिले गेलेले आहेत. या साधनाने जे सामाजिक



अभिसरण त्या कर्मकठोर वातावरणात शक्य बनविले आणि भागवत धर्मविचारानेच आदर केलेल्या ऐहिक जीवनदृष्टीचे व्यवहारात संगोपन-संवर्धन घडविण्यास ज्या प्रगल्भपणे अवकाश प्राप्त करून दिला त्या पैलूंचे आकलन अगदी आजही म्हणावे तितके प्रकर्षाने होतेच अथवा झालेले आहे असे ठामपणे म्हणता येणार नाही. बाटविटाळाच्या भावनेचे अवडंबर माजविलेल्या तत्कालीन धर्मव्यवहाराने काही समाजघटकांना मंदिरप्रवेश नाकारलेला होता. आराध्य दैवताच्या समूर्त दर्शनापासून वंचित राखलेल्या त्या यच्चयावत समाजसमूहांना नामस्मरणाच्या माध्यमातूनच आराध्याच्या रूपदर्शनाचा सोहळा उपभोगण्याचा आगळा पर्याय प्रशस्त बनविला तो नामदेवांनी.

**नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम ।**
**नामारूपा भिन्न नाहीं नाहीं ॥**
**आकारला देव नामारूपा आला ।**
**ह्मणोनी स्थापिले नामवेदी ॥**

हे त्यांचे उदगार, भागवत धर्मविचाराने या भूमीत सक्रिय बनविलेल्या समांतर प्रवाहाचे स्पष्ट सूचन करतात.

## लढाऊ आत्मभान

भेदप्रवण अशा तत्कालीन धर्मव्यवहाराने उपेक्षेचे दान पदरी घातलेल्या समाजसमूहांच्या हाती नामजपरूपी साधन देऊन नामदेवांनी एक लढाऊ आत्मभान त्यांच्या ठायी जागविले. मंदिरांच्या चार भिंतींमध्ये आणि बंद कवाडांच्या आड देवाला लपवत त्याच्या दर्शनापासून भक्तांना वंचित राखण्याची धर्ममार्तंडांची उद्दाम आणि विषमतापूर्ण दंडेली नाम आणि रूप यांच्यातील अभेदापायी पूर्णपणे अप्रस्तुत ठरली आणि ठरणार होती. मंदिरप्रवेश नाकारून आराध्य दैवताच्या रूपदर्शनाला आडकाठी करण्याने संबंधित दीन-उपेक्षित जनसमूहांचे आता काहीच अडणार नव्हते. कारण, देवळातील मूर्तीच्या प्राकृतिक-भौतिक दर्शनापेक्षा दैवताच्या नामजपाद्वारे घडणारे त्याचे नित्य दर्शन नामसाधकाची स्वायत्तता जपत त्याला दर्शनाचे सुख मिळवून देणार होती. ही झाली या वास्तवाची व्यावहारिक बाजू. नामस्मरणाचे नामदेवप्रणित हे साधन असे व इतके आगळे प्रभावशाली होते की, एकीकडे नामसाधकाची स्वायत्तता बुलंद बनवत असतानाच त्याने 'देव' नामक तत्त्वाची स्वायत्तता संपूर्णपणे खालसा करून त्याला अंकित बनविलेले होते. नामसाधकाला दर्शन द्यावयाचे अथवा नाही, हा आता देवाच्या मर्जीचा प्रश्न राहिलेला नव्हता. नामजपाच्या साधनाचा हा पूर्णतः अपूर्व आणि अजोड पैलू नामदेव,

**लपलासि तरी नाम कैसें नेसी ।**
**आह्मी अहर्निशी नाम गाऊं ॥१॥**
**आह्मापासूनियां जातां नये तुज ।**
**तें हैं वर्म बीज नाम घोकू ॥२॥**
**आह्मासी तों तुझें नामचि पाहिजे ।**
**मग भेटी सहजें देणे लागे ||३ ॥**

**भोळी भक्ते आह्मी चुकलों होतों वर्म ।**
**सांपडलें नाम नामयासी ॥४॥**

अशा शक्तिभारित शब्दकळेद्वारे प्रगट करतात.

प्रत्यक्ष 'देव' तत्त्वालादेखील आपला अंकित बनवण्याइतके सामर्थ्य असलेले हे नामजपाचे साधन मोक्षप्राप्तीसाठीच पूज्य नाही तर, नामधारणेद्वारा लौकिक जीवनाचा पोत अंतर्बाह्य बदलून जाणे अपेक्षित आहे, हा भागवत धर्मविचाराने प्रवर्तित केलेला दृष्टिकोन अगदी आजही रुजलेला नाही. नामजप हे सामाजिक अभिसरणाचे प्रभावी उपकरण होय, याचे नेमके भान नामदेवांना असल्याचे रोकडे दाखले त्यांच्या विचारविश्वात आढळतात.

याज्ञिकांचा यज्ञ म्हणजे उच्चवर्णियांची मक्तेदारी होती. मात्र, नामयज्ञाचा अधिकार सर्व समाजघटकांना खुला असल्याचे खणखणीत प्रतिपादन नामदेव, **ब्राह्मण व शूद्र वैश्य नारीनर । सर्वांसी आधार नाम सत्य ॥**' इतक्या निःसंदिग्ध शब्दांत करतात. देवाचे नाम आणि रूप या



दोहोंतील अभेदाचा पुकारा करीत, याज्ञिकांच्या यज्ञवेदीच्या ठिकाणी नामवेदीची स्थापना करीत वंचित समाजघटकांना नामयज्ञाचे अधिकारी बनविले ते नामदेवांनी. निदान भक्तीच्या प्रांतातील सामाजिक अभिसरणाच्या वाटा तरी यामुळे खुल्या झाल्या.

तुर्कांनी कॉन्स्टंटिनोपलवर कब्जा केल्यानंतर तिथून परागंदा झालेल्या विद्वानांनी इटलीमध्ये येताना ग्रीक आणि लॅटिन या दोन भाषांमधील अभिजात ग्रंथसंपदाही आपल्या बरोबर आणलेली होती. इटलीमधील शांत वातावरणात ग्रीक आणि लॅटिन या भाषांमधील अभिजात ज्ञानसाठ्याचे नवदृष्टीने आकलन-अवगाहन करण्यास त्या विद्वानांना अवसर मिळून प्राचीन अशा संचित ज्ञाननिधीचे पुनरुज्जीवन त्यांद्वारे घडून आले. भागवत धर्मविचाराचा अंगीकार केलेल्या विवेकशीलांनी, जवळपास त्याच धर्तीवर, या संस्कृतीमधील प्राचीन व पूज्य गणल्या जाणाऱ्या वेदादिकांचा धांडोळा नव्या मूल्यसंचिताच्या आधारे घेण्यास सुरुवात केली. वैदिक परंपरेचा आणि पारंपरिक संचित ज्ञानाचा तत्कालीन वैदिकांनी लावलेला अर्थ आणि त्यांतून प्रचलीत झालेला लोकव्यवहार कितपत यथार्थ आहे, हे मुळापासून शोधण्याची ऊर्मी त्या उपक्रमामागे होती. त्या प्रेरणेमागील बिनीचे सरदार ठरतात नामदेव. वेदविहित तत्त्वांच्या व्यवहारात रूढ असलेल्या अर्थापेक्षा वेदांना अगदी निराळेच असे आणि मुख्य म्हणजे मानवतेचे आद्य मूल्य जतन करणारे काही तरी सांगायचे आहे, अशा निष्कर्षास नामदेव येऊन पोहोचतात. आपला हा निष्कर्ष ते,


**वेदांचे महिमान जनीं जनार्दन ।**
**आणिक वचन तेथें नाहीं ॥१॥**
**भूतदया धरा भक्तिभावे करा |**
**भजन हरिहरां वेद सांगे ॥२॥**
**सर्व हेंचि सार ब्रह्ममय खरें ।**
**आणिक दुसरे न दिसे आह्मां ॥३॥**
**नामा म्हणे समर्थ वेद तो आमुचा ।**
**सांगे नित्य जपा रामकृष्ण ॥४॥**


इतक्या निःसंदिग्ध शब्दांत मांडतात. नामस्मरणाची परिणती भूतदयेमध्ये घडून येणे अपेक्षित आहे आणि म्हणूनच वेदही नामजपाचा उपदेश करतात, हा नामदेवप्रणित वेदपरंपरेचा अन्वय भागवत धर्माने बीजारोपण केलेल्या इहवादी जीवनदृष्टीशी सुसंवादी असाच आहे.

नामसंकीर्तनाद्वारे दया, क्षमा, शांती यांसारख्या मानवी जीवनाची सुभग धारणा करणाऱ्या मूल्यांचा परिपोष लोकव्यवहारामध्ये घडून यावा, हा नामदेवांचा नामवेदाचा घोष करण्यामागील मुख्य हेतू होय. **दया शांति क्षमा हें चि पैं भूषण । नामसंकीर्तन अहर्निशी ॥**' अशा शब्दांत नामदेव नामसंकीर्तनाचा ऐहिक जगण्याचा मूल्यात्मक स्तर उंचावण्याशी असलेला संबंध स्पष्ट करतात. भागवत धर्माने प्रवर्तित केलेल्या याच मूल्यसंचयाचा प्रसार करण्यासाठी नामदेवांनी थेट पंजाबातील घुमानपर्यंत त्या काळात पायपिटी केली. नामदेवांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जन्मस्मरणाच्या निमित्ताने आज उजळणी करायची ती त्यांच्या वाणीमधून प्रसवलेल्या भागवत धर्मप्रणित जबाबदार ऐहिकतेच्या त्याच गाभामूल्यांची.

●●●


CHINA
Territory ceded by Pakistan to China in 1963
AKSAI CHIN
Control
Kargil
India-China Line of Actual Control
JAMMU & KASHMIR
CHINA






# लडाख पेच दीर्घकाळ चालणार ?

गहिनीनाथ

**भारत–चीन सीमाविवाद हा सहजासहजी सुटणारा पेच नाही. त्यासाठी संघर्ष, आक्रमकता आणि साहसवादापेक्षा संयम आणि ठामपणा याची आवश्यकता अधिक आहे. १९६२ मध्ये भारताला पराभवाची नामुष्की पत्करावी लागली होती परंतु आता परिस्थिती बदललेली आहे. १९६२ मधील भारत आणि २०२० मधील भारत यात भलामोठा फरक आहे. चिनी माध्यमेही हेच उदाहरण देऊन चीनही आता १९६२चा राहिलेला नाही आणि तेव्हापेक्षा कितीतरी पटीने अधिक समृध्द आणि प्रगत झालेला आहे हे विसरु नका असे इशारे भारताला नेहमीच देत असतात.**

जागतिक पातळीवर वर्तमानात घडणाऱ्या अनेक संघर्षाची पाळेमुळे इतिहासात दडलेली असतात. भारत-चीन सीमाविवादाबाबत असे म्हणता येईल. भारत-चीन सीमाविवाद हा इतिहासाने डोक्यावर ठेवलेला बोजा किंवा ओझे आहे असे वर्णन चीनतर्फे केले जात असते. लडाखमधील या सीमा-तणावाला पाच महिन्यांचा कालावधी झाला आहे आणि अद्याप त्यावर कोणताही तोडगा निघू शकलेला नाही. उभय बाजूंनी सैन्य माघारीची प्रक्रिया आणि आक्रमकता न दाखविण्याच्या मुद्यांवर तात्विक एकमत व्यक्त केलेले असले तरी प्रत्यक्षात ही प्रक्रिया सुरु होणे दूरच पण उलट दोन्ही बाजूंकडून या सीमाभागात सैन्याची जमवाजमव, आगामी हिवाळा व बर्फवृष्टीला तोंड देण्याच्या दृष्टीने पूर्वतयारी, शस्त्रास्त्रांचा साठा या सर्व गोष्टी चालूच आहेत. या वातावरणातच उभय बाजूंच्या लष्करी उच्चाधिकाऱ्यांदरम्यान १२ ऑक्टोबर रोजी बैठक होणार आहे. ही चर्चेची सातवी फेरी असेल. यामध्ये लष्करी अधिकाऱ्यांबरोबरच परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारीही सहभागी होणार आहेत. अर्थात या फेरीतूनही या तणावाबाबत लगेचच काही तोडगा निघेल अशी अपेक्षा कमी आहे.

या चर्चेच्या फेरीपूर्वीच चीनने आता लडाख विभागातील भारत-चीन सीमेबाबत एक नवा विवादित मुद्दा उपस्थित केला आहे. त्यानुसार चीनने १९५९ मध्ये मान्य करण्यात आलेली सीमारेषा ही प्रत्यक्ष नियंत्रण रेषा किंवा ताबा रेषा असल्याचा दावा केला आहे. भारताने हा दावा साफ फेटाळून













लावला. याचे कारण उघड आणि स्पष्ट आहे कारण ही सीमारेषा अक्साई चिनचा भूभाग चीनच्या हद्दीत असल्याचे दर्शविते. भारताने अधिकृतपणे अक्साई चिनवरील ताबा अद्याप सोडलेला नाही आणि अधिकृत भूमिका व धोरणानुसार हा भूभाग चीनने गिळंकृत करुन स्वतःच्या ताब्यात ठेवलेला आहे आणि तो परत मिळविण्याची भारताची भूमिका सर्वजाहीर आहे. त्यामुळेच १९५९ मधील सीमारेषेला प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचा दर्जा देण्याचा चीनचा प्रस्ताव भारताने फेटाळणे अपेक्षितच होते. एवढेच नव्हे तर आगामी चर्चेच्या सातव्या फेरीत चीनकडून हा मुद्दा उपस्थित करण्यात आल्यास तो तेथल्यातेथेच अमान्य करण्याचेही भारताने ठरविलेले आहे.

वर म्हटल्याप्रमाणे अनेक महत्वपूर्ण अशा घटना किंवा विवादाची पाळेमुळे इतिहासात असतात आणि अचानक वर्तमानात ती डोके वर काढत राहतात. भारत-चीन सीमाविवादाचे तसेच आहे. चीनने १९५९ मधील उभयमान्य सीमारेषेचा हवाला देऊन तीच प्रत्यक्ष नियंत्रण(ताबा) रेषा मानली जावी असा जो प्रस्ताव केला आहे त्याची वस्तुस्थिती जाणून घेणेही महत्वाचे ठरेल. कारण अगदी ही सीमारेषा प्रत्यक्ष नियंत्रण रेषा मान्य करण्याचे ठरले तरी सध्याच्या परिस्थितीत चीनने त्याचा देखील भंग करुन भारतीय हद्दीत घुसखोरी केल्याचे स्पष्ट होऊ शकते आणि अनेक तज्ञ व अभ्यासकांनी ही बाब नजरेस आणून दिलेली आहे. चीनतर्फे हा जो प्रस्ताव दिला जात आहे त्याची मूळ सुरुवात १९५६ मध्ये झालेली होती.

१९५६ मध्ये तत्कालीन चिनी पंतप्रधान चौ एन लाय यांनी ही सीमारेषा मान्य केली होती. त्यानुसार सध्या ज्या भागावरुन गदारोळ झाला व जेथे वीस भारतीय जवान मृत्युमुखी पडले ते गलवान खोरे, देपसांग, पॅन्गाँग त्सो जलाशयाचा मोठा म्हणजे चीनपेक्षा अधिक भाग, हॉटस्प्रिंग भाग, स्पँगूर जलाशय, चिपचॅप, क्कारा क्काश एवढा भाग भारताच्या हद्दीत येतो. म्हणजेच चौ एन लाय यांनी मान्य केलेल्या या सीमारेषेला गृहीत धरुन सुध्दा वरील भाग भारतीय हद्दीत येतात. म्हणजेच चीनच्याच सांगण्यानुसार तूर्तास १९५९मधील ही सीमारेषा मान्य करायचे झाल्यास चीनला अनेक परिसरातून माघार घ्यावी लागेल. १९५६ मध्ये चीनने हे नकाशे तयार केले आणि १९५९ मध्ये चौ एन लाय यांनी नेहरूंना हाच नकाशा दाखवून ही सीमारेषा मानण्याची चीनची तयारी असल्याचे सांगितले होते.


ग्वादर बंदर



अर्थातच यातून अक्साई चिनला वगळण्यात आलेले होते आणि ती बाब भारत मान्य करणे शक्यच नव्हते व ही बोलणी फिसकटली. १९६२ मध्ये चीनने सर्वप्रथम अक्साई चिनवर ताबा मिळवला आणि स्वतःचे बस्तान तेथे मजबूत केले.

अक्साई चिन आणि काराकोरम खिंड हे चीनच्या भूराजनैतिक धोरणाचे मानबिंदू आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. काराकोरममधून पाकिस्तानमार्गे ते पार इराणच्या आखातात म्हणजेच अरबी समुद्रात प्रवेश करु शकतात. पाकिस्तान व्याप्त काश्मीरमार्गे त्यांनी ग्वादर बंदरापर्यंत बांधलेला महामार्ग हे त्याचे ठळक उदाहरण आहे. त्याचप्रमाणे मध्य आशियाई देशांमधून ते पार युरोपपर्यंत जाऊ शकतात.तसा रल्वे मार्ग ही त्यांनी बांधलेला आहे व मालवाहतूकही केली जाते. त्याचबरोबर सिकिंयांग प्रांतातून



अक्साई चिन मधून त्यांनी तिबेटपर्यंत सर्व-हवामानयुक्त (ऑल वेदर रोड) तातडीने बांधून तिबेटवर ताबा मिळविणे आणि त्यावरील आपली पकड मजबूत राखणे हे दोन उद्देश साध्य केले. आता चीन हाच महामार्ग पुढे दक्षिण चिनी समुद्रापर्यंत बांधणार आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पावर त्यांचे काम सुरुही आहे.

ज्याप्रमाणे ऑक्टोपसला अनेक भुजा किंवा सोंड असतात त्याचप्रमाणे चीनचा हा विस्तारवाद आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे एकीकडे अरबी समुद्रात प्रवेश करुन आखाती देश व आफ्रिकेत प्रवेश करणे, मध्य आशियातून युरोपपर्यंत मजल मारणे आणि पार पूर्वेकडे आशियाई देशांनाही पंखाखाली घेणे असे या चिनी विस्तारवादाचे स्वरुप दिसून येते. या सर्व विस्तारवादाचा केंद्रबिंदू अक्साई चिन






आणि काराकोरम खिंड व हा हिमालयाचा परिसर आहे. त्यामुळे हा जो काल्पनिक केंद्रबिंदू मानल्यास चीनचा या परिसरावर निर्णायक ताबा मिळविण्यासाठीचा खटाटोप लक्षात येऊ शकतो.


यामागे विस्तारवादाखेरीज अन्य कोणता हेतु असण्याचे कारण आढळत नाही. गेल्या अनेक वर्षात आणि साधारणपणे दीडशे वर्षांचा इतिहास विचारात घेतला तर भारत–चीन सीमेबाबत असंख्य नकाशे व दस्तावेज तयार झालेले आढळतात. कधी चीनने, कधी भारताने तर कधी या भागात राज्य केलेल्या साम्राज्यवादी देशांनी म्हणजे ब्रिटन वगैरे देशांनी ते तयार करण्याचे प्रयत्न केले. परंतु सर्वमान्य असे नकाशे किंवा सीमाविषयक वादाचे निराकरण करणारे दस्तावेज तयार होऊ शकले नाहीत व परस्परांचे नकाशा फेटाळण्यातच काळ गेलेला आहे. १९६२ नंतरचा काळ अधिक विचारात घ्यावा लागेल आणि त्यासंदर्भात विचार केल्यास या हिमालयीन परिसराची भौगोलिक दुर्गमता लक्षात घेऊन चीनने हळूहळू आणि अगदी अल्प प्रमाणात घुसखोरी व स्वतःच्या सीमाभागाचे विस्तारीकरण सुरु ठेवले. वाद निर्माण झाल्यानंतर कोणतेतरी ऐतिहासिक दस्तावेज दाखवून घुसखोरीचे समर्थन करण्याचे चीनचे नेहमीचे धोरण राहिले. मात्र भारताने सातत्याने चोख सावधगिरी दाखवून चीनच्या प्रयत्नांना बहुतांशाने पायबंद

घातला होता. आता खरेतर चीन भारताच्या व्यवस्थित तावडीत आलेला आहे आणि जर १९५६-५९ चा नकाशा दाखवून (जो चौ एन लाय यांनी मान्य केलेला होता) चीन संबंधित सीमारेषेचा प्रस्ताव करीत असेल तर सीमाविवादावर अंतिम तोडगा निघेपर्यंत ही नकाशा व त्यातील सीमारेषा मान्य करुन गलवान खोरे, पॅन्गाँग त्सो, हॉटस्प्रिंग भागातून चीनला माघारी जाण्यास सांगता येणे शक्य होईल काय असा


तणाव गुणात्मक दृष्टीने म्हणजे सगुण -प्रत्यक्ष स्वरुपात कमी कसा करता येईल यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल ही बाब निर्विवाद आहे. तेवढा संयम दोन्ही बाजू दाखविणार काय असा प्रश्न आहे.

भारत-चीन सीमा विवाद आणि उभय देशातील संबंध याबाबतही काही ऐतिहासिक बाबींचे संदर्भ व महत्व लक्षात घ्यावे लागेल. अनेक अभ्यासकांनी भारत-


ग्यालो थोंडूप


दलाई लामा


जॉन एफ केनेडी


माओ त्सेतुंग

एक प्रश्न आहे. त्याचे उत्तर सोपे नाही!

भारत-चीन सीमाविवाद हा सहजासहजी सुटणारा पेच नाही. त्यासाठी संघर्ष, आक्रमकता आणि साहसवादापेक्षा संयम आणि ठामपणा याची आवश्यकता अधिक आहे. १९६२ मध्ये भारताला पराभवाची नामुष्की पत्करावी लागली होती परंतु आता परिस्थिती बदललेली आहे. १९६२ मधील भारत आणि २०२० मधील भारत यात भलामोठा फरक आहे. चिनी माध्यमेही हेच उदाहरण देऊन चीनही आता १९६२चा राहिलेला नाही आणि तेव्हापेक्षा कितीतरी पटीने अधिक समृध्द आणि प्रगत झालेला आहे हे विसरु नका असे इशारे भारताला नेहमीच देत असतात. त्यामुळे हा स्पर्धात्मक प्रचार चालूच राहील. प्रत्यक्षात उभय बाजुंच्या नेतृत्वाला सामोपचाराने



चीन मधील १९६२च्या संघर्षावर विश्लेषणे केलेली आहेत. संरक्षणविषयक अध्ययन व विश्लेषण संस्थेच्या वतीने प्रकाशित व सुनील खत्री लिखित 'इव्हेंट्स लीडींग टु सायनो-इंडियन कॉन्फ्लिक्ट ऑफ १९६२' या मोनोग्राफ मध्ये एक वेगळ्या पैलूवर प्रकाश टाकलेला आढळतो. सर्वसाधारणपणे या भारत-चीन संघर्षातील सीआयए (सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी) या अमेरिकन गुप्तचर संघटनेच्या कारवायांची माहिती उद्धृत करण्यात आलेली आहे. यासंदर्भात 'सीआयए'ने अप्रकाशित किंवा गोपनीय ठेवलेल्या त्यांच्या तत्कालीन अहवालांचे जे प्रकाशन अलीकडच्या काळात केले त्यांचे संदर्भही देण्यात आले आहेत. खळबळजनक भाग म्हणजे दलाई लामा यांचे

बंधू ग्यालो थोंडूप यांची या संपूर्ण काळातील भूमिका कशी वादग्रस्त होती याचा उल्लेखही त्यात आहे. किंबहुना थोंडुप हे सीआयएचे हस्तक म्हणूनच कसे वावरले असेच त्यावरुन स्पष्ट होताना आढळते. थोंडुप यांनी अनेक वर्षे कॅलिम्पाँग येथे मुक्काम केला होता. तेथून ते त्यांच्या कारवाया करीत असत. त्यांना सीआयएची पूर्ण मदत असल्याची माहिति प्रकाशात आली आहे. सीआयएच्या कारवाया आणि तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष जॉन एफ केनेडी यांच्या भूमिकेची माहिती देणारे पुस्तक अमेरिकन लेखक ब्रूस रिडेल यांनी लिहिले आहे. ‘जेएफकेज फरगॉटन क्रायसिस – तिबेट, द सीआयए अँड सायनो इंडियन वॉर’ असे या पुस्तकाचे नाव आहे. खुद्द थोंडुप यांनी देखील ‘नूडल मेकर ऑफ कॅलिंपाँग – द अनटोल्ड स्टोरी ऑफ माय स्ट्रगल’ या शीर्षकाने लिहिलेले आत्मवृत्त देखील याबाबतची माहिती पुरवतात. थोंडुप यांचा वापर करुन सीआयएने तिबेटमधील सशस्त्र उठावाला भारताची मदत आहे आणि फूस आहे अशी यशस्वी वातावरणनिर्मिती केली होती. त्यामुळे चीन आणि चिनी नेतृत्व भारतावर व विशेषतः नेहरूंवर प्रचंड संतप्त झालेले होते. चौ एन लाय आणि इतरही चिनी नेत्यांनी



क्रुश्चेव



निक्सन



किसिंजर



पंडित नेहरू



भारतातून तिबेटमधील उठावाला मदत केली जाते व तेथे कारस्थान शिजवले जाते असे आरोप केले होते. भारताने थोंडुप यांच्या कारवायांना आपल्या परीने आळा घालण्याचा प्रयत्न केला होता परंतु परिस्थिती अशी चिघळत गेली की कुणाच्या हातात काही उरलेच नाही.

अमेरिकेला यात रस असण्याचे कारण काय असा प्रश्न उपस्थित होतो. या कालखंडात जगात विविध ठिकाणी प्रस्थापित झालेल्या कम्युनिस्ट राजवटी व त्यातून आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचा विस्तार रोखणे आणि त्या चळवळीत फाटाफूट करुन ती कमकुवत करणे यावर अमेरिका आणि सीआयएने लक्ष केंद्रित केले होते. यावेळी केनेडी अमेरिकेचे अध्यक्ष होते आणि याच सुमारास क्युबन मिसाईल पेचप्रसंगही झालेला होता हेही लक्षात ठेवावे लागेल. माओ त्से तुंग यांच्या काळात सोव्हिएत युनियन(रशिया) आणि चीन यांचे संबंध फारसे सौहार्दपूर्ण नव्हते. किंबहुना चिनी नेते रशियाचे तत्कालीन प्रमुख क्रुश्चेव यांना भेटण्यास गेले असता या चिनी नेत्यांनी भारताविरुध्द कागाळ्या केल्या आणि तिबेटमध्ये भारताच्या चिथावणीने उठाव केला जात असल्याचे म्हटल्यावर क्रुश्चेव यांनी या नेत्यांना

अप्रत्यक्षपणे परिस्थिती वेगळी असल्याचे सुचविले आणि रक्तरंजित संघर्षाने हा प्रश्न कधीच सुटणार नसल्याचे बजावले असल्याचे पुरावे पुढे आले आहेत व त्याचा उल्लेख या मोनोग्राफ मध्ये देखील आहे. याचा अर्थ रशियन नेत्यांना भारत व चीनच्या दरम्यान कोण काड्या करीत आहे याची कल्पना असावी असा कयास बांधायला जागा आहे. परंतु या कारवायांना भारत आणि चीन दोघेही बळी पडले. सुरुवातीच्या काळात अमेरिकेने अमेरिका-पाकिस्तान-चीन असा गट स्थापन करण्यास पुढाकार घेतला. चीन व कम्युनिस्ट रशियाची फारकत झालेलीच होती. निक्सन व किसिंजर यांनी चीनला पंखाखाली घेण्यास सुरुवात केली आणि अमेरिकेच्या नेतृत्वाने ती प्रक्रिया चालू ठेवली. परंतु जग व जागतिक राजकारण हे स्थिर नसते. त्यात सतत स्थित्यंतरे होत राहतात. आज ज्या पाकिस्तान व चीनच्या मदतीने अमेरिकेने भारताला वाळीत टाकलेले होते तो चीन डोक्यावर बसल्यानंतर अमेरिकेने तत्काळ भारताबद्दलची भूमिका बदलली. पाकिस्तानला झटकून टाकले आहे. परंतु यामुळे चीन पुन्हा बिथरणार हे स्पष्टच आहे. म्हणजेच १९६२ मध्ये वेगळ्या कारणासाठी अमेरिकेने खेळ करुन भारत-चीन संबंध बिघडवले होते आणि आता २०२० मध्ये भारतीय नेतृत्व नको इतके अमेरिकेच्या आहारी गेलेले असल्याने चीनचा जळफळाट होणे स्वाभाविक झाले आहे. परंतु जो मधला मार्ग आतापर्यंतच्या भारतीय नेतृत्वाने स्वीकारलेला होता तो महत्वाचा होता. त्यानुसार अमेरिका असो किंवा चीन, सर्वांशी समान संबंध ठेवण्याचे भारताचे धोरण राहिले. चीन हा निकटचा शेजारी असल्याने त्यांच्याबरोबरच्या संबंधांची आखणी करताना द्विपक्षीय मुद्यांना प्राधान्य देण्याची भूमिका आतापर्यंतच्या राज्यकर्त्यांनी घेतली आणि त्यानुसार चीनला शांत ठेवले. परंतु वर्तमान राज्यकर्ते नको इतके अमेरिकेच्या कच्छपि लागून त्यांच्या तालावर नाच करु पहात आहेत. त्याचा फटका बसणे अपरिहार्य आहे. परराष्ट्र धोरण स्वतंत्र









राखणे व ते कुणा महासत्तेमुळे प्रभावित होऊ न देणे याचे पथ्य पाळले जात नसल्यानेच हा पेचप्रसंग निर्माण झालेला आहे. यामध्ये भारताचे परराष्ट्र धोरण स्वतंत्र आणि कुणाही महासत्तेशी संबंधित नसल्याचे स्पष्ट झाले तर बऱ्याच गोष्टी सुरळीत होऊ शकतात. रशियाने जशी मध्यस्थाची भूमिका बजावली तसेच अनेक भारताचे हित चिंतणारे देशही मदत करु शकतील. त्यामुळेच संघर्षापेक्षा सामोपचाराने या पेचातून मार्ग काढण्याकडे कल ठेवणे कधीही उपकारकच ठरेल. चीनला १९८३-८४ मध्ये जेव्हा भारत-चीन संबंध सुरळीत करण्याच्या प्राथमिक हालचाली सुरु झाल्या व राजीव गांधी यांनी चीनला ऐतिहासिक भेट दिली. त्यावेळी उभय देशांच्या परराष्ट्र मंत्रालयांच्या पातळीवर झालेल्या बोलण्यांमध्ये अक्साई चिनवरील चीनचा ताबा मान्य करण्याच्या बदल्यात अरुणाचल आणि त्या परिसरातील प्रदेशावरील ताबा चीनने सोडण्याच्या तोडग्यावर चर्चा झाली होती. सुब्रह्मण्यन स्वामी यांच्यासारखे नेते व तज्ञ या तोडग्याचा आजही पुरस्कार करतात. परंतु त्यात प्रगती झाली नाही. १९९३ मध्ये जेव्हा सीमाभागात शांतता व स्थिरता राखण्याचा करार करण्यात आला आणि सीमाविवाद हा विविध पातळ्यांवरील चर्चेच्या आधारे सोडविण्याचे मान्य करण्यात आले होते. परंतु त्यानंतर देखील चीनने कधीच ठोस असे नकाशे व दस्तावेज सादर करण्याचे काम केलेले नाही. दरवेळी काहीतरी नवीन दस्तावेज सादर करुन या प्रश्नावरील बोलणी चीनने टाळण्याचाच प्रयत्न केला आहे. त्यामुळेच चीनची ही भूमिका व धोरण लक्षात ठेवून विवादित सीमाभागात चीनला पुढे घुसू न देणे आणि आहे त्याच ठिकाणी त्यांना रोखून धरणे एवढेच धोरण भारताला तूर्तास अवलंबिता येणार आहे.



यानंतर चर्चेचे गुऱ्हाळ चालवून तोडग्यासाठी प्रयत्न करावे लागतील.


तूर्तास एवढेच हाती आहे!

●●●




# सरकारचे लज्जाहीन आचरण विधेयकांच्या मंजुरीचा सपाटा

**आकाश**
नवी दिल्ली



भारतीय राज्यघटनेत सातव्या विभागात केंद्र, राज्य यांच्या अधिकारात येणाऱ्या तसेच दोघांच्या सामाईक अधिकारात येणाऱ्या विषयांची यादी आहे. त्यानुसार कृषि हा पूर्णपणे राज्यांच्या अधिकारातील विषय ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळेच काही विरोधी सदस्यांनी या कायद्यांबाबत प्रश्न उपस्थित करताना केंद्र सरकारला हे कायदे करण्याचा अधिकार आहे काय असा प्रश्नही केला. संसदेने राज्यांच्या अधिकारातील विषयावर कायदे केल्यास ते बंधनकारक असल्याची स्थिती असली तरी त्यामध्ये राज्यांबरोबर सल्लामसलतीची प्रक्रिया करण्याची आवश्यकताही समाविष्ट असते.






कृषि सुधारणाविषक तीन आणि कामगारक्षेत्राशी निगडित सुधारणांविषयक दोन अशी पाच विधेयके सरकारने अनाकलनीय अशा घाईने संसदेच्या करोनाग्रस्त अल्पकालीन पावसाळी अधिवेशनात मंजूर केली. मंजूर केली म्हणण्यापेक्षा विरोधी पक्षांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अथवा विधेयकांच्या पुरेशा छाननीला वाव न देता बळजबरीने रेटून आणि सर्व लोकशाही संकेत, नियम यांना धाब्यावर बसवून मंजूर केली हे आता स्पष्ट झाले आहे. त्याचे दृक्-श्राव्य पुरावे देखील उपलब्ध आहेत आणि वृत्तपत्रांनी त्यावर आधारित बातम्याही दिलेल्या आहेत. सरकारच्या या जबरदस्तीने विधेयके मंजूर करण्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षांनी संसद बहिष्काराचे अस्त्र उपसले तरी सरकारने त्याबद्दल कोणतीही संवेदनशीलता न दाखवता विधिनिषेधशून्य आणि लज्जाहीन आचरणाचा वस्तुपाठ ठरावा अशा रीतीने विरोधी पक्षांच्या अनुपस्थितीचा (गैर)फायदा घेऊन कामगारविषयक महत्वाची विधेयकेही बिनदिक्कत मंजूर करुन घेतली. वर, हे पावसाळी अधिवेशन अल्पकालीन असले तरी उत्पादक ठरले अशी निगरगट्ट निवेदने करण्यासही सरकारने मागेपुढे पाहिले नाही. संसदीय लोकशाहीच्या सर्व संकेतांना पायदळी तुडवून सरकारने एक नवाच विक्रम केला असे म्हणावे लागेल.

प्रथम राज्यसभेतल्या गोंधळाची दखल घ्यावी लागेल. अशा गोंधळात आणि विरोधी पक्षांच्या विविध मागण्यांकडे बिनदिक्कत आणि सपशेल दुर्लक्ष करुन ही विधेयके संमत करण्यात आली. येथे उपराष्ट्रपति आणि राज्यसभेचे सभापति वेंकय्या नायडू यांच्या निवेदनाचा संदर्भ देणे संयुक्तिक ठरेल. ११ ऑगस्ट २०१७ रोजी राज्यसभेचे सभापति म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतली. त्यानिमित्त झालेल्या अभिनंदनपर भाषणांच्या उत्तरात त्यांनी सभागृहात गोंधळ होऊ न देण्याची अपेक्षा व्यक्त करतानाच गोंधळात आणि चर्चेविना विधेयक मंजूर करण्याच्या बाजुने ते नाहीत असे स्पष्ट म्हटले होते. हे सभागृह चर्चा, वादविवाद आणि त्यातून निर्णय करण्यासाठी आहे, गोंधळाने बंद पाडण्यासाठी नव्हे अशी भावनाही त्यांनी कै.प्रणव मुखर्जी यांचा हवाला देऊन व्यक्त केली होती. दुर्दैवाने त्यांचे सहाय्यक आणि उपसभापति हरिवंश यांनी या त्यांच्या भावनेची राखरांगोळी केली असे म्हणायला लागेल. एवढी महत्वाची व देशातील साठ टक्के जनता अजुनही ज्या व्यवसायावर अवलंबुन आहे त्या शेतीशी निगडित विधेयकांवर सदस्यांना बोलण्याची पुरेशी संधी देखील देण्यात आली नाही. लहान पक्षांना बोलण्यासाठी कमी वेळ मिळतो. परंतु संसदेत अशी प्रथा आहे की एखाद्या महत्वाच्या विषयावर तपशीलाने









चर्चा करण्यासाठी लहान पक्षांना देखील बोलण्यासाठी पुरेसा वेळ दिला जातो. परंतु वर्तमान राजवटीत हे सर्व बंद झालेले आहे. एखादा सदस्य बोलायला लागला की उपसभापति त्याला प्रथम 'तुम्हाला फक्त दोन मिनिटे आहेत' असे सांगून त्या सदस्याचा जोरच घालवीत असत. काही सदस्यांना तर त्यांनी एका मिनिटातच बोला म्हणूनही नामोहरम केले. याचे कारण काय तर विधेयके त्याच दिवशी संमत करायची होती. जर संमत झाली नसती तर आकाश कोसळणार होते. या अशा पध्दतीने विरोधी पक्षांना या विधेयकातील त्रुटी, अनुचित तरतुदी यावर प्रकाश टाकण्याची किंवा सरकारला त्याबद्दल जाब विचारण्याची संधीच न देण्याचे धोरण अवलंबिले गेल्याने विरोधी सदस्य संतप्त होणे स्वाभाविक होते.



विधेयकातील महत्वाचे मुद्दे मांडण्याची संधी न मिळाल्याने असा संताप होणे अत्यंत नैसर्गिक होते. त्यामुळेच अक्षरशः आगतिक होऊन ते पीठासीन अधिकाऱ्यांच्या म्हणजेच सभापतींच्या आसनापुढे (त्यावेळी उपसभापति पीठासीन होते) जाऊन आपला निषेध प्रकट करु लागले होते. या पार्श्वभूमीवरच विधेयकांच्या मंजुरीच्या वेळचे उपसभापतींचे आचरण चकित करणारे होते. आता तर त्यांचे आचरण वादग्रस्त असल्याचे यासंदर्भातील चित्रफितींवरुन स्पष्ट होत असल्याच्या बातम्याही अग्रगण्य वृत्तपत्रांनी दिल्या आहेत.



सर्वप्रथम याठिकाणी एक बाब निश्चितपणे विचारात घेतली पाहिजे की सरकारने एकाचवेळी ही विधेयके सभागृहापुढे मंजुरीसाठी आणली. एवढी दूरगामी परिणाम करणारी विधेयके मंजुरीसाठी आणल्यानंतर त्यावर किमान साधाकबाधक चर्चा अपेक्षित होती. मुळात ही विधेयके एवढी महत्वाची असल्याने संसदीय स्थायी समिती किंवा 'सिलेक्ट कमिटी'कडे छाननीसाठी पाठविणे आवश्यक होते. परंतु बेलगाम सरकारला त्यांची आवश्यकताच वाटली नाही. त्यांचे उद्दिष्ट केवळ ही विधेयके येनकेन प्रकाराने मंजूर करणे एवढेच मर्यादित होते. त्यामुळे त्यांनी सर्व संसदीय संकेत, प्रथा व नियम बिनदिक्कतपणे उधळून लावले. राज्यसभा

आणि लोकसभेचा एक नियम आहे की एखादे विधेयक, त्याला दिलेली दुरुस्ती आणि इतरही अनेक संसदीय विषय असतात की ज्यावर एखाद्या सदस्याने जरी मतदान किंवा मतविभाजन मागितले तर ते देण्याचे बंधन असते. येथे तर अतिमहत्वाची अशी शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित विधेयके असताना विरोधी पक्षांचे सदस्य त्यांच्या दुरुस्त्या मांडणे अपेक्षितच होते. त्याचप्रमाणे केवळ आवाजी मतदानाने त्या दुरुस्त्या फेटाळून लावल्यानंतरही विधेयकाच्या अंतिम मंजुरीच्या वेळी विरोधी पक्षांनी जर मतविभाजनाची मागणी केली तर ती देण्याचे बंधन व जबाबदारी पीठासीन अधिकाऱ्याची असते. तो त्या मतविभाजनाला नकार देऊ शकत नाही. प्रत्यक्षात काय घडले ? हरिवंश हे गोंधळ करणाऱ्या विरोधी पक्षांच्या सदस्यांकडे बघायलाच तयार नव्हते आणि केवळ सत्तापक्षाच्या सदस्यांकडे बघत त्यांनी विधेयक मंजुरीची प्रक्रिया पार पाडली. या त्यांच्या आचरणामुळेच नियमपुस्तक फाडणे, माईकशी हिसकाहिसकी करण्याचे प्रकार काही सदस्यांनी केले. विरोधी पक्षांबद्दल इतकी बेपर्वाई क्वचितच दाखवली गेली असे नाईलाजाने म्हणावे लागते.

राज्यसभेतला हा गोंधळ अजिबात अभूतपूर्व किंवा महाभयंकर असा नव्हता. किंबहुना भूतकाळात याहून तीव्र व प्रखर असे गोंधळ राज्यसभा काय किंवा लोकसभेने अनुभवले आहेत. महिला विधेयकावर सभागृहाच्या मध्यभागी असलेल्या टेबलावर ओबीसी सदस्यांनी चढून ते विधेयक टरकावले होते आणि गोंधळ घातलेला होता. राजनीतीप्रसाद या सदस्याने तर मंत्र्यांच्या हातातून विधेयक हिसकावून ते टरकावले होते. हे राज्यसभेत घडले. परंतु २०१३ मध्ये लोकसभेत आंध्र प्रदेशाचे विभाजन करुन तेलंगणा आणि उर्वरित आंध्रची निर्मिती करण्याच्या विधेयकाच्या वेळी तर विभाजनाला विरोध करणाऱ्या सदस्यांनी विधेयक मंजूर होऊ नये यासाठी मतदानाच्या वेळीच सभागृहाच्या मध्यभागी येऊन नुसता केवळ धुडगूस घातला नव्हता तर एका सदस्याने खिशातून 'पेपर स्प्रे' काढून सर्वत्र फवारला










होता. स्वसंरक्षणासाठी महिला हा स्प्रे वापरतात आणि यात मिरी व तिखटासारखा अत्यंत झणझणीत असा फवारा असतो आणि त्याच्या फवाऱ्याने हल्ला करणारा काही काळ खोकल्याने हैराण होतोच परंतु त्याला श्वास घेणेही अवघड होऊन तो नामोहरम होतो. जर एखाद्याला श्वसनाची समस्या असेल तर हा स्प्रे प्राणघातकही ठरु शकतो. तर या सदस्याने असा फवारा फिसकारल्यावर पत्रकारकक्षातील पत्रकार आणि सभागृहातील सदस्यांना त्याचा प्रचंड त्रास झाला.



नाकातोंडातून पाणी वाहू लागले होते आणि श्वासाला त्रास अनेकांना झाला तर अनेकजण खोकल्याने ठसक्याने हैराण झाले होते. नरसिंह राव यांच्या काळात तेलगु देशमचा एक गट फुटला होता आणि त्यांनी राव यांच्याशी हातमिळवणी केली. या पक्षफुटीने संतप्त तेलगु देशमच्या सदस्यांनी लोकसभेतच या फुटीरांवर चक्क शारीरिक हल्ला केला. त्यावेळच्या धक्काबुक्कीत एका सदस्याला ठोसा बसल्याने तो चक्क बेहोष झाला होता. बोफोर्सवरील वादात एकदा झालेल्या गोंधळात काही सदस्यांनी महासचिवांच्या टेबलावरील भलीमोठी काच उचलून खाली आपटली होती आणि तिचा चक्काचूर केला होता. परंतु एवढे होऊनही कुणी कुणाला निलंबित केले नव्हते किंवा अशी




कारवाईची मनोवृत्ती बाळगली होती. या घटनांच्या पार्श्वभूमीवर हा गोंधळ म्हणजे अगदीच मचूळ किंवा पाणचट मानावा लागेल. थोडक्यात 'गोंधळ करता आहात, पाहून घेऊ' ही मनोवृत्ती तेव्हा कुणी दाखवली नव्हती. आता दिवस फिरलेले आहेत.

विरोधी पक्षांच्या विरोधाची






तमा न बाळगता सरकारने ही विधेयके मंजूर केल्यानंतर देखील सरकारचे समाधान झाले नव्हते. सरकारने आसनापुढे येऊन गोंधळ करणाऱ्या सदस्यांना सभागृहातून आठवड्यासाठी निलंबित केले. ज्यांनी गेली अनेक वर्षे संसदेच्या कामकाजाचे वार्तांकन केले आहे त्यांच्या म्हणण्यानुसार निलंबनाची कारवाई करण्याइतका हा गोंधळ मोठा नव्हता. परंतु सरकारला त्याचा एक राजकीय मुद्दा बनवायचा असल्याने त्यांनी त्याचे भांडवल करण्याचे पध्दतशीर प्रयत्न केले. एवढ्यावरच सरकार थांबले नाही तर यानंतर लागोपाठ दोन दिवस पाच-पाच, सहा-सहा केंद्रीय मंत्री एकत्रित जमून विरोधी पक्षांवर तोंडसुख घेत होते. ज्या दिवशी गोंधळाचा प्रकार घडला त्याच दिवशी सायंकाळी संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांच्या नेतृत्वाखाली आणखी पाच केंद्रीय मंत्री जमले आणि त्यांनी विरोधी पक्षांवर यथेच्छ टीका केली. हेही कमी झाले म्हणून




की काय दुसऱ्या दिवशी या आठ सदस्यांना निलंबित केल्यानंतर पुन्हा कायदामंत्री रविशंकर प्रसाद, संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी, रेल्वेमंत्री पियुष गोयल यांनी सरकारी व्यासपीठावरुन म्हणजेच केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीची माहिती देण्यासाठी बोलाविलेल्या पत्रकार परिषदेत पुन्हा विरोधी पक्षांवर मनसोक्त तोंडसुख घेतले. रविशंकर प्रसाद आणि निर्मला सीतारामन यांच्या चेहऱ्यावर समोरच्यांबद्दल विलक्षण तुच्छतेचे घमेंडखोर भाव सतत असतात. त्यांची भाषा, चेहऱ्यावरचे हावभाव व देहबोली यात अहंकार ठायीठायी भरलेला आढळतो. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीची माहिती देण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या पत्रकार परिषदेत राजकीय मुद्द्यांवर बोलण्याचे टाळण्याचा प्रघात आहे. परंतु वर्तमान सरकारमध्ये सर्वच सभ्य व शिष्टसंमत प्रथा व प्रघातांना धाब्यावर बसविण्याचे सर्रास प्रकार सुरु असल्याने रविशंकर

यांनी या व्यासपीठावरुन विरोधी पक्षांवर टीका करणे काही नवे नव्हते.

राज्यसभेतल्या प्रसंगाचा त्यांनी किमान तीन वेळा पुनरुच्चार करुन विरोधी पक्षांवर टीका केली. प्रत्येक टीकास्त्राच्या वेळी, 'आम्ही या घटनेचे राजकीय भांडवल करु इच्छित नाही' असे पालुपदही ते लावत होते आणि पुन्हापुन्हा हा विषय काढून विरोधी पक्षांची यथेच्छ बदनामी करीत होते. हरिवंश म्हणजे बिहारचे मूर्तिमंत प्रतीक असल्याचे चित्र उभे करण्याचा भंपकपणा देखील त्यांनी राजकारणच करीत राहिले आणि हास्यास्पद होत राहिले.

हे सरकार केवळ शेतीविषयक विधेयके मंजूर करुन थांबले नाही. कामगारवर्गासंदर्भातील विधेयकेही त्यांनी विरोधकांच्या बहिष्काराचा फायदा उठवून मंजूर करुन घेतली. यामध्ये कामगार कपात, सामाजिक सुरक्षा यासंदर्भातील नव्या तरतुदींचा समावेश आहे. ही विधेयके देखील तपशीलवार चर्चेखेरीज संमत करण्यात आली. या सरकारने विधेयकांची निःपक्षपणे संसदीय स्थायी समित्यांकडून छाननी करण्याची प्रक्रिया पूर्णपणे थांबवली




केला आणि बिहारचे मतदार विरोधी पक्षांना माफ करणार नाहीत असा इशाराही त्यांनी दिला. हे सर्व करताना ते वारंवार काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाला बिहारच्या निवडणुकीत याचा जाब द्यावा लागेल असेही म्हणत होते. विरोधी पक्षांना बदनाम करण्याच्या या धुंदीत रविशंकर हे विसरत होते की बिहारमध्ये काँग्रेस नगण्य आहे आणि राष्ट्रीय जनता दलाचा एकही सदस्य गोंधळात सामील नव्हता. परंतु 'आम्ही नाही बुवा राजकारण करंत' या मंत्राचा जप करताना ते निखालस

आहे. त्यामुळे या सरकारला पाहिजे तशी विधेयके मांडणे आणि बहुमताच्या बळावर ती मंजूर करणे असा एककल्ली आणि हुकुमशाही कारभार सुरु आहे.

सल्लामसलत, विचारविनिमय याचे या सरकारला वावडे किंवा ॲलर्जी असावी. त्यामुळेच विरोधी पक्षांच्या बहिष्काराने एखाद्या सरकारला खजीलपणा आला असता परंतु या सरकारने उलट विरोधी पक्ष नाही हे चांगलेच झाले अशा भावनेने विधेयके मंजूर करण्याचा सपाटा लावला.





यामध्ये संसदीय लोकशाही, लोकशाही प्रक्रिया यांना सरसकट फाट्यावर मारण्यात आले.

शेतकरीविषयक विधेयकांमुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यासाठीच त्यावर विरोधी पक्षांना साधाकबाधक चर्चा हवी होती. कृषि हा विषय राज्यांच्या अधिकारक्षेत्रातील आहे. भारतीय राज्यघटनेत सातव्या विभागात केंद्र, राज्य यांच्या अधिकारात येणाऱ्या तसेच दोघांच्या सामाईक अधिकारात येणाऱ्या विषयांची यादी आहे. त्यानुसार कृषि हा पूर्णपणे राज्यांच्या अधिकारातील विषय ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळेच काही विरोधी सदस्यांनी या कायद्यांबाबत प्रश्न उपस्थित करताना केंद्र सरकारला हे कायदे करण्याचा अधिकार आहे काय असा प्रश्नही केला. संसदेने राज्यांच्या अधिकारातील विषयावर कायदे केल्यास ते बंधनकारक असल्याची स्थिती असली तरी त्यामध्ये राज्यांबरोबर सल्लामसलतीची प्रक्रिया करण्याची आवश्यकताही समाविष्ट असते. या विधेयकांबाबत केंद्राने राज्यांबरोबर



किती प्रमाणात चर्चा केली हे एक गूढच आहे. त्यामुळेच केंद्राने त्यांच्या मनाने हे कायदे आणले असे म्हणावे लागते. याबाबत विचारविनिमयाची प्रक्रिया अदृष्य राहिली हेही स्पष्ट होते. या कायद्यांमधील तरतुदींबाबत अनेक विवाद उत्पन्न झाले आहेत आणि ते बराच काळ चालूही राहतील. सरकारने याबाबत निगरगट्ट धोरण आखलेले आहे आणि त्यानुसार शेतकऱ्यांना आंदोलन करु द्यायचे ते आंदोलन करतील करतील आणि थकून नाईलाजास्तव पुन्हा शेती करायला लागतील असा अत्यंत निष्ठूर असा कावेबाजपणा यामागे आहे. त्यामुळे सरकार या विषयावर अजिबात माघार घेणार नाही हे स्पष्ट आहे.

यातून ज्या खासगी खरेदीदारांचे सरकारला भले करायचे आहे ते होत राहील आणि त्याचाच प्रचार व प्रसार करुन हे कायदे कसे यशस्वी झाले याचे ढोलही पिटले जाऊ





शकतात. या प्रकरणी काही राज्ये आणि काही व्यक्तींनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावलेला आहे. तेथे न्याय मिळेल काय याबद्दलही प्रश्नचिन्ह आहेच.

कृषिविषयक तथाकथित सुधारणांची ही विधेयके जोरजबरदस्तीने मंजुरीचे राजकीय परिणाम आणि प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविकच होते. आजही शेती आणि शेतकरी हा भारतीय समाज व अर्थव्यवस्थेचा आणि पर्यायाने राजकारणाचा एक निर्णायक घटक मानला जातो. साठ टक्के समाज अद्याप ग्रामीण आणि शेतीशी निगडित आहे. एवढ्या मोठ्या वर्गाला एका झटक्यात सुधारणांचे डोस पाजणाऱ्या या सरकारला त्याचे फटके बसण्यास सुरुवात झाली. भाजपने आघाडीच्या राजकारणाला सुरुवात केल्यापासूनचे दोन राजकीय पक्ष त्यांचे निकटचे मित्रपक्ष म्हणून ओळखले जातात. शिवसेना आणि अकाली दल हे ते दोन पक्ष. शिवसेनेने आधीच भाजपबरोबरचा घरोबा



प्रकाशसिंग बादल



सुखबीरसिंग बादल



हरसिम्रत कौर



कॅप्टन अमरिंदर सिंग

तोडला आहे. अकाली दलाने या शेतीविषयक विधेयकांचे निमित्त करुन भाजप व भाजपआघाडीशी संबंध संपवले. यामध्ये अकाली दलाचे राजकीय हिशोब निश्‍चित आहेत. विशेषतः प्रकाशसिंग बादल हे राजकीय पटलावरुन अस्तंगत होत असताना त्यांचे चिरंजीव सुखबीरसिंग बादल व सुखबीर यांच्या पत्नी हरसिम्रत कौर यांनी पक्षाची सूत्रे ताब्यात घेतली आहेत. दोघेही लोकसभेचे सदस्य आहेत. सुखबीर अकाली दलाचे अध्यक्ष आहेत. शेतकरी विधेयकावर हरसिम्रत कौर यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देऊन हौतात्म्य पत्करले खरे परंतु यानंतर ते व त्यांचे पति सुखबीरसिंग यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकांना मान्यता दिल्यानंतर त्या विधेयकाचे केलेले समर्थन व स्वागत यांच्या चित्रफिती काँग्रेसने सोशल मीडियावर प्रसारित केल्याने त्यांचे राजीनामानाट्य फुसके ठरल्याचे स्पष्ट झाले. अर्थात अकाली दल सोडून गेल्याने भाजपला फारसा फरक पडणार नसल्याने सुंठीवाचून खोकला गेल्याची भावनाच व्यक्त होत आहे. सुखबीर व हरसिम्रत कौर या दांपत्याने एवढी त्यागाची भूमिका घेण्यामागे पंजाबमधील स्थानिक राजकारणाचा भाग मोठा आहे. अकाली दल हा मुख्यत्वेकरुन पंजाबमधील ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष मानला जातो. परंतु गेल्या विधानसभा निवडणुकीत अमरिंदरसिंग यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने ग्रामीण भागातही मुसंडी मारुन अकाली दलाच्या पायाला





सुरुंग लावल्याने अकाली दलास शेतकऱ्यांच्या या विधेयकांवर नाईलाजास्तव का होईना हौतात्म्याची भूमिका पत्करावी लागली. अन्यथा त्यांचा ग्रामीण भागातला उरलासुरलाही पाया नाहीसा होण्याची धास्ती त्यांना वाटू लागली होती. त्यामुळे या विधेयकांच्या निमित्ताने भाजपने आणखी एक दीर्घकालीन मित्रपक्ष गमावला.

वर्तमान राज्यकर्त्यांना संसदेचे महत्व खरोखर वाटते काय हा प्रश्न आता भेडसावू लागला आहे. केवळ संसदेच्या पायरीवर डोके ठेवण्याचा अभिनय आणि त्याचे सार्वत्रिक प्रसारण करण्याने संसदीय निष्ठा व्यक्त होत नाही. व्यापक समाज व देशहिताचे कायदे करणे ही संसदेची प्रमुख जबाबदारी असेल तर त्यासाठी तेवढीच व्यापक चर्चाही आवश्यक असते. काही मुद्दे विवादित असतील तर विशेष स्वरुपाच्या समित्यांच्या नियुक्तीची तरतूद देखील संसदीय नियमावलीत उपलब्ध आहे. परंतु देशहित केवळ आम्हालाच समजले आहे आणि विरोधी पक्ष केवळ देशहितविरोधी आहेत अशी एकारलेली भूमिका असलेले सरकार आणि नेतृत्व संसदीय लोकशाहीशी निष्ठावान असल्याचे मानता येणार नाही. विरोधी पक्षांनी केलेल्या विधायक सूचनांनाही सामावून घेऊन होणारे कायदे चिरकाल टिकाऊ होतात. संसदीय लोकशाहीत तेच अपेक्षित असते. यापूर्वी त्याची असंख्य उदाहरणे आहेत. अगदी ताजे जीएसटीचे उदाहरणही याच स्वरुपाचे आहे. परंतु एककल्ली नेतृत्व आणि बहुमताचा अहंकार व त्यातून येणारी हुकुमशाही मनोवृत्ती संसदीय लोकशाहीचा घात केल्याखेरीज राहणार नाही.




रविशंकर प्रसाद



निर्मला सीतारामन



प्रल्हाद जोशी



पियुष गोयल

●●●

महात्मा गांधी यांच्या जन्माला २ ऑक्टोबर रोजी १५१ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने त्यांच्या आत्मकथेत महाराष्ट्र कसा दिसतो याचा शोध घेण्याचा अल्पसा प्रयत्न या लेखात केला आहे.

# महात्मा गांधीजींची आत्मकथा आणि महाराष्ट्र व महाराष्ट्रीयन नेतृत्व


प्रा.डॉ.गणेश राऊत



यंदाच्या २ ऑक्टोबरला महात्मा गांधीजींच्या जन्माला १५१ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने त्यांच्या आत्मकथेत महाराष्ट्र कसा दिसतो याचा शोध घेण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. मी या लेखासाठी १९६९ साली प्रसिद्ध झालेली चौथी आवृत्ती (मराठी) आणि २०१४ मधील ३५ वे पुनर्मद्रण प्रत वापरली आहे.

महात्मा गांधीजी आणि महाराष्ट्राचे किती निकटचे नाते होते यावर आत्मकथेमधून जो प्रकाश पडतो तो वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. गांधीजींच्या आत्मकथेची प्रस्तावनाच मुळी मुंबई शहरातून सुरु झाली आहे. नोव्हेंबर १९२१ च्या काळात प्रिन्स ऑफ वेल्सचे आगमन झाले. त्याप्रसंगी मुंबईत मोठ्या प्रमाणावर निषेध नोंदवण्यात आला. आत्मकथेचे पहिले पान लिहून होताच मुंबईत विरोधाची आणि निषेधाची जी आग भडकली ती विझविण्यासाठी गांधीजींनी पुढाकार घेतला. त्याची शिक्षा म्हणून सरकारने गांधीजींना येरवडा तुरुंगात पाठविले. यामुळे आत्मकथा लिहिण्याचे पुढे ढकलले गेले. या संदर्भानंतर आत्मकथेत महाराष्ट्र विशेषत्वाने येतो तो खंड २ मध्ये २५ व्या प्रकरणात. या प्रकरणाचे शीर्षक आहे ‘हिंदुस्थानात’

याच खंडातील २४ व्या प्रकरणाचा शेवट गांधीजी ‘मुंबईचे तिकीट काढले’ या वाक्याने करतात. पुढे ते २५ व्या प्रकरणात गांधीजी कलकत्त्याहून मुंबईला निघाले असा उल्लेख आहे. याच प्रकरणात त्यांनी असाही खुलासा केला आहे की ‘मुंबईला न थांबता मी राजकोटला गेलो.’ अर्थात, असा निर्णय त्यांनी का घेतला याचा खुलासा या प्रकरणात कोठेही नाही. मुंबई आणि राजकोट (गुजरात) शहरात प्लेगची साथ सुरु झाल्याचा उल्लेख आहे. २६ व्या ‘राजनिष्ठा आणि शुश्रूषा’ या प्रकरणात गांधीजींनी मुंबईला भेट दिल्याचा उल्लेख केला आहे. मुंबईत आल्यावर (१८९६ नंतर) ते न्यायमूर्ती रानडे आणि जस्टिस बद्रुद्दीन तय्यबजींना भेटले. या दोघांनीही त्यांना फिरोजशहा मेहता यांना भेटण्यास सांगितले. या दोघांनीही सरकारी नोकरीत कार्यरत असल्यामुळे प्रत्यक्ष चळवळीत भाग घेण्यास असमर्थता दाखवून फिरोजशहांकडे पाठविले. गांधीजींनी फिरोजशहांच्या पहिल्याच भेटीविषयी जे लिहिले आहे ते वाक्य फिरोजशहांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारे आहे.







प्रिन्स ऑफ वेल्स

गांधीजी लिहितात, ‘‘मुंबईच्या सिंहाला’, ‘मुंबईच्या अनभिषिक्त बादशहाला’ (म्हणजे फिरोजशहा) भेटायला मला जायचे होते. परंतु बादशहाने मला घाबरवले नाही. बाप ज्या प्रेमाने आपल्या तरुण मुलाला भेटतो त्याच प्रेमाने ते मला भेटले.’’ याच भेटीत दोघांचे सूर जुळले आणि फिरोजशहांनी गांधीजींचे एक भाषण आयोजित केले. याच मुंबई भेटीत गांधीजी मुंबईत त्यांच्या आजारी असणाऱ्या मेव्हण्याला भेटायला गेले आणि त्यांची सेवा करता यावी म्हणून ते मेव्हण्यांना गुजरातला घेऊन गेले. परतल्यावर मुंबईत गांधीजींच्या भाषणाचा दिवस उजाडला. फिरोजशहांनी गांधीजींकडे भाषणाची लिखित प्रत मागितली. गांधीजींच्या मागे लागून फिरोजसहांनी लिखित भाषण तयार करायला लावले. प्रत्यक्ष सभेत गांधीजींना फिरोजशहांनी प्रोत्साहन दिले. फिरोजशहांचे व्याख्यान ऐकायला सर्वत्र प्रचंड गर्दी व्हायची. ही सभा सुद्धा त्याला अपवाद नव्हती. या भेटीसंदर्भाने गांधीजींनी फिरोजशहांचे मनमोकळे कौतुक केले आहे.

मुंबईहून गांधीजी पुणे शहरात आले आणि लोकमान्य टिळकांना भेटले. याचे वर्णन खंड २ मधील २८ वे प्रकरण ‘पुणे शहरी’ यात आहे. लोकमान्यांनी गांधीजींना पहिल्याच भेटीत प्रो. आर. जी. भांडारकर यांना आणि गोपाळ

कृष्ण गोखले यांना भेटण्यास सांगितले. गोखले यांना भेटण्यासाठी गांधीजी फर्ग्यूसन (फर्गसन) महाविद्यालयात गेले. गोखले यांच्या पहिल्याच भेटीविषयी ते लिहितात ''ते मला खूप प्रेमाने भेटले, आणि त्यांनी मला आपलासा करुन घेतला. ... आमची पूर्वीचीही ओळख असावी, असा भास झाला. सर फिरोजशहा तर मला हिमालयासारखे वाटले; लोकमान्य समुद्रासारखे वाटले, गोखले गंगेसारखे वाटले. तिच्यांत मला स्नान करता येण्यासारखे होते. हिमालय चढून जाणे अशक्य, समुद्रात बुडण्याची धास्ती असते, पण गंगेच्या मांडीवर खुशाल क्रीडा करावी, तिच्यावर होडी खेळवावी. गोखल्यांनी माझी बारीक चौकशी केली, एखादा विद्यार्थी शाळेत नवीन दाखल होण्यासाठी आला म्हणजे त्याची परीक्षा द्यावी त्याप्रमाणे कोणाकोणाला भेटावे, कसे भेटावे ते सांगितले. ... राजकीय क्षेत्रामध्ये जे स्थान गोखल्यांनी जिवंतपणी माझ्या हृदयात व्यापले व देहावसान झाले तरी अजूनही व्यापून राहिले आहेत, ते स्थान दुसऱ्या कोणीही पटकावलेले नाही.


महात्मा गांधी


बाळ गंगाधर टिळक


तरुण वयातील महात्मा गांधी


न्या. महादेव गोविंद रानडे

भांडारकरांच्या पहिल्या भेटीसंदर्भात गांधीजी लिहितात – ''बाप ज्याप्रमाणे मुलाला भेटतो, त्याप्रमाणे रामकृष्ण भांडारकर मला भेटले.'

खंड ३ मध्ये गांधीजींनी एकूण ४ प्रकरणांमध्ये महाराष्ट्रीयनांचा त्यांनी वेध घेतला आहे. नामदार गोखले यांच्या संदर्भात एकूण तीन प्रकरणे आहेत. गोखले यांच्या संदर्भातील गांधीजींची निरीक्षणे पहा.

''ते आपला एक क्षणही फुकट जाऊ देत नसत. त्यांचे बोलणे-चालणेही देशकार्यासाठी असे. त्यांच्या वाणीमध्ये मला कोठेही मलीनता, दंभ किंवा असत्य आढळले नाही. हिंदुस्थानचे दारिद्र्य आणि पारतंत्र्य त्यांना प्रतिक्षणी जाचत असे. अनेक प्रकारचे लोक अनेक प्रकारच्या गोष्टींकडे त्यांचे लक्ष वेधण्यासाठी येत. त्यांना ते एकच जबाब देत, ''हे काम तुम्ही करा; मला माझे करु द्या. मला देशाचे स्वातंत्र्य मिळवायचे आहे. ते मिळविल्यानंतर मला इतर गोष्टी सुचतील. सध्या तरी मला या कामामुळे एका क्षणाचीही फुरसत राहात नाही.''

गांधीजींनी आपले गुरु गोखले यांना पुढील प्रश्न विचारला.

''पण तुम्ही धड फिरायलाही जात नाही, मग तुम्ही आजारी राहता यात नवल काय? देशकार्यामधून व्यायामासाठीही फुरसत मिळणार नाही की काय?''

गोखले उत्तरले, ''तुम्ही मला कधी रिकामा पाहता, की त्या वेळी मी फिरायला जावे?'' जेवणासाठी वेळ काढतो त्याप्रमाणे व्यायामासाठी काढला पाहिजे. त्यामुळे देशाची सेवा अधिकच होईल, कमी नाही, असा माझा नम्र अभिप्राय आहे. यावर अधिक मतप्रदर्शन करण्याची गरज आहे का?

गांधीजींच्या आत्मचरित्रात मुंबईचे अनेकदा संदर्भ येतात. मुंबई शहरासंदर्भात त्यांची एक आठवण –

गो. कृ. गोखले यांची फार इच्छा होती, की मी मुंबईमध्ये कायम राहावे, तेथे बॅरिस्टरचा धंदा करावा आणि आपल्याबरोबरच सार्वजनिक कामामध्ये भाग घ्यावा. माझीही इच्छा तशीच होती. पुढे गांधीजींचे हितचिंतक केवलराम भावजी दवे यांचा आग्रह आणि जुळून आलेली परिस्थिती यांमुळे गांधीजींनी मुंबईस्थित 'पेन गिल्बर्ट आणि सयानी'च्या ऑफिसमध्ये 'चेंबर्स' भाड्याने घेतल्या. ऑफिस घेतल्यावर गिरगावात बिऱ्हाड घेतले, हे घर राहण्यालायक नव्हते. त्यात ओल येत होती. पुरेसा प्रकाश नव्हता. पुढे ते सांताक्रूझ येथे एक बंगला भाड्याने घेऊन राहायला लागले. त्यांनी चर्चगेटचा पहिल्या वर्गाचा पास काढला. या संदर्भात त्यांची एक टिपणी पहा – ''पहिल्या वर्गात पुष्कळदा मी एकटाच असे, त्याबद्दल काहीसा अभिमानही वाटे असे आठवते. पुष्कळदा वांद्र्याहून चर्चगेटला जाणारी

जलद गाडी पकडण्यासाठी मी सांताक्रूझहून वांद्र्यापर्यंत चालत जात असे. इतर नव्या बॅरिस्टरांप्रमाणे मीही हायकोर्टात खटले ऐकण्यास जात असे.

खंड ५ मध्ये 'पहिला अनुभव' या पहिल्याच प्रकरणात गांधीजी परदेशातून भारतात आणि मुंबईत आल्याचा उल्लेख करतात. मुंबईत गांधीजींचे दोन सत्कार झाले. उत्तमलाल त्रिवेदी यांनी भरविलेल्या सभेत मि. जिना यांचे इंग्रजीत भाषण झाले. गांधीजींनी जिनांच्या इंग्रजीला मधुर असे विशेषण लावले आहे. गांधीजींनी उत्तरादाखल केलेल्या भाषणात 'गुजराथी लोकांच्या सभेत इंग्रजीचा उपयोग

**महात्मा गांधी आणि नामदार गोपाळ कृष्ण गोखले**




करण्याबद्दलचा आपला नम्र विरोध नमूद केला.' मुंबईतील मुक्काम आटोपून गांधीजी पुण्याला निघाले. पुण्याला आल्यावर त्यांची आणि गोखले यांची भेट झाडील. गांधीजींनी 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे' सदस्य व्हावे अशी गोखले यांची तीव्र इच्छा होती परंतु ते जुळून आले नाही. गांधीजींना त्यांच्या कल्पनेतील आश्रम काढता यावा म्हणून गोखले यांनी गांधीजींना आर्थिक मदतीची तयारी दाखवून त्याप्रमाणे कृती केली.

मुंबई – मुंबईत गांधीजींनी श्रीमती अवंतिकाबाई गोखले, रमीबाई कामदार, श्री. शंकरलाल बँकरच्या मातुश्री व




वसुमतीबेन यांना कारावासात शिकविले आणि माझ्या खोलीत चरख्याचा गुंजारव सुरु झाला. मला आजारातून बरे करण्यामध्ये या गुंजारवाचा हिस्सा होता असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही.



महात्मा गांधी आणि बॅरिस्टर जीना

मुंबईत हाताचे पेनू कोठून आणावे? श्री. रेवपाशंकर जवेरीच्या बंगल्यावरुन तांतीचा टणत्कार करीत करीत रोज पिंजारी जात असे. त्याने पेनू तयार करुन देण्याचे कबूल केले. दर भारी मागितला, तो मी देऊ केला. अशा तऱ्हेने तयार झालेले सूत मी वैष्णवांना ठाकोरजीला घालायच्या मानांसाठी पैसे घेऊन विकत दिले. भाई शिवजींनी मुंबईत चरखावर्ग काढला. या प्रयोगाखाली पैशांचा खूप खर्च झाला. श्रद्धाळू देशप्रेमी लोकांनी पैसे दिले, मी खर्च करीत गेलो; पण तो खर्च व्यर्थ गेला नाही असा माझा नम्र अभिप्राय आहे. त्यातून खूप शिकायला मिळाले.



महात्मा गांधी आणि शंकरलाल बंकर

नागपूर – खंड ५ मधील ४२ व्या प्रकरणात आणि ४३ व्या प्रकरणात असहकार व नागपूर अधिवेशनासंदर्भात गांधीजींनी लिहिले आहे

देशबंधू (चित्तरंजन दास) व लालाजी असहकारात पुरेपूर सामील झाले नागपूरलाच. या खास अधिवेशनाच्या वेळी लोकमान्य नाहीत याबद्दल मला फारच वाईट वाटले. मला अद्यापपर्यंत असे वाटत आहे की ते जिवंत असते तर कलकत्त्याच्या प्रसंगाबद्दल आनंद मानला असता. परंतु तसे झाले नसते तरीही त्यांनी विरोध केलेला मला आवडला असता. मला त्यापासून शिकायला मिळाले असते. त्यांच्या माझ्यामध्ये मतभेद नेहमीच पडत; पण ते सर्व गोडीगुलाबीचे असत. आमच्यामध्ये निकट संबंध आहे असेच ते मला नेहमी मानू देत असत. हे लिहितेवेळी त्यांच्या मृत्यूचे चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभे होत आहे. मध्यरात्री मला त्यांच्या मृत्यूचे वृत्त टेलिफोनवर माझे सहकारी पटवर्धन यांनी दिले. त्याच वेळी आपल्या सोबत्यांपाशी मी उद्‌गार काढले, 'मला एक मोठा आधार होता, तो गेला.' ... राष्ट्राच्या इतिहासातील या आणिबाणीच्या वेळेला त्यांची उणिव सर्वांनाच विशेष जाणवत होती.

नागपूर अधिवेशनात जे कामकाज झाले त्या संदर्भात गांधीजी लिहितात "पुष्कळ प्रतिनिधींकडून (नागपूर अधिवेशनात चौदा हजार प्रतिनिधी हजर होते) अधिक कार्य होते किंवा लोकशाही अधिक भक्कमपणे प्रस्थापित होते ही समजूत मला अगदी चुकीची वाटते. पंधराशे प्रतिनिधी जर उदार मनाचे, जनतेच्या हक्कांना जपणारे व प्रामाणिक असतील तर सहा हजार निर्बंधशून्य प्रतिनिधींपेक्षा लोकशाहीचे रक्षण अधिक चांगल्या तऱ्हेने करतील. लोकसत्ता चालायची असेल तर त्यासाठी जनतेमध्ये स्वातंत्र्यवृत्ती, स्वाभिमान व एकजूट ही असली पहिजेत आणि चांगले व सच्चे प्रतिनिधी निवडून देण्याबद्दल निर्धार पाहिजे.



याच सभेमध्ये हिंदू–




काकासाहेब कालेलकर



विनोबा भावे



अवंतिकाबाई गोखले



आप्पासाहेब पटवर्धन

मुसलमान ऐक्याविषयी, अस्पृश्यतेविषयी व खादीविषयी ठराव झाले आणि तेव्हापासून अस्पृश्यता दूर करण्याचे काम राष्ट्रीय सभेच्या हिंदू सभासदांनी अंगावर घेतले आहे व खादीद्वारा राष्ट्रीय सभेने हिंदुस्थानातील दीनदुबळ्या जनतेशी संबंध जोडला गेला.

येथपर्यंत आत्मकथेतील 'महाराष्ट्र' आणि महाराष्ट्रातील नेत्यांची व्यक्तिचित्रे आपणास दिसून येतात. याच पुस्तकाच्या (म्हणजे) 'सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा' परिशिष्टात असे नमूद केले आहे की गांधीजींनी 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास' येरवड्याच्या तुरुंगात लिहिण्यास सुरुवात केली व सुटून आल्यानंतर तो पुरा केला. पुस्तकातील सूचीमध्ये वर उल्लेख केलेल्या महाराष्ट्रीयन व्यक्तिंव्यतिरिक्त अनसुयाबाई कालेलकर काकासाहेब कालेलकर, पटवर्धन अप्पा यांचाही प्रसंगपरत्वे उल्लेख आलेला आहे.

या लेखाच्या निमित्ताने असे म्हणता येईल की गांधीजींची शैली 'एखाद्या व्यक्तिचे व्यक्तिमत्व उभी करण्याची' वेगळीच आहे. एकाच वाक्यात ते व्यक्तिमत्व उभे करतात. याचा अर्थ त्यांचे निरीक्षण किती बारकाईचे असू शकेल याचा अंदाज येतो. 'सहवास आणि निरीक्षण याशिवाय हे शक्य नाही. गांधीजींना महाराष्ट्राबद्दल असलेले ममत्व लक्षात येते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या खंडात विनोबा भावे यांचा उल्लेख नाही. विनोबांच्या लेखनात खूपदा गांधीजींचे संदर्भ प्रसंगपरत्वे येतात. साबरमती आणि पवनार आश्रमाचे संदर्भ विनोबांच्या लेखनात येतात. गांधीजींची लेखणी या भागावर मौन धारण करते याचे साक्षेपी वाचकाला आश्चर्य वाटते.

या आत्मचरित्रातून आपणास फिरोजशहा मेहता, लोक. टिळक, नामदार गोखले यांचे एक वेगळेच दर्शन घडते. गांधीजींची कारकीर्द आकाराला येत असताना त्यांचा संबंध ज्या ज्या दिग्गज लोकांशी आला ते लोक गांधीजींना कसे दिसले याचा पडताळा आपणास या आत्मचरित्रातून येतो. गांधीजींची लेखणी सत्याशी प्रामाणिक राहून कोणत्याही प्रकारे तडजोड न करणारी आहे. जे जसे घडले तसे मांडणारी लेखणी आहे. जेथे जेथे स्मरणाची गफलत होण्याची शक्यता आहे तेथे गांधीजी तसे नमूद करतात. या आत्मचरित्रातून महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील जी व्यक्तिमत्वे गांधीजींना दिसली ती मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ●●●



पवनार आश्रम

# बिहारची रंगतदार लढत : भाजप दुहेरी भूमिकेत!

**तथागत**

बिहारमधील विधानसभा निवडणूक एकतर्फी राहील असे अंदाज वर्तविले जात होते. प्रत्यक्षात ही निवडणूक चुरशीची होण्याबरोबरच चांगलीच रंगतदार ठरणार आहे हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. सिनेमात ज्याप्रमाणे 'डबलरोल' असतो आणि 'पहा तुमचा आवडता नायक दुहेरी भूमिकेत' अशी त्याची जाहिरात केली जात असे. आता बिहारच्या होणाऱ्या निवडणुकीतही भाजपबद्दल अशीच जाहिरात किंवा प्रचार करावा लागणार आहे. 'पहा, भाजप दुहेरी भूमिकेत !' आणखी गंमत म्हणजे एक भूमिका दृष्य स्वरुपाची असेल तर दुसरी भूमिका अदृष्य असेल ! तुम्ही विचाराल असे कसे ? त्याचे उत्तर सोपे आहे. दृष्य म्हणजे प्रत्यक्ष स्वरुपात भाजप आणि नीतीशकुमार (संयुक्त जनता दल) यांची आघाडी असेल. तर अदृष्य स्वरुपात म्हणजेच अप्रत्यक्ष आघाडी रामविलास पास्वान यांच्या लोकजनशक्ति पक्षाबरोबर असेल. यालाच दुहेरी भूमिका म्हणतात. ज्या सिनेमात डबलरोल असतो तो रंगतदार असतोच ना ? आठवतोय राजेश खन्नाचा डबलरोल असलेला 'सच्चा-झूठा' सिनेमा ? देव आनंदचा 'बनारसी बाबू' ? तर आता असाच सिनेमा बिहारमध्ये होत आहे. तो नक्कीच मजेदार राहील!

बिहारमध्ये तिरंगी लढत होणे अपेक्षित होते. यामध्ये भाजप-नीतीशकुमार आणि पास्वान व



**भाजप आणि नीतीशकुमार यांनी समान जागा लढविण्याचे ठरविले असून नीतीशकुमार १२२ आणि भाजप १२१ जागांवर लढणार आहे. समसमान जागावाटप ही एकप्रकारे नीतीशकुमार यांची पहिली पीछेहाट मानली जाते. कारण बिहारमध्ये आपण प्रमुख पक्ष असल्याने आणि आपले नेतृत्व असल्याने नीतीशकुमार यांनी भाजपपेक्षा अधिक जागा मिळण्यावर दावा सांगितलेला होता. परंतु पास्वान यांच्या बहिर्गमनानंतर परिस्थिती बदलली आहे. भाजपला एकट्यालाच १२१ जागा मिळाल्या आहेत. उलट नीतीशकुमार यांना केवळ एक जागा अधिक मिळाली आहे जे केवळ प्रतीकात्मक आहे.**

जीतनराम मांझी (हिंदुस्थानी आवाम मोर्चा) यांची राष्ट्रीय लोकशाही आघाडी(एनडीए) ! प्रमुख प्रतिस्पर्धी म्हणून राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस, डावे पक्ष यांचे 'महागठबंधन' ! तिसरी आघाडी म्हणून उपेंद्र कुशवाह(राष्ट्रीय लोकसमता पार्टी), बहजन समाज पक्ष आणि जनवादी पक्ष समाजवादी या पक्षांची असेल. या तिन्ही आघाड्यांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रादेशिक पक्षाच्या नेतृत्वाखाली तीन राष्ट्रीय पक्ष आघाडी करुन निवडणूक लढत आहेत. परंतु निवडणूक प्रक्रिया सुरु होताहोता आता एक नवीन घडामोड झाली आहे. ही अपेक्षित होती. नीतीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविण्यास नकार देऊन पास्वान यांच्या लोकजनशक्ति पक्षाने स्वबळावर निवडणूक लढविण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे या निवडणुकीला चौथा कोन किंवा रंग प्राप्त झाला आहे. त्यामुळेच ती रंगतदार होणार आहे.

राम विलास पास्वान सध्या गंभीर आजारी आहेत आणि अंथरुणाला खिळून आहेत. निवडणुकीच्या प्रचारात सहभागी होण्याच्या अवस्थेत ते नाहीत. त्यामुळे आता त्यांच्या पक्षाची सर्व सूत्रे त्यांचे चिरंजीव खासदार चिराग पास्वान यांच्याकडे आहेत. रामविलास पास्वान सक्रिय असतानाच त्यांनी नीतीशकुमार यांच्या विरोधात भूमिका घेतलेली होती. नीतीशकुमार हे एककल्ली पध्दतीने कारभार



करीत असल्याची त्यांची तक्रार होती. त्यामुळेच त्यांचे नेतृत्व मान्य नसल्याची भूमिका त्यांनी घेतली होती. त्यांच्या पक्षाच्या बिहारमधील नेत्यांनी निवडणूक स्वतंत्रपणे लढविण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला होता. भाजपला ही फाटाफूट वरदनाच ठरली. कारण त्यांना बिहारमध्ये नीतीशकुमार यांचे पंख छाटण्यासाठी काहीतरी निमित्त हवे होते. ती संधी त्यांच्यासमोर आली. त्यांनी चिराग पास्वान यांना आतून फूस देण्याचे काम सुरु ठेवले. आता चिराग पास्वान यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचे जाहीर केले आहे. अद्याप त्यांनी किती जागा लढविणार हे स्पष्ट केलेले नाही पण ते १४३ जागा लढविणार असल्याचे कळते. मिळत असलेल्या माहितीनुसार भाजपच्या विरोधात ते जागा लढविण्याची शक्यता कमी राहील. त्या बदल्यात भाजपने पास्वान यांच्या पक्षाला ज्या जागा देऊ केल्या होत्या त्या पंचवीस ते तीस जागांवर उमेदवार उभे न करण्याचे ठरविल्याचे समजते. म्हणजेच पास्वान यांचा पक्ष संयुक्त जनता दलाच्या विरोधात मुख्यतः उमेदवार उभा करण्याची चिन्हे आहेत. ज्याप्रमाणे महाराष्ट्रात 'मनसे' या राज ठाकरे यांच्या पक्षाने फक्त शिवसेनेच्या विरोधात उमेदवार उभे करुन भाजपला मदत केली होती तसाच काहीसा प्रकार बिहारमध्ये घडत असल्याचे दिसते. अशा या विखुरलेल्या राजकीय पटलावर बिहारची निवडणूक होत आहे आणि त्यामुळेच तिची फलनिष्पत्ती निश्चितपणे उत्कंठावर्धक झालेली आहे. कारण निवडणूक निकालानंतर बिहारमध्ये राजकीय फेरबदल होऊ शकतात काय अशा चर्चेनेही राजकीय वर्तुळात जोर पकडला आहे आणि त्यामुळेच फलनिष्पत्तीबाबत विविध कयास लावले जात आहेत.



निवडणुकीनंतर म्हणजेच निकालांनंतरच्या राजकीय चित्राबाबत वेगवेगळ्या शक्यतांची चर्चा चालू आहे. एक बाब स्पष्ट आहे की बिहारमध्ये सध्या नीतीशकुमार हेच सर्वाधिक उंची असलेले नेते आहेत. त्यांचे प्रमुख स्पर्धक आणि त्यांच्या पिढीचे असे मानले जाणारे रामविलास पास्वान आणि लालूप्रसाद हे दोघेही वेगवेगळ्या कारणांनी राजकीयदृष्ट्या सक्रिय राहिलेले नाहीत. त्यांचे वारसदार म्हणजेच त्यांच्या मुलांबरोबर नीतीशकुमार यांना सामना करावा लागणार आहे आणि तो पूर्णपणे विषम आहे. पास्वान रुग्णाईत आहेत तर लालूप्रसाद जेलबंद आहेत. घराणेशाहीमुळे दोन्ही नेत्यांची मुले आता त्यांचे वारसदार म्हणून त्यांच्या पक्षाची धुरा सांभाळत आहेत. विशेष म्हणजे तिघांचे राजकीय गोत्र समान आहे. समाजवाद, लोहिया-जयप्रकाश, बिहार आंदोलन आणि आणीबाणी व जनता

पक्षाच्या माध्यमातून उदयाला आलेले हे बिहारमधील 'पिछड्या वर्गा'तील नेते आहेत. पास्वान दलित आहेत तर लालूप्रसाद व नीतीश हे ओबीसी आहेत. तिघांचे आपापले जनाधार आहेत. भाजप हा राष्ट्रीय पक्ष आहे आणि केंद्रात सत्तेतही आहे. परंतु सध्या भाजपमध्ये एकच नेते आहेत आणि त्यांनी सर्व प्रादेशिक नेत्यांना झाकोळून टाकलेले आहे. त्यामुळे भाजपकडेही बिहारमध्ये नीतीशकुमार यांच्या तोलामोलाचा नेता नाही. हे घटक लक्षात घेतले तर ही निवडणूक नीतीशकुमार यांच्याबाजुने निर्णायक रीतीने झुकल्यासारखी वाटते.

सामना नीतीशकुमार यांच्या बाजुकडे झुकलेला दिसत असला तरी वर उल्लेख केल्याप्रमाणे निकालानंतर काय राजकीय उलटसुलट फेरफार होतील याचेही काही आडाखे बांधले जात आहेत. त्यामध्ये वेगवेगळी राजकीय समीकरणे आहे. समसमान जागावाटप ही एकप्रकारे नीतीशकुमार यांची पहिली पीछेहाट मानली जाते. कारण बिहारमध्ये आपण प्रमुख पक्ष असल्याने आणि आपले नेतृत्व असल्याने नीतीशकुमार यांनी भाजपपेक्षा अधिक जागा मिळण्यावर दावा सांगितलेला होता. परंतु पास्वान यांच्या बहिर्गमनानंतर परिस्थिती बदलली आहे. भाजपला एकट्यालाच १२१ जागा मिळाल्या आहेत. उलट नीतीशकुमार यांना केवळ एक जागा अधिक मिळाली आहे जे केवळ प्रतीकात्मक आहे. शिवाय या जागांमधूनच त्यांना जितनराम मांझी यांनाही काही जागा द्याव्या लागणार असल्याने नीतीशकुमार यांची अडचण करण्यात भाजपला पहिल्या टप्प्यात यश मिळाले आहे. त्यामुळेच भाजप जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा आणि नीतीशकुमार यांच्या पक्षाच्या जास्तीतजास्त जागा पाडण्यासाठी प्रयत्न करणार हे उघड आहे.



मांडली जाऊ लागली आहेत. पास्वान यांच्या पक्षाला भाजपने 'आतून' मदत केल्यास आणि दोन्ही पक्षांमध्ये झालेल्या समझोत्यानुसार त्यांनी एकमेकांविरुध्द उमेदवार न देण्याचे ठरविल्यास पास्वान यांच्या पक्षाला काही प्रमाणात यश मिळूही शकेल. ताज्या माहितीनुसार भाजप आणि नीतीशकुमार यांनी समान जागा लढविण्याचे ठरविले असून नीतीशकुमार १२२ आणि भाजप १२१ जागांवर लढणार

यामध्ये नीतीशकुमार यांची राजकीय शक्ति व संख्याबळ कमी होणे हे भाजपच्या पथ्यावर पडणार आहे. कारण त्या परिस्थितीत नीतीशकुमार यांचे भाजपवरील परावलंबित्व वाढणार आहे आणि मग भाजप त्यांना त्यांच्या इशाऱ्यावर कसेही नाचवू शकेल असे भाजपचे मनसुबे आहेत. या अशा स्थितीत पास्वान यांच्या पक्षाची भाजपला निर्णायक मदत होणार आहे आणि म्हणूनच भाजपतर्फे

पास्वान यांना हवा देण्याचे प्रकार सुरु आहेत. परंतु पास्वान यांची जास्तीतजास्त मते ही सहा ते सात टक्क्यांच्या वर नाहीत. त्यांना भाजपवर मोठ्या प्रमाणात अवलंबुन रहावे लागेल. नीतीशकुमार यांनी जीतनराम मांझी यांना बरोबर घेऊन त्यांच्या मार्फत पास्वान यांच्या दलित जनाधारात पाचर मारण्याचा डाव आखलेला असला तरी मांझी यांचा जनाधार मर्यादित आहे आणि अल्प प्रमाणात ते पास्वान यांना टक्कर देऊ शकतील.

या परिस्थितीत निवडणुकीनंतर पुन्हा या पक्षांनी एकत्र येण्याचा प्रयत्न केल्यास नीतीशकुमार मुख्यमंत्री होतील काय हाही एक प्रश्न आहे. कारण पास्वान यांच्या पक्षाने चिराग यांना मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून प्रोजेक्ट करण्याचे जाहीर केले आहे. त्यांनी नीतीशकुमार यांचे नेतृत्व पूर्णत्वाने नाकारलेले आहे. मग अशा परिस्थितीत तडजोडीचा मार्ग म्हणून मुख्यमंत्री भाजपचा होऊ शकेल काय अशी शक्यताही नाकारता येणार नाही. अर्थात त्या परिस्थितीत नीतीशकुमार मुकाटपणे ही राजकीय मानहानि सहन करतील की भाजप-पास्वान यांच्या या डावास तेवढेच चोख प्रत्युत्तर देतील आणि ते काय असू शकेल हेही उत्कंठावर्धक असेल. कारण नीतीशकुमार हा असला प्रकार सहजपणे स्वीकारणार नाहीत हेही तितकेच खरे आहे. परंतु नीतीशकुमार भाजपबरोबर राहणार की त्यांची साथ सोडणार हाही एक महत्वाचा प्रश्न असेल.

बिहारमध्ये आपला मुख्यमंत्री असावा ही भाजपची इच्छा अद्याप अपूर्ण राहिली आहे. यासाठी त्यांनी खूप आटापिटा केलेला आहे. नीतीशकुमार यांना केंद्रात त्यांच्या ज्येष्ठतेनुसार मंत्रीपद आणि बिहारमध्ये त्यांच्या पक्षाला उपमुख्यमंत्रीपद देण्याचा प्रस्ताव भाजपने अनौपचारिकपणे पूर्वीही दिलेला होता पण नीतीशकुमार यांनी तो अमान्य करुन बिहारमध्येच राहणे पसंत केले होते. त्यामुळे नितीशकुमार यांची राजकीय पीछेहाट



झाल्यास या नको त्या तडजोडी करण्याची पाळी त्यांच्यावर येणार काय असाही एक सवाल आहे. परंतु तसे झाल्यास ती नीतीशकुमार यांच्या राजकीय अस्ताची सुरुवात असेल आणि ती गोष्ट ते मान्य करण्याची शक्यता अंधूक आहे.

मग खरोखरच नीतीशकुमार यांचे भाजपवरील परावलंबित्व वाढले तर काय होईल ? याहून आणखी एखादे वेगळे राजकीय समीकरण आकाराला येऊ शकते काय यावरही अटकळबाजी सुरु आहे आणि त्यामध्ये नीतीशकुमार आणि काँग्रेस यांच्या एकत्र येण्याची शक्यता काही राजकीय जाणकार व्यक्त करीत आहेत. राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस, डावे पक्ष यांच्या आघाडीत काँग्रेस ७० जागा लढवीत आहे. ही संख्या नगण्य नाही. भाजपच्या विरोधातले उच्चवर्णीय तसेच मुस्लिम आणि अन्य काही जातींची मते काँग्रेसला मिळू शकतात आणि त्यात राष्ट्रीय जनता दलामुळे जी काही अतिरिक्त मते मिळतील त्यामुळे काँग्रेसला यावेळी चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. गेल्या विधानसभेत काँग्रेसला आश्चर्यकारकरीत्या २३ जागा मिळाल्या होत्या. त्या अनुभवानेच यावेळी काँग्रेसने घासाघीस करीत सत्तर जागा मिळवल्या आहेत. सध्या शेतकऱ्यांचे प्रश्न असोत किंवा हाथरस मधील दलित मुलीवरील सामूहिक बलात्काराचे प्रकरण असो, काँग्रेस सक्रिय होताना दिसत आहे. त्यांना प्रतिसादही मिळताना आढळतो आणि मुख्य म्हणजे काँग्रेस कार्यकर्ते सक्रिय होताना दिसू लागले आहेत. उत्तर प्रदेश आणि बिहारचे राजकारण वेगळे निश्चितपणे असले तरी बरीच साम्यस्थळेही आहेत. त्यामुळे सध्याच्या घडामोडींचा परिणाम हा बिहारवर होणे अपेक्षित आहे आणि त्याचे प्रतिबिंब काही प्रमाणात का होईना निवडणुकीत पडणे अपरिहार्य आहे. अशा परिस्थितीत काँग्रेसच्या जागा वाढल्यास भाजपच्या दृष्टीने ती धोक्याची घंटा असेल. प्रथमच कम्युनिस्ट पक्ष महागठबंधनमध्ये सामील झाले आहेत. अन्यथा लालूप्रसाद यांनी एकेकाळी बिहारमध्ये चांगली ताकद बाळगून असलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाला नेस्तनाबूत करण्याचा प्रकार केला होता. तेव्हापासून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष बिहारमध्ये लालूप्रसाद यांच्याबरोबर कधीही राहिले नाहीत. लोकसभा निवडणुकीत देखील 'भाकप'च्या कन्हैयाकुमार यास लालूप्रसाद यांच्या राष्ट्रीय जनता दलाने पाठिंबा देण्याचे नाकारले होते. परंतु आता राजकीयदृष्ट्या अशी टोकाची प्रतिकूल परिस्थिती असताना लालूप्रसाद





आणि काँग्रेसबरोबर जाण्याचे दोन्ही कम्युनिस्ट पक्षांनी ठरवले आहे. शेतमजूर व कामगारात जनाधार असलेल्या मार्क्सवादी लेनिनवादी कम्युनिस्ट पक्षाने देखील या आघाडीत प्रवेश केल्याने ही मते आघाडीला मिळू शकतात. अर्थात लालूप्रसाद यांच्यासारखा 'स्टार प्रचारक' नसल्याने 'महागठबंधन'ला तेजस्वी यादव, राबडीदेवी, राहूल गांधी व प्रियंका गांधी, कन्हैयाकुमार यांच्यासारख्या नेत्यांवर अवलंबुन रहावे लागणार आहे. त्यामुळे जातीचे समीकरण जेथे सबळ राहील तेथे या आघाडीला मते मिळू शकतील. भाजप आघाडीतील फाटाफुटीचा किती फायदा ही आघाडी उठवू शकेल यावरही बरेच काही अवलंबुन राहील.या आघाडीने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून प्रोजेक्ट करण्याचे ठरविलेले असले तरी नीतीशकुमार यांच्या तुलनेत ते अगदीच अननुभवी व पोरसवदा दिसतात आणि ती एक त्रुटि मानली जात आहे.



या पार्श्वभूमीवरच बिहारची निवडणूक चांगलीच रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. भाजपचे स्टार प्रचारक




अर्थातच पंतप्रधान राहतील. याखेरीज गृहमंत्री अमित शहा हे त्यांच्या प्रकृतिमानाप्रमाणे त्यात सहभागी होतील. यावेळची निवडणूक ऐतिहासिक अशासाठी असेल की यामध्ये दृष्य आणि प्रत्यक्ष प्रचारापेक्षा अप्रत्यक्ष प्रचारावर अधिक भर राहणार आहे.

बिहारमध्ये निवडणुका हा एक लोक-उत्सव असतो आणि अजुनही या राज्यात जाहीर सभांना गर्दी करणारे

आणि चविष्टपणे राजकारणाची चर्चा करणारे लोक मोठ्या संख्येने आहेत. बिहारचा मतदार अजुनही पारंपरिक प्रचाराला प्रतिसाद देणारा आहे. ते या नव्या स्वरुपाच्या प्रचाराला कसा प्रतिसाद देतात तेही महत्वाचे राहणार आहे. बिहारच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने सुशांतसिंग राजपूत या बिहारी अभिनेत्याच्या मुंबईतील आत्महत्येवर भरपूर गोंधळ घालून त्याला राजकीय रंग देऊन




तो निवडणुकीचा मुद्दा बनविण्याचा प्रयत्न केला. सुशांतसिंग याचा खून झाल्याची 'थिअरी'ही मांडण्यात आली पण आता दिल्लीच्या 'एम्स'च्या अहवालाने आत्महत्येवर




शिक्कामोर्तब केल्याने भाजपला चपराक बसली आहे. तो मुद्दा प्रचारात किती वापरला जातो हेही पहावे लागेल. बिहारची ही निवडणूक नीतीशकुमार, भाजप यांच्यासाठी

## बिहार विधानसभा निवडणूक दृष्टिक्षेप

**बिहार विधानसभा (जागा २४३)**

**तीन टप्प्यात मतदान –**

१) २८ ऑक्टोबर २०२० – ७१ जागा,

२) ३ नोव्हेंबर २०२० –९४ जागा,

३) ७ नोव्हेंबर

**२०२० – ७८ जागा.**

**मतमोजणी व निकाल – १० नोव्हेंबर २०२०.**

**मतदारसंख्या –**

७ कोटि १८ लाख २२ हजार ४५०.

पुरुष : ३ कोटि ७९ लाख १२ हजार १२७,

महिला : ३ कोटि ३९ लाख सात हजार ९७९.

जशी महत्वाची आहे त्याचप्रमाणे 'धाकटी पाती' म्हणजे तेजस्वी यादव आणि चिराग पास्वान यांच्याही राजकीय भवितव्याचा निर्णय ही निवडणूक करणार आहे. त्यांचे नेतृत्व कितपत स्वीकारले जाऊ शकते याचा अंदाज या निवडणुकीत येईल. बिहारची ही निवडणूक आणखी एका महत्वाच्या कारणाने वैशिष्ट्यपूर्ण असेल कारण करोनाच्या छायेत ती होत आहे. या अनुभवावरच पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांचेही भवितव्य ठरु शकते. तसेच भारतीय राजकारणाला वळण देणारी ही निवडणूक ठरेल काय ? उत्तराच्या प्रतीक्षेत आपण सर्व !

●●●



# पुष्पाबाई : परखड व ठाम विचारवंत



– डॉ. विद्युत भागवत
संस्थापक, पुणे विद्यापीठ,
स्त्री अभ्यास केंद्र

पुष्पा भावे एका दीर्घ आजाराशी झुंज घेताना शेवटी वयाच्या ८१ व्या वर्षी आपल्यातून निघून गेल्या. एक विचारवंत, सामाजिक कार्यकर्त्या, विद्यार्थी प्रिय प्राध्यापिका हरपल्या. व्यक्तिगत पातळीवर त्यांचे माझे नाते संवाद आणि वादविवादाचे होते. पण त्यांचे मोठेपण असे होते की त्यांनी कधीही ''परनिंदा-परचर्चा'' या मार्गाने आपल्यापेक्षा भिन्न विचाराच्या माणसांना बाजूला टाकले नाही. त्यांची विचाराची पद्धत खणखणीत आणि नेमकी होती व भूमिका ठाम होत्या. गेल्या ५० वर्षांमध्ये पुष्पा भावे, अनंत भावे या जोडप्याला मी ओळखत होते. अभ्यासाच्या क्षेत्रात त्या एक अनुकरणीय आदर्श व्यक्ती होत्या.

राष्ट्रवादी मासिकासाठी हा लेख लिहिताना मला खूपच आनंद होतो आहे. कारण राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि सौ. प्रतिभाताई पवार यांचा आपल्या पतीच्या राजकारणाबद्दल असणारा आदर व त्यातही त्यातील चुका व कमतरता याचे वेगळे भान असणे हे पुष्पाबाईंनी मला एकदा समजावून सांगितले होते. राजकीय क्षेत्रात शरद पवारांचे धडाडीचे कर्तृत्व आपल्याला माहित आहे परंतु पुष्पा भावे यांच्याशी बोलताना मला प्रतिभा पवार यांच्या या संदर्भातील योगदानाची जाणीव झाली.

१९६७ साली जेव्हा मी भागवत कुटुंबाचा भाग झाले तेव्हा यशवंतराव चव्हाणांचे आशीर्वादपर पत्र आले होते आणि त्यांचा वारसा घेऊन शरद पवार, प्रतिभाताई वाटचाल करीत आहेत हे जाणवले. पुष्पा भावे रूईया कॉलेजमध्ये शिकवत असताना मी त्यापूर्वीच वसंत बापट, सरोजिनी वैद्य, सदानंद रेगे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्ययन अध्यापन क्षेत्रात विचार करु लागले परंतु पुष्पाबाईंच्या कार्याचा चांगला परिचय या काळातच मला झाला. त्या मराठी साहित्याच्या प्राध्यापिका होत्या परंतु त्यांचा आवाका व्यापक होता. इंग्रजी साहित्याचा चांगला अभ्यास होता. संस्कृत भाषेचा पाया आणि समाजवादी व्यापक बैठक असे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे स्वरुप होते. माझ्या सासूबाई



लिलावती भागवत या सर्वोदयवादी मामा क्षीरसागरांच्या विचारांच्या बैठकीत होत्या. त्यामुळे अनंत भावे, पुष्पा भावे या जोडगोळीशी माझा संपर्क आला तेव्हा पुष्पाबाईंनी अतिशय आपलेपणाने मला स्वीकारले असे वाटते. १९६० नंतरच्या काळात सरोजिनी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली मी आकाशवाणीवर सादर झालेल्या साहित्यविषयक चर्चेत भाग घेतला होता. त्यानंतर पुष्पा भावे जेव्हा मला भेटल्या तेव्हा त्यांनी कोणतीही साहित्यकृती कशी पहावी याबद्दल त्यांचे मत सांगितले. त्यावेळी विजय तेंडूलकर यांच्या नाटकांचा बहार होता, प्रभावही होता. मला आठवते मेणारे बाईंचे स्वगत कसे वाचायचे हे पुष्पाबाईंनी परखडपणे सांगितले होते. एखादी संहिता संदर्भासह वाचताना तिचा इतिहास आणि अन्वयार्थ कसा लावायचा हे त्या माझ्या मनात रुजवत होत्या. त्या काळात तेंडूलकरांची लहान लहान वाक्य असणारी शब्दशैली महत्त्वाची वाटली परंतु पुष्पाबाई सांगत राहिल्या की लेखक म्हणून तेंडूलकर कोणतीही भूमिका घेत नाहीत हे घातक आहे. तेव्हा हे मला सुरुवातीला पटले नव्हते परंतु नंतरच्या काळात त्या काय म्हणत आहेत हे उलगडत गेले.

१९६७ नंतर पुणे विद्यापीठात संपूर्ण मराठी घेऊन मी पदव्युत्तर अभ्यास करू लागले तेव्हा आम्हाला भालचंद्र फडके, काही काळ शं. गो. तुळपुळे असे अभ्यासक शिक्षक होते. त्या काळात नुकताच श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या 'ब्राम्हणकन्या' या पुस्तकावर वादळ उठले होते. तुळपुळे यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले जात होते. तेव्हा पुष्पाबाईंनी मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमात दोन गट कसे आहेत हे समजावून सांगितले आणि शं. गो. तुळपुळे व घारपुरेबाई यांच्यानंतर रा. शं. वाळिंबे यांचे साम्राज्य सुरु झाले. वाळिंबे बालकवींची कविता शिकविताना वर्गात अनेक कविता पाठ म्हणून दाखवित असत आणि अशा पाठांतरी प्रवृत्तीकडे कसे पाहायचे हे भावेबाईंनी मला शिकविले. राम बापटांसारख्या राज्यशास्त्राच्या अभ्यासकाकडून मी



पुष्पा भावे यांना राजर्षी छत्रपती शाहू पुरस्कार प्रदान करताना कोल्हापूरचे छत्रपती शाहू, शेजारी डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर

साहित्य ही गोष्ट सोपा पर्याय म्हणून पाहू नये हे विचार घेऊन पुष्पाबाईंशी बोलायचे तेव्हा त्या मोजक्या, निवडक मराठी साहित्याशी परिचय करुन द्यायच्या. ग्रंथालयात बसून जुन्या मासिकांच्या ढिगाऱ्यातून चांगले निवडक साहित्य वाचावे असे त्यांनी सुचविले. खरोखरीच पुष्पाबाईंचा झपाटा मोठा होता. प्रत्यक्ष वर्गाच्या चार भिंतीमध्ये मी जरी त्यांच्याकडून शिकले नाही तरी त्या काळात एकीकडे गं. बा. सरदार आणि संत वाङ्मयाची फलश्रृती यांसारख्या पुस्तकांचे वाचन केले, आचार्य जावडेकरांच्या मांडणीचा विचार केला किंवा दि. के. बेडेकरांच्या साहित्य समीक्षेवर चर्चा केली त्या सर्व टप्प्यांवर पुष्पाबाईंशी होणाऱ्या वैचारिक आदानप्रदानाचा आधार होता.

जसजसे आपण वाढत जातो तसतसे आपल्याला नवीन प्रश्न पडू लागतात. माझेही बाईंच्या बाबतीत तसेच झाले. त्यांच्या पांढऱ्या शुभ्र साड्या किंवा साधेपणाचे दावे मला अनावश्यक वाटू लागले. महात्मा गांधींच्या आणि विनोबा भावे यांच्या प्रभावाखाली त्या ज्या प्रकारे भूमिका घेत होत्या त्यात मला कर्मठपणा आणि संकुचितपणा येणार असे दिसू लागले. एकदा शिवाजी विद्यापीठाच्या एका चर्चेत आम्ही दोघी सहभागी होतो. प्रज्ञा दया पवारही होत्या. त्या चर्चासत्रापेक्षा महालक्ष्मीच्या देवळाबाहेर आमची झालेली वादावादी मला महत्त्वाची वाटते. देव न मानणाऱ्या पुष्पाबाई नरेंद्र दाभोळकरांप्रमाणेच ठाम भूमिका घेऊन ''मी देवळात येणार नाही पण देवळाच्या बाहेरचे शिल्पसौंदर्य पाहीन'' असे त्यांनी जाहीर केले. मी पुन्हा पुन्हा म्हणत होते, देवळात देवीच्या गाभाऱ्यासमोर शरण आलेल्या स्त्रियांना कसे समजून घ्यायचे असे विचारत होते. तुम्ही देवळात न येता या समुह पातळीवर श्रद्धा बाळगणाऱ्या स्त्रियांपाशी तुम्ही कशा पोहोचणार?

अशा शाब्दीक चकामकी होत तेव्हा मनात डूक न धरता कडवट होऊन बाई कधीच बोलेनाशा व्हायच्या नाहीत उलट आपल्यापेक्षा वेगळ्या मतांचा आदर ठेवित त्या वातावरणात परत आनंद निर्माण करायच्या. त्यानंतरच्या टप्प्यावर यशवंत सुमंत यांच्याबरोबर प्रबोधनात्मक शिबीरे घेण्यासाठी त्या प्रवास करायच्या. मला वाटायचे सत्तरीच्या आसपास पुष्पाबाईंनी आपल्या मधुमेहाची काळजी घ्यावी.



माझा मुद्दा असायचा की बाईंकडे इतके विचारधन आहे की त्यांनी आता शांतपणे आपल्या शरीराला न शीणवता वाचन लेखन करावे. विद्यार्थी घडवावेत. परंतु विद्याताई बाळ, पुष्पा भावे आणि सुमंत सर सुद्धा अशी काळजी घेत नव्हते. त्या काळात अनंत भावे त्यांची पाठराखण करीत होते. परंतु



अनंत भालेराव यांच्या नावाचा पुरस्कार पुष्पाबाईंना मधुकर मुळे प्रदान करताना.




सामाजिक कृतज्ञता निधीतर्फे पुष्पाबाईंचा विद्या बाळ सत्कार करताना, शेजारी डॉ. बाबा आढाव.

शेवटी शरीराच्या पातळीवर किंमत द्यावी लागलीच. रात्री–अपरात्री एस.टी.चा प्रवास आणि सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचण्याची जबरदस्त इच्छा असे जगताना त्या थकत चालल्या आहे हे जाणवत होते. आम्ही स्त्री अभ्यास विभागाच्या सर्व तऱ्हेच्या चर्चासत्रांचे उद्‍घाटन पुष्पाबाईंच्या हस्तेच करवीत असू. पण पुस्तके लिहिणे, आपल्या नावे ती छापणे यापेक्षा पुष्पाबाईंना कष्टमय प्रवास करुन लोकांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे वाटायचे. 'स्त्री अभ्यास' या ज्ञानशाखेमधील आंतरशाखीयता विकसीत व्हावी हे त्यांना महत्वाचे वाटत होते. परंतु शेवटी मूठभर गोळ्या खाऊन दुपारच्या सत्रात मला तुमचे ऐकायचे आहे असे म्हणून त्या स्वतःला ओढत होत्या.

त्यानंतरच्याच काळात त्यांनी रंगभूमीविषयक एक अतिशय महत्त्वाचे पुस्तक लिहिले आणि ते भेट देताना म्हणाल्या, ''बघ, मी ही तुझ्यासारखी पुस्तक लिहिण्याच्या खटाटोपात पडले.'' माणूसच्या दिलीप माजगावकरांनी प्रसिद्ध केलेले पुष्पाबाईंचे हे पुस्तक एक महत्त्वाचा मैलाचा दगड मानले जाईल यात शंका नाही.



विचाराच्या क्षेत्रात ज्या काळात स्त्रीया महत्वाच्या मानल्या जात नव्हत्या त्या काळात वैचारिक स्पष्टता आणि कणखर भूमिका घेऊन पुष्पाबाई उभ्या राहिल्या. समाजवादी चौकटीत डॉ. निलम गोऱ्हे काम करीत असताना त्यांनी चिवटपणे शिवसेनेत स्वतःचे स्थान मिळविले तेव्हा पुष्पाबाई मला हसून म्हणाल्या, ''मी सुद्धा राजकारणात जायला हवे होते ना?'' त्यांच्या म्हणण्याचा मतितार्थ असा होता की, त्या काळी महिला फार मोठ्या संख्येने राजकारणात जात नव्हत्या आणि गेल्याच तर टिकून राहून प्रत्यक्ष कामकाजात सक्रिय सहभाग घेत नव्हत्या. हा प्रत्यक्ष सक्रिय सहभागच प्रश्नांची सोडवणूक करण्यास उपयोगी पडत असतो. डॉ. निलम गोऱ्हे यांनी पूर्ण वेळ देऊन सक्रिय सहभाग घेतला व त्या राजकारणात टिकून राहिल्या याबद्दल पुष्पाबाईंना त्यांचा फार अभिमान वाटे.

''तिची भाकरी कोणी चोरली', या संध्या नरे पवार यांच्या अत्यंत महत्त्वाच्या पुस्तकात आपला हात आहे हे पुष्पाबाई कौतुकाने सांगत. संध्या नरे पवार इज माय फाईंन्ड असे त्या म्हणाल्या होत्या. म्हणजे स्वतःच्या मुलाबाळांप्रमाणे त्यांनी भोवतालच्या समाजातील विद्यार्थीनींना घडविले आणि विचाराच्या स्थिर पायावर उभे केले हेच त्यांचे मोठे योगदान!

●●●

घंटाकर्ण




# आळिमिळी गुपचिळी....!

सध्याच्या सरकारला गोष्टी बंद करण्याची लई भारी सवयच लागून गेलीय!

नोटबंदी पासून ते पार आताच्या टाळेबंदी(लॉकडाऊनचे मराठीकरण हो) पर्यंत!

हाथरसच्या बलात्काराच्या घटनेनंतर ते गावच बंद करुन टाकलं! हो, तेथे पत्रकारांना आणि पब्लिकला पार प्रवेशबंद करुन टाकला की!


अलीकडेच काही पत्रकार आणि फोटोग्राफर आणि वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी लडाखला गेले.

दहा, पंधरा दिवस राहिले!



पण त्यांना कुठेच जाऊ देण्यात आले नाही. लडाखहून पॅन्गाँग त्सो कडे जाणाऱ्या रस्त्याची नाकेबंदी.

सियाचेनकडे जाणारा रस्ता बंद!



कारण तेथूनच देपसांग व दौलत बेग ओल्डी हवाईपट्टीकडे रस्ता जातो!

बिचारे पंधरा दिवस राहून हात हलवीत परतले.

संसद ही देशातली सर्वोच्च संस्था आहे. पण या संस्थेत देखील भारत-चीन सीमेवर सध्या असलेल्या तणावाबाबतची चर्चा अशीच दाबून टाकण्यात आली.

राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रीय सुरक्षा, जास्त बोलू नका!

सभापति वेंकय्या नायडू तर सदस्यांना यासंदर्भात प्रश्नच विचारु देत नव्हते. विलक्षण आणि अतिगंभीर भावमुद्रा करुन असा काही आव आणला गेला की जणू काही विरोधी पक्ष अतिगुप्त माहितीच विचारत सुटले आहेत. त्यांना जराही देशाच्या सुरक्षिततेची काळजी नाही आणि त्या काळजीचा मक्ता जणू काही






एकमेवाद्वितीय सरकारलाच आहे.

हे अवडंबर माजवण्याचे कारण काय? तर आधीच निसरड्या विकेटवर असलेल्या सरकारची आणखी पंचाईत होऊ नये!

असाच आणखी एक प्रकार!

याचा उल्लेख अशासाठी की त्याचा संबंध महाराष्ट्राशीही येतो. बिहारच्या निवडणुकीसाठी या सरकारने अचानक, अगदी आकस्मिकपणे कांद्याची निर्यातबंदी जाहीर केली. या निर्णयाची तीव्र व कांद्यासारखीच तिखट प्रतिक्रिया होणे स्वाभाविकच होते. परंतु खुद्द सरकारमध्येच या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया उमटली होती.




त्याचे कारण होते या निर्यातबंदीबाबत बांगला देशाने जो निषेध खलिता पाठविला त्याने परराष्ट्र मंत्रालयात चांगलीच अस्वस्थता निर्माण झाली.

याची थोडीशी पार्श्वभूमी आहे. नागरिकत्व दुरुस्ती कायद्यानंतर बांगला देशाने त्याबाबत नाराजी व्यक्त केली होती. किंबहुना या सरकारमधील काही जबाबदार मंत्र्यांनी देखील बांगला देशातून येणाऱ्या निर्वासितांबद्दल काढलेले उद्‌गार यातून नाराजी वाढत गेली होती आणि आणखी एका नाराज शेजारी देशात भर पडते की काय असा प्रश्न निर्माण झाला होता.



अखेर परराष्ट्रसचिव हर्ष शृंगला हे स्वतः बांगला देशाला गेले आणि तेथे त्यांनी व्यापक चर्चा करुन बांगला देशाची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला होता. ते परतल्यानंतर लगेचच हा कांदा निर्यातबंदीचा निर्णय झाला.

बांगला देशाला भारतीय कांद्याची मोठी निर्यात होते. या निर्णयाच्या वेळी कांद्याचे एक हजार ट्रक बांगला देश सीमेवर होते आणि या निर्णयाने त्यांना तेथेच रोखून धरण्यात आले होते.





बांगला देशाने निषेध खलिता दिल्यानंतर परराष्ट्र मंत्रालयाचे चांगलेच धाबे दणाणले. आताच सर्व काही ठीकठाक करुन आल्यानंतर लगेचच हा धक्का? मग त्यांनी वाणिज्य मंत्रालयाकडे रदबदली सुरु केली. कारण याचा फायदा घेण्यास पाकिस्तान टपलेलाच होता. त्यांनी बांगला देशाला स्वस्त आणि प्रसंगी मोफत कांदा पुरविण्याची तयारी दाखवली.

अखेर हो-नाही हो-नाही करता सीमेवर किंवा बंदरांमध्ये पोहोचलेल्या कांद्याच्या निर्यातीला परवानगी देण्यात आली. परंतु हे सर्व गुप्तपणे!

ज्या पत्रकारांना ही माहिती कळली त्यांना ही बातमी प्रसिध्द करु नये असे खासगीत सांगण्यात आले.

असे हे २१व्या शतकातले 'गुप्त साम्राज्य' आहे! माहिती आहे ना? इतिहासात वाचले होते ना? समुद्रगुप्त वगैरे गुप्त साम्राज्यातले राजे या देशात होऊन गेले होते. मौर्य साम्राज्याप्रमाणेच हे 'गुप्त साम्राज्य' होते.

आता २१व्या शतकात हे नव्या प्रकारचे 'गुप्त साम्राज्य' आहे!

## बिहारमधील निवडणूकपूर्व गोंधळ

बिहार विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर होऊन पहिल्या टप्प्याची अधिसूचना देखील जारी झाली. मात्र विविध पक्ष आणि आघाड्यांमधील जागावाटपाचा घोळ अद्याप कायम आहे.

त्यामुळे हा घोळ संपणार कधी आणि मग हे पक्ष प्रत्यक्ष निवडणुकीच्या कामाला लागणार कधी याची सर्वांनाच उत्सुकता आहे.

सर्वांची नजर सत्तारूढ आघाडीवर अधिक आहे. या आघाडीत मुख्यमंत्री नीतीशकुमार यांचा संयुक्त जनता दल, केंद्रात सत्तारूढ भाजप, रामविलास पास्वान यांचा लोकजनशक्ति पार्टी हे तीन पक्ष प्रमुख आहेत. अलीकडेच दलित नेते जीतनराम मांझी व त्यांचा हिंदुस्तान आवाम मोर्चा या पक्षाने नीतीश-भाजप आघाडीत प्रवेश केला. परंतु या सत्तारूढ आघाडीत अजुन गोष्टी नीटपणे घडताना आढळत नाहीत.


रामविलास पास्वान हे अंथरुणाला खिळलेले आहेत. त्यांचे चिरंजीव चिराग हे आता पक्षाचे सारथ्य करीत आहेत.

चिराग यांना त्यांच्या पक्षाने मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून 'प्रोजेक्ट' करण्याचे जाहीर केले आहे.

तसेच चिराग यांनी भाजपकडे गेल्यावेळेपेक्षा अधिक जागांची मागणी केली आहे. त्यांनी यावेळी पस्तीस ते ४२ जागांची मागणी केली आहे. यातील कमी-जास्ती ही राज्यसभा व विधानपरिषदेच्या माध्यमातून भरपाई करण्याची मागणीही त्यांनी केलेली आहे.

चिराग पास्वान हे कुणाच्या








जिवावर व जोरावर या अवाढव्य मागण्या करीत आहेत हे एक गूढच आहे. पण, कानोकानी आलेल्या खबरीनुसार भाजपनेच चिराग यांना अशा मागण्या करण्याबाबत चिथावलेले आहे असे समजते.

याचे कारण? नीतीशकुमार!

यावेळी नीतीशकुमार यांनी पुढे केलेल्या प्रस्तावानुसार त्यांचा पक्ष(संयुक्त जनता दल) ११५ जागा लढेल. १२८ जागा त्यांनी भाजप आणि पास्वान यांच्यासाठी सोडण्याची तयारी दाखवली आहे. भाजपला हा एकतर्फी फॉर्म्युला पसंत नाही.

कारण भाजपला विषम जागावाटप मान्य नाही. दोन्ही पक्षांना समान संख्येने जागा मिळाल्या पाहिजेत असा भाजपचा आग्रह आहे.






चिराग पास्वान यांना पुढे करुन नीतीशकुमार यांच्यावर रोजच्यारोज टीका, वाढीव जागांची मागणी अन्यथा स्वतंत्र लढण्याची तयारी असे सर्व प्रकार सुरु करण्यात आले आहेत.

दुसरीकडे काँग्रेस व राष्ट्रीय जनता दलांची अवस्था वेगळी नाही. लालूप्रसाद तुरुंगात असल्याने त्यांचे चिरंजीव तेजस्वी राजदची सूत्रे सांभाळत आहेत. सत्तेची फारशी आशा नसतानाही दोन्ही पक्ष जागांसाठी भांडत आहेत. त्यामुळेच नीतीशकुमार यांना तो अजिबात मान्य नाही. त्यामुळे त्यांनी एकतर्फी ११५ जागांची घोषणा करुन टाकली आहे. बिहार विधानसभेत २४३ जागा आहेत. भाजप व पास्वान यांना १२८ जागा म्हणजे भाजपला शंभरपेक्षा कमी जागा मिळणे स्पष्ट आहे. पास्वान यांना गेल्यावेळी २७ जागा देण्यात आल्या होत्या आता त्यांची मागणी वाढली आहे. या परिस्थितीत नीतीशकुमार यांना आवर घालण्यासाठी भाजपने






जीतनराम मांझी त्यांना सोडून निघून गेले. पाठोपाठ उपेंद्र कुशवाह(राष्ट्रीय लोकसमता पार्टी) हेही बाहेर पडले व महागठबंधन आता रिकामे झाले. कुशवाह यांनी बहुजन समाज पक्ष आणि अन्य किरकोळ स्थानिक पक्षांना बरोबर घेऊन 'तिसरा मोर्चा' उघडला आहे. ते सर्व जागा लढविणार आहेत. हा निव्वळ एकमेकांची मते खाण्याचा प्रकार आहे. भाजपने यासाठी भरपूर मोठी 'गुंतवणूक' केलेली आहे. त्यामुळे निवडणुकीत ज्याची गुंतवणूक जास्त त्याचा फायदा जास्त हे उघड आहे. तूर्तास नीतीशकुमार यांचे पारडे निश्चितच जड दिसून येते.



## रामदास आठवले आहेत कुठे??

केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांना हाथरस येथील सामूहिक बलात्काराची बळी ठरलेल्या मुलीच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी २ ऑक्टोबरला सवड काढणार असल्याचे त्यांच्या कार्यालयाने सांगितले. पण हाथरस गावात प्रवेशबंदी केलेली असल्याने ते कसे तेथे जाणार आणि भेटणार हा प्रश्नच आहे.

त्यापूर्वी तिला दिल्लीत आणलेले असताना किंवा पोलिसांनी बळजबरीने तिच्या मृतदेहावर केलेले अंत्यसंस्कार करण्याच्या वेळी त्यांना काहीच सुचले नाही किंवा हस्तक्षेपाची इच्छाही झाली नाही.




पण भाजपकडून एक केंद्रीय राज्यमंत्रीपद मिळण्याचा फार मोठा मेबदला रामदास आठवले चुकवीत आहेत.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, ममता बॅनर्जी अशा नेत्यांना अनाहूत सल्ले देण्याबरोबरच भाजप आणि पंतप्रधानांची वारेमाप स्तुतिसुमने गाण्याचा धंदाच त्यांनी सुरु केला आहे. याच्याच जोडीला त्यांनी बॉलीवुडवरही लक्ष केंद्रित केलेले दिसते.

काही वर्षांपूर्वी राखी सावंत या अभिनेत्रीस त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या त्यांच्या गटात सामील करुन घेतले होते. त्या त्यांच्या गटाच्या प्रवक्त्याही झाल्या होत्या.

आता सुशांतसिंग राजपूत मृत्युप्रकरणातही आठवले हे फारच सक्रिय झालेले आहेत.

यामध्ये कंगना रानावत या वादग्रस्त अभिनेत्रीची त्यांनी घरी जाऊन भेट घेतली. संयुक्त पत्रकार परिषदही घेतली. प्रसंगी त्यांचे कार्यकर्ते त्यांचे संरक्षण करतील अशी ग्वाहीपण दिली. त्यानंतर पायल घोष या अभिनेत्रीने निर्माता दिग्दर्शक अनुराग कश्यप यांच्या विरोधात लैंगिक छळाची तक्रार केली.

तत्काळ रामदास आठवले त्यांच्या मदतीला धावले. त्यांच्याबरोबर ते महाराष्ट्राच्या राज्यपालांकडे देखील गेले.

पायल घोष यांनाही आठवले यांनी मदतीचे आश्वासन दिले.

आठवले समाजकल्याण खात्याचे राज्यमंत्री आहेत परंतु त्यांचे कल्याण समाजाऐवजी बॉलीवुडमधील





अभिनेत्रींपुरते मर्यादित असावे.

उत्तर प्रदेशातील हाथरस येथे व लागोपाठ बलरामपूर येथे दलित महिलांवर सामूहिक बलात्कार आणि त्यातील शारीरिक अत्याचाराने त्यात त्यांचा मृत्युही झाला.

परंतु समाजकल्याण मंत्री आणि स्वतःला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणविणारे रामदास आठवले यांना तेथे जाऊन पीडित कुटुंबांच्या मदतीला तत्काळ धावण्याचे सुचू नये हे आश्चर्यकारक आहे.

आठवले यांनी भाजपशी हातमिळवणी केल्यानंतर त्यांच्या नसानसात भाजपचा करोना पसरुन ते दलितांना विसरतील अशी अपेक्षा कुणी केली नव्हती.

दलित समाज याचा जाब त्यांना विचारल्याखेरीज राहणार नाही. त्यांनीही भाजपसाठी विनाकारण वकिली करण्याचे कारण नाही व त्यापेक्षा दलित संघटन करण्याचे काम करणे उचित!



# करोनाचे निमित्त आणि....!




शाळेत असताना वादविवाद स्पर्धा किंवा निबंध स्पर्धात मुलांसाठी असलेले अनेक विषय हे ‘अमुक गोष्ट शाप की वरदान?’ या स्वरुपाचे असतात. यामुळे विद्यार्थ्यांना एखाद्या विषयाच्या सर्व पैलूंचे अध्ययन करणे शक्य होते आणि अध्ययनाची ती सवय मुलांमध्ये रुजण्याच्या हेतुने असे विषय ठेवले जात असावेत.




सध्या करोना साथीच्या वेळीही असा विषय ठेवता येणे शक्य आहे............... करोना, शाप की वरदान? तुम्ही म्हणाल वरदान?

हा काही मंडळींसाठी ते वरदानही होऊ शकते.

विशेषतः राजकारणी मंडळींनी या संकटाचा राजकीय लाभ कसा उठवता येऊ शकतो याचा चांगला अभ्यास केलेला आढळतो.

याला योगायोग म्हणायचे की आणखी काही हे सांगता येणार नाही.

बिहारमध्ये विधानसभा निवडणूक होत आहे. निवडणूक म्हटले की इच्छुकांची पक्षाच्या मुख्यालयात आणि केंद्रीय नेत्यांकडे गर्दीही आलीच!

पण करोनामुळे या सर्व गोष्टींनाच पायबंद बसला आहे. एकतर इच्छुकांना व त्यांच्या समर्थकांना दिल्लीला येणे सहजसुलभ राहिलेले नाही. रेल्वेगाड्यांची उपलब्धता पुरेशी नाही व विमानप्रवासही काही सोपा राहिलेला नाही. तरीही काही तीव्र इच्छुकांनी चक्क स्वतःच्या खासगी वाहनानी चोवीस, छत्तीस तासांचा प्रवास करुन दिल्ली गाठली खरी.

पण हाय रे देवा! दिल्ली नेतेमंडळी कुणालाच भेटायला तयार नाहीत! करोनाची भीती!

यामुळे केवळ मेलद्वारे किंवा कुरियरद्वारे बायोडेटा पाठवा म्हणून






सांगण्यात आल्याने इच्छुकांच्या पदरी निराशेखेरीज काही पडू शकले नाही.

देशातच नाही पण परदेशातही असेच पण वेगळे प्रकार सुरु आहेत. पण इस्रायलमधल्या ताज्या घडामोडी पाहिल्यास या राजकीय योगायोगाची प्रचीती आल्याखेरीज रहात नाही.

इस्रायलमध्ये सध्या वर्तमान पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या विरोधात आंदोलन चालू आहे. त्याचे पडसाद सर्वत्र उमटत होते. अचानक इस्रायलच्या सरकारने लॉकडाऊन जाहीर करुन सार्वत्रिक जमावबंदी लागू केली. मग काय आपोआपच आंदोलने आणि निदर्शने सर्वच थंडावले.

भारतातही वेगवेगळ्या कारणांवरुन लॉकडाऊन केले जात आहेतच! स्वाभाविकपणे विरोधी आंदोलने असोत किंवा निदर्शने असोत सर्व काही करोनाच्या नावाखाली बंद!



करोनाने सनदशीर मार्गाने करायचा विरोधही बंद करुन टाकल्यानंतर सनदशीर नसलेल्या गोष्टी करणाऱ्यांचे फावणे हे ओघाने आलेच!

सध्या तसेच घडते आहे.

अमेरिकेतच पहा ना काय झाले ते! अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीचा प्रचार सुरु आहे. पुढील महिन्यात मतदान आहे. सध्याचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप हे त्यांच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा पिछाडीवर आहेत. अमेरिकेतील प्रथेप्रमाणे ट्रंप व त्यांचे प्रतिस्पर्धी जो बिडेन यांच्यात टेलिव्हिजनवर जाहीर वादविवाद झाला व त्यात ट्रंप छाप पाडू शकलेले नाहीत.

आपली पीछेहाट पाहून ट्रंप यांनी ते खरोखर निवडणूक हरले तर नव्या अध्यक्षाकडे ते सहजासहजी सूत्रे सोपविणार नाहीत असा दमही दिलेला आहे. परंतु कुठेतरी त्यांच्या मनात पराभवाची भीती वाटू लागली असल्याचे दिसते कारण अचानक ते व त्यांच्या पत्नीला करोना झाल्याचे जाहीर करण्यात आले आणि ते आता विलगीकरणात म्हणजेच क्वारंटाईनमध्ये गेले आहेत.

आता काय? वादविवाद नको आणि काहीच नको! वर थोडीफार सहानुभूतीही मिळू शकते!

म्हणजे काय? करोना शाप



आहेच पण काहीजण त्याचा वापर वरदान म्हणूनही करुन घेऊ शकतात!

## कर्नाटकातील मनमानी

कर्नाटकचे मुख्यमंत्री येद्युरप्पा हे कसलेले राजकारणी आहेत. त्यांनी पंच्याहत्तरी कधीच पार केली आहे पण त्यांना हात लावण्याचे धैर्य भाजपच्या



हायकमांडला होताना दिसत नाही.

येद्युरप्पा यांनी कर्नाटकात त्यांच्या 'छापा'चे राजकारण चालवलेले आहे.

यामध्ये ते कुणालाही जुमानत नसल्याचे अनेकवेळेस स्पष्टही झाले आहे. त्यामुळेच त्यांना अद्याप मंत्रिमंडळ विस्ताराला परवानगी मिळताना आढळत नाही.

तरीही त्यांनी अलीकडेच 'काहीही होवो, मंत्रिमंडळ विस्तार झाल्याखेरीज राहणार नाही' अशी गर्जना केलेली आहे.

येद्युरप्पा त्यांच्या या एककल्ली राजकारणामुळे केंद्रीय नेतृत्वाला फारसे प्रिय नाहीत हे एव्हाना स्पष्ट झालेले आहे. त्यामुळेच येद्युरप्पा यांनी त्यांच्या भावी राजकारणाची आणि राजकीय वारसदारांचीही योग्य सोय करुन ठेवलेली आहे. त्यांचे मोठे चिरंजीव राघवेंद्र हे लोकसभेचे सदस्य आहेत. तर धाकटे विजयेंद्र हे कर्नाटक भाजपचे उपाध्यक्ष आहेत.

येद्युरप्पा हे कर्नाटकाचा कारभार त्यांच्या मनाप्रमाणे चालवीत आहेत.

अलीकडेच त्यांच्या कुटुंबियांची म्हणजेच एक चिरंजीव व नातू यांच्या आर्थिक गैरव्यवहाराची काही प्रकरणे एका वृत्तवाहिनीने उघडकीस आणली.

त्याबरोबर संतापलेल्या येद्युरप्पा यांनी त्या वृत्तवाहिनीच्या कार्यालयावर छापे टाकून त्यांची सर्व उपकरणे जप्त करुन त्यांचे प्रसारण व कामकाजच बंद करुन टाकले आहे.

आता या वृत्तवाहिनीने कोर्टाकडे दाद मागितली आहे. परंतु हा एक पायंडा पडताना दिसतो.

उत्तर प्रदेश, कर्नाटक, ही त्याची ठळक उदाहरणे आहेत.

आंध्र प्रदेशात तर न्यायालयानेच माध्यमांवर काही उच्चपदःस्थांच्या गैरव्यवहाराच्या बातम्या प्रसिध्द न करण्याचा आदेश दिला आणि वृत्तपत्र व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटला आहे. याचे कारण काय? तर असे सांगितले जाते की एका बड्या न्यायाधीशाच्या कुटुंबियांची नावे त्या गैरव्यवहारात आल्याने हायकोर्टाने हा बंदीहुकुम म्हणे जारी केला.

या देशात कायद्याचे राज्य राहिले आहे काय असा प्रश्न आता पडायला लागतो!



# मौनं सर्वार्थ साध्यते!!

मौन धारण केल्याने सर्व गोष्टी आपोआप साध्य होतात असे म्हणण्याचा जुना प्रघात आहे. एखाद्या गोष्टीवर मौन पाळणे म्हणजे कुणीही त्याचा अर्थ सोयीप्रमाणे घेऊन स्वतःचे समाधान करुन घेऊ शकतात.

देशाच्या नेतृत्वाचेही काहीसे तसेच आहे.

उत्तर प्रदेशातल्या हाथरस येथे एका दलित मुलीवर सामूहिक बलात्कार झाला व अत्याचारामुळे तिचा मृत्युही झाला. लागोपाठ बलरामपूरमध्ये हुबेहूब अशीच घटना घडली. दलित महिला - सामूहिक बलात्कार आणि अत्याचाराने मृत्यु!

हीच घटना विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यात घडली असती तर एव्हाना केंद्रीय गृहमंत्र्यांनी त्या राज्यांच्या राज्यपालांकरवी अहवाल मागून घेतला असता आणि



राज्य सरकारकडे जाब मागितला गेला असता. याच्याच जोडीला सत्तापक्षाच्या प्रचारकी टोळ्या आणि पाळीव मीडियाने ते राज्य सरकार, तेथील मुख्यमंत्री व तेथील सत्तारूढ पक्ष यांच्याविरोधाच खोट्यानाट्या प्रचाराची मोहिम सुरु केली असती.

पण आश्चर्य हे की कोणत्याही मीडियाने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कारभारावर काहीही टिप्पणी केलेली नाही.

आदित्यनाथ हे तोंडसुख घेण्यात पटाईत आहेत पण आता त्यांची




दातखीळ बसलेली आहे.

पंतप्रधानांची तर ही गेल्या सहा वर्षांची खासियत किंवा विशेष 'स्टाईल' राहिली आहे की अडचणीच्या मुद्यांवर ते सोयीस्कर मौन बाळगून राहतात.

अन्यथा विरोधी पक्षांवर अगदी भान सोडून ते तुटून पडत असतात.

केंद्रीय गृहमंत्री सध्या आजारी आहेत त्यामुळे बहुधा ते फारसे काही बोलण्याच्या अवस्थेत नसावेत.

परंतु आजारातून उठल्यावर ते प्रथम पश्चिम बंगालला जाणार आहेत. कारण तेथील ममता बॅनर्जी यांचे सरकार त्यांच्या नजरेला खुपते आहे. परंतु उत्तर प्रदेशाबाबत ते अगदी गपचूप बसून आहेत.

विशेष म्हणजे राज्यसभेतल्या गोंधळानंतर विरोधी पक्षांवर मनसोक्त तोंडसुख घेण्यासाठी नेमलेली केंद्रीय मंत्र्यांची टोळी हाथरस घटनेनंतर गायब झालेली आहे. घमेंडखोर भावनांनी चेहरा ओतप्रोत भरलेले जे काही मंत्री चेहरे या सरकारमध्ये आहेत व त्यांनाच अशा कामांसाठी खास पाचारण केले जाते. पण आता ते तोंड लपवीत आहेत.

थोडक्यात सांगायचे झाल्यास गुप्तता, मौन ही या सरकारची काही विशेष लक्षणे आहेत.

●●●

# Best Compliments

# प्रकाश गजभिये यांनी घेतली बलात्कार पीडीत नातेवाईकांची भेट



मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व आमदार प्रकाश गजभिये यांनी उत्तरप्रदेशमधील हाथरस येथील पीडीत मुलीच्या घरी जाऊन नातेवाईकांचे सांत्वन केले व धीर दिला. उत्तरप्रदेशमधील हाथरस येथील बुलगडी गावात फिरुन सर्व जागेची पाहणी आमदार प्रकाश गजभिये यांनी केली व एसडीओ प्रेमप्रकाश मीना, एडीएम जे.पी. सिंग यांना भेटुन आरोपींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली.

पीडितेच्या घराजवळच आरोपींचे घर असल्याने पीडीत मुलीच्या नातेवाईकांच्या जीविताला धोका निर्माण झालेला आहे म्हणून पोलिस संरक्षण देण्यात यावी अशी मागणीही आमदार प्रकाश गजभिये यांनी केली. दरम्यान चांडप्पा पोलिस हाथरस येथे जावून नराधमाना फाशीची शिक्षा द्यावी म्हणून आमदार प्रकाश गजभिये यांनी निवेदन दिले.

# कोरोनाने मृत्यू झालेले राष्ट्रवादीचे कर्मचारी गौतम जाधव यांच्या पत्नीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ५ लाखाचा धनादेश सुपूर्द



मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालयीन कर्मचारी गौतम जाधव यांचा कोरोनाने मृत्यू झाला होता त्याबद्दल राष्ट्रवादीच्यावतीने त्यांच्या पत्नीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज ५ लाखाचा धनादेश देण्यात आला. याशिवाय बदलापूर नगर परिषदेचे नगरसेवक आशिष दामले यांनीही गौतम जाधव यांच्या पत्नीला १ लाखाचा धनादेश देवून मदतीचा हात पुढे केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री जयंत पाटील, कोषाध्यक्ष हेमंत टकले,प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष सूरज चव्हाण उपस्थित होते.

Best

Compliments

# मानसिकता पुनरागमनाची


(पान ४ वरून)

मनात होते. मा. पवार साहेबांनी तीनही पक्षांची मोट तर उत्तम व भरभक्कम, मजबुतीने बांधली. त्यामुळे कुणी कितीही काहीही सांगू द्या आमचे महाआघाडीचे सरकार व्यवस्थितपणे पाच वर्ष पूर्ण करणार आहे. याचा अंदाज आल्याने आणि तशी खात्री पटल्याने आता विरोधात राहून काहीही उपयोग नाही. मूळ प्रवाहात परत गेले पाहिजे असा विचार करुन असंख्य लोक राष्ट्रवादीमध्ये येऊ लागले आहेत. येण्यास इच्छुक झाले आहेत. काही लोक येण्यासाठी खूप आसुसलेलेही आहेत पण त्यांना अडचणी आहेत. राष्ट्रवादीत येणाऱ्यांची संख्या नेहमीच मोठी व जास्त राहिली आहे. कारण पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदरावजी पवार यांनी जनतेचा, नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा मोठा विश्वास संपादन करुन त्यांना नेहमीच मान-सन्मानाची वागणूक दिली आहे व प्रत्येक कामात मनापासून मदत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहेबांनी अनेकांच्या समस्या व दुःखे दूर करुन प्रश्न सोडविले आहेत. निःस्वार्थ भावनेने काम करणारा पवार साहेबांसारखा नेता मिळणे ही फार दुर्लभ गोष्ट आहे. राजकीय मतभेद विसरून ते समोरच्या माणसाला मदत करतात. संकटसमयी स्वतः होऊन धावून जातात. म्हणून ते अजात शत्रू आहेत. त्यांचे हे बेरजेचे राजकारण आता विशेषतः तरुण युवकांनाही आवडू लागले आहे. त्यांना ते चांगल्या पद्धतीने समजू-उमजू लागले आहे. त्यामुळे चार कामे नाही झाली तरी चालतील; पण आपल्या नेत्याचा, मा. पवार साहेबांचा हात आपल्या पाठीवरुन फिरला पाहिजे, त्यांनी आस्थेने आपली चौकशी केली पाहिजे अशी आशा व अपेक्षा कार्यकर्त्यांच्या मनात घर करुन आहे. कार्यकर्त्यांच्या संवेदना व मन समजून घेऊन त्यांना सन्मानाची वागणूक देणारा व खऱ्या अर्थाने लोकशाहीचे संगोपन करणारा राष्ट्रवादी काँग्रेस सारखा दुसरा पक्ष अपवादानेच आढळेल. कार्यकर्त्याला मनमोकळेपणाने राष्ट्रवादीतच बोलू दिले जाते. त्याचे म्हणणे ऐकून घेतले जाते. हेच जिवंत लोकशाहीचे लक्षण आहे. पक्षाने व नेतृत्त्वाने ते जाणीवपूर्वक जोपासलेले आहे. म्हणून राष्ट्रवादीत येण्याची ओढ व आस नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये वाढीला लागलेली आहे.

पक्षाने ज्यांना पदे व जबाबदारी दिलेली आहे त्यांनी ती प्रामाणिकपणे पार पाडावी अशी अपेक्षा आहे. पदे नुसती मिरविण्यासाठी व मोठेपणाकरिता नसतात. सर्वसामान्य गोरगरीबांची सेवा करुन ते पद आणि त्याची विश्वासार्हता व उंची कामातूनच वाढवायची असते.



आता कोरोनाचे संकट आहे. म्हणून पदाधिकारी कदाचित हिंडू शकत नसतील पण हे संकट संपल्यावर व लॉकडाऊन उठल्यावर पक्ष बांधणी व विस्ताराच्या कामासाठी सर्वांना घराबाहेर पडावेच लागेल. आम्हीही महाराष्ट्रभर फिरुन पक्ष उभारणी पुन्हा जोमाने करणारच आहोत. या कामात सर्व नेते व कार्यकर्त्यांनीही मनापासून सहभागी व्हावे आणि आपल्या पक्षाला पूर्वीसारखेच प्रथम क्रमांकावर नेऊन गतवैभव त्याला प्राप्त करुन द्यावे एवढीच कळकळीची विनंती करुन थांबतो.



# अहिंसेची ऐसीतैशी

(पान ५ वरून)

माध्यमातून पाहिली आहेत. हे सगळे घडले ते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आदेशानुसार असे आता कारवाई ज्यांच्यावर झाली ते अधिकारी सांगत आहेत. खरे खोटे चौकशीत बाहेर येईल अशी आशा करुया. पण सत्य जनतेसमोर येईलच याची खात्री देता येत नाही कारण उत्तरप्रदेशामध्ये आणि केंद्रात भाजपचेच सरकार आहे आणि 'उंदराला मांजर साक्ष' ही म्हण आपल्या सर्वांच्या परिचयाचीच आहे. 'अहिंसा दिना'च्या आदल्या रात्री ही हिंसा घडावी हा महात्म्याच्या विचारांना काळीमा आणि फासलेला हरताळ व विरोधाभास तर आहेच पण 'योगी' सत्तेचा कसा 'भोगी' झाला आहे याचेही ते निदर्शक आहे. हाथरस पाठोपाठ उत्तरप्रदेशातील बलरामपुरातही एका २२ वर्षीय दलित तरुणीवर सामुहिक बलात्कार होऊन तिला अमानुष मारहाण केल्याची व त्यातच तिने तडफडून प्राण सोडल्याचीही भयंकर घटना घडली आहे. बलात्कार करणाऱ्यांना वाचविण्यासाठी योगी सरकारने जो आटापिटा चालविलेला आहे ते पाहता हे खरोखरच त्यागी नसून 'भोगी' सरकार आहे असे म्हटले तर त्यात काही चूक आहे असे वाटत नाही.



एकीकडे महात्माजींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा उदोउदो करायचा आणि गांधींच्या भूमीतच जन्मलेलो असल्यामुळे गांधी विचार व तत्वज्ञानाचा आपणच पाईक असल्याचा खोटा आव आणायचा व प्रत्यक्षात कृती मात्र उलट दिशेने करायची असेच आजचे मोदी सरकारचे धोरण आहे. सत्तेवर आल्यापासून त्यांनी धर्म, अहिंसा, लोकशाही, समानता, स्वातंत्र्य, बंधूता या सर्वांबद्दल केलेली वक्तव्ये आणि प्रत्यक्ष घेतलेले धोरणात्मक निर्णय यात प्रचंड विरोधाभास आहे. एक प्रकारे अहिंसेची राष्ट्रप्रमुखाने ऐसीतैशी करावी आणि ती करणाऱ्यांबद्दल मूक मौन बाळगून त्यांना अप्रत्यक्षरीत्या पाठिंबाच द्यावा याचे हे उत्तम उदाहरण आहे. अंगावर येणाऱ्या व सोयीच्या नसलेल्या अनेक प्रश्नांबाबत 'नमो' मौन बाळगतात हा गांधी विचारांना मूठमाती देण्याचाच प्रकार नाही का ?

स्वतः महात्मा गांधींनी अहिंसेबद्दल असे लिहिले आहे, ''ज्या वेळेस एखादा माणूस असा दावा करतो की मी अहिंसक आहे, तेव्हा ज्याने त्याला दुखावले असेल त्याच्यावर सुद्धा तो रागावणार नाही अशी अपेक्षा असते. तो त्या माणसाचेही अहित चिंतणार नाही. उलट कल्याणच चिंतीत असतो. तो त्याचा तिरस्कार करीत नाही किंवा त्याला शारीरिक इजा करु इच्छित नसतो. दुष्कृत्य करणाऱ्याने त्याला जे दुःख दिले असते, ते दुःख तो निमूटपणे सहन करतो. अशा तऱ्हेने अहिंसा म्हणजे संपूर्ण निष्कपटपणा होय. जीवमात्राबद्दल दुर्भावनेचा पूर्ण अभाव म्हणजे पूर्ण अहिंसा होय. ... मनुष्य केवळ निष्कपट व्यक्तिमत्व अंगी बाणण्याने दैवी ठरत नाही. मात्र, त्यानंतर तो खरा माणूस होतो. ... आपण कोणताही धर्मग्रंथ उघडून पाहिल्यास आपणास दिसून येईल की जशास तसे वागून सूड घेण्याची वृत्ती आवश्यक मानली गेली, बंधनकारक नाही. त्याची फक्त परवानगी दिलेली असते. संयम पाळणे हेच खरे आवश्यक मानले गेले असते. जशांस तसे वागणे नियमांच्या चौकटीत बसवावे लागते. संयम हा आपल्या जीवनाचा मूळ नियम आहे. सर्वोच्च पूर्णत्व प्राप्त करुन घेण्यासाठी सर्वोच्च संयमाची गरज असते. सहनशीलता हेच खरे मानवजातीचे लक्षण होय'' (महात्मा गांधी, 'हिंदू धर्म म्हणजे काय', अनुवादक – तारा धर्माधिकारी : प. आ. १९१७, शे. आ. १९९५, पान –८०).

हाथरस पीडित तरुणीच्या कुटुंबाला भेटण्यासाठी व त्यांचे सांत्वन करण्यासाठी पोलिसांनी राजकीय नेते व प्रसार माध्यमांच्या सर्व प्रतिनिधींसह सर्वांना रोखून धरणे व हाथरसच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पीडित कुटुंबालाच धमकी देणे ही काय अहिंसा आहे का ? अहिंसा आणि शांततामय आंदोलनावर भर देण्याच्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सूचनेचीही आपण कशी वासलात लावली याचे हे उत्तम उदाहरण आहे. स्वतःला महात्म्यांचा शिष्य म्हणून घेणाऱ्या शिष्यानेच गुरूचा केलेला हा पराभव आहे !

# राष्ट्रवादीने केली देशातील पहिल्या 'एलजीबीटी' सेलची स्थापना

# राज्यप्रमुखपदी प्रिया पाटील यांच्या नावाची घोषणा



मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेसने आज देशातील पहिला 'एलजीबीटी सेल' स्थापन केला असून या सेलच्या अध्यक्षपदी प्रिया पाटील यांची नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जाहीर केली.

राष्ट्रवादीने देशात पहिल्यांदा युवती संघटनेचा प्रयोग केला आणि आता 'एलजीबीटी सेल' स्थापन करुन या वंचित समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले. समाजात एलजीबीटी लोक चौकटीत यायला बघत असतात. त्यांना समान वागणूक दिली पाहिजे. याचा विचार राष्ट्रवादीने केला आहे शिवाय राष्ट्रवादीने निवडणूक काळात जाहीर केलेल्या जाहीरनाम्यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे पाऊल टाकले आहे असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. एलजीबीटी सेलची आज स्थापना झाली असून प्रिया पाटील आणि त्यांच्यासोबत काम करणारे १४ जण प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या खात्यांतर्गत एलजीबीटी वेल्फेअर बोर्डसाठी प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला जात आहे.यातून योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल शिवाय आम्ही निवडणूक काळात जाहीरनाम्यात जे काही जाहीर केले आहे. त्याची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले. यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे आणि प्रिया पाटील यांचे जयंत पाटील यांनी अभिनंदन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस असा पक्ष आहे ज्याने युवती संघटना स्थापन केली आणि आता 'एलजीबीटी' सेलची स्थापना करत आहे. देशातील असा पहिला पक्ष आहे. जो भाषणापुरता नाही तर कृती करणारा पक्ष आहे असे मत राष्ट्रवादीच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी यावेळी व्यक्त केले. मिशन मोडमध्ये वेल्फेअर बोर्ड सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आला आहे असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

प्रिया पाटील यांनी एलजीबीटी का स्थापन करण्यात येत आहे याची माहिती दिली शिवाय आपण काय करणार आहोत. आपण आजही अधिकारापासून कसे वंचित आहोत हे सांगतानाच राष्ट्रवादीच्या माध्यमातून आपल्याला हा अधिकार मिळवून द्यायचा आहे अशी भूमिका स्पष्ट केली.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी 'एलजीबीटी सेल' च्या राज्यप्रमुखपदी प्रिया पाटील यांची नियुक्ती जाहीर केली. या सेलची इतर कार्यकारिणी खालीलप्रमाणे उपाध्यक्ष अनिता वाडेकर, जनरल सेक्रेटरी - माधुरी सरोदे - शर्मा, स्नेहल कांबळे, सेक्रेटरी - उर्मी जाधव, सुबोध कासारे, कोषाध्यक्ष - सावियो मास्करीनास, सदस्य - अभिजित ठाकूर, प्रियुष दळवी, श्रेयांक आजमेरा, साहिल शेख, साध्य पवार, रोहन पुजारी, दिव्या लक्ष्मनन आदी.

●●●

**शेवटचे पान**



# अजरामर ग. दि. माडगूळकर

१ ऑक्टोबर, 'महाराष्ट्राचे वाल्मिकी', 'गीत रामायण'कार गदिमांची जयंती. माझ्या दिवसाच्या सकाळची सुरुवात आजही एफएम रेडिओवर मराठी गाणी ऐकताना होते. दिवस पूर्ण उजाडलेलासुद्धा नसतो आणि अचानक गदिमा येतात 'जगाच्या पाठीवर'. मराठी सिनेमाच्या बहाराच्या काळात एक मस्त जमून आलेलं त्रिकुट, गीते – गदिमा, संगीत – सुधीर फडके (म्हणजे बाबूजी), आणि दिग्दर्शक व प्रमुख भूमिका – राजा परांजपे.




आत्ताच्या पिढीला ही नावे नवलाईची वाटणार नाहीत, पण आम्ही सगळे दोस्त मॅट्रिकच्या उंबरठ्यावर, म्हणजे त्यावेळच्या अकरावीच्या उंबरठ्यावर उभे होतो, तेंव्हा या तिघांनी आमच्यावर जादू केली होती. तसं हिंदी चित्रपटही चिक्कार बघायचो. अधून-मधून काही विशिष्ट दृश्यांसाठी न कळणाऱ्या इंग्रजी सिनेमाकडे सुद्धा पावलं वळायची. साधारण १९६० साली या तिघांचा चित्रपट झळकला "जगाच्या पाठीवर. शाळकरी वयात खूप आवडलेला, इमोशनली खूप डिस्टर्ब करणारा. त्यातली सर्वं गाणी तोंडपाठ. एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे, जर तारी हे वस्त्र मानवा तुझिया आयुष्याचे, किंवा, जगं हे बंदिशाला, ज्याची त्याला प्यारी कोठडी, कोठडीतले सखे सवंगडी प्रिय हो ज्याचे त्याला, जगं हे बंदिशाला', किंवा, नाही खर्चीली कवडी-दमडी, नाही वेचला दाम, विकत घेतला शाम, बाई मी विकत घेतला शाम'. त्या काळी ही गाणी मुंबई आकाशवाणीच्या ब केंद्रावरून "आपली आवड" या कार्यक्रमातून आठवड्यातून एकदा भेटीला यायची रात्री. सोपी चाल, साधे-सोपे शब्द, पण अर्थ कळण्याचं तेंव्हा वयही नव्हतं. पुढे मोठे होत जाताना प्रत्येक दशकानंतर या गाण्यांचं आणखीनच अपरूप वाटू लागतं. ही गाणी तशी प्रेमाची नव्हती, विरहाची तर नव्हतीच नव्हती, किंवा खूप निसर्ग वळणाचीही नव्हती. त्याचा अर्थ काळानुसार बदलत गेला आणि जाणवलं काय, ताकद होती त्या गाण्यांच्या शब्दांची. आयुष्याची फिलॉसॉफी सांगणारी ही गाणी. प्रत्येकाचं आयुष्यं आरशात बघितलं की परत आपल्याला एका सुखाच्या धाग्यासाठी आपण आयुष्यभर किती धडपडत असतो, शंभर दुःखाचे धागे विणल्यावर कुठेतरी एक सुखाचा धागा हाती लागत असतो. पण त्यासाठी प्रामाणिकपणा हवा, कष्ट हवे, अहंकार नसावा; काय काय सांगून जातो हा गीतकार. माणसाच्या आयुष्याची जरतारी वस्त्र जो तो कोण जगनियंता विणकर आहे ना, त्याचे हात आपल्याला दिसत नाहीत, सिनेमात मात्र ते दृश्य राजा परांजपे हातमागावर वस्त्र विणतायेत, आणि त्यांच्या हातांची लयबद्ध हालचाल सुरु आहे आणि आयुष्याचं वस्त्र आकार घेऊ लागतंय. प्रत्येकाचा जीवनपटच येतो या गाण्यामध्ये. "मुकी अंगाडली बालपणाची, रंगीत वसने तारुण्याची, जीर्णसार मग उरे शेवटी, लेणे वार्धक्याचे.

तीन अवस्था माणसाच्या जीवनातल्या, लहानपण, तरुणपण आणि वार्धक्य. अहो थेट कबीराच्या पंगतीत नेऊन ठेवणारं हे काव्यं. कबिरासारखच गदिमा आपल्याला सावध करतात; पांघरसी जरी असला कपडा, येसी उघडा, जाशी उघडा, कोणाला दिसले त्रिखंडात त्या, हात विनकऱ्याचे'. मित्रहो आत्ताच्या महामारीच्या काळात हे चिरंतन सत्य पुन्हा

आपल्यासमोर प्रकट होते.

जगाच्या पाठीवर मध्ये राजा परांजपे जेलमध्ये जातात आणि जेल हेच त्याचं जग होतं. आता आपण स्वतःला क्वारंटाईन करतो म्हणजे नक्की काय आहे? तेच तर ६० वर्षांपूर्वी गदिमा म्हणाले होते, जग हे बंदिशाला, ज्याची त्याला प्यारी कोठडी, कोठडीतले सखे सवंगडी प्रिय हो ज्याचे त्याला'. शेवटी सहजता, पावत, एकटेपणात सुद्धा होतो, म्हणून संपूर्ण जग हाच एक मोठा तुरुंग आहे. अहो केवढी भव्य प्रतिभा आहे. पुढे गदिमा म्हणतात, कुणी न येथे भला चांगला, जो तो पथ चुकलेला'. शेवटी माणूस म्हणून आपण ही जाणता-अजाणता चुका करत असतोच, पण या गाण्यांमध्ये आपल्याला चिंतनाला जागा असते. स्वतःला पुन्हा पारखून घेता येते. ही सगळी गीतं खरोखरी संत परंपरेतलीच आहेत. अहो साधा स्ट्रीट प्ले या "जगाच्या पाठीवर" सिनेमातला: एक दृष्टीबाधित महिला रस्त्यावर नाच-गाणं करणारी आणि तिचा फ्रेंड, फिलॉसॉफर, गाईड भक्तिरसाचा जीवन कलटत असतात, नाही खर्चीली कवडीदमडी, नाही वेचला दाम, विकत घेतला शाम, बाई मी विकत घेतला शाम". दमडा ही खर्च न करता मी माझा देव विकत घेतलाय. तो आता माझ्या हक्काचा आहे, कारण मी त्याची किंमत मोजली आहे, आणि किती आहे ती? - जन्मभरीच्या श्वासाइतके मोजियले हरीनाम'; माझ्या जगण्यातला प्रत्येक श्वास हा तो हरिनाम आहे, त्यामुळे शाम माझ्या हक्काचा आहे.

गदिमांनी गाणी रचावीत, बाबुजींनी संगीत द्यावं आणि राजाबाबुंनी ते चलतचित्र आपल्यासमोर साकार करावं, किती छान होतं नां हे सगळं? आता सर्वदूर भरून राहिलेला हिंसाचार, आचरट प्रेमाचे विचकट अविष्कार बघितल्यानंतर गदिमांच्या गाण्याचं मोल पुन्हा एकदा उमगतं. जसं या दिवसातही कधीतरी सकाळी एफएम रेडिओ लावावा आणि सुरुवात व्हावी घनश्याम सुंदरा श्रीधरा'. हे तर दिवस उजाडला जरी नसला तरी मनाला भरारी देणारा असतो, मग आपण सज्ज होतो आयुष्याच्या रोजच्या लढाईला. गदिमा, आज तुम्हाला पुन्हा एकदा दंडवत घालतोय, कारण गाणं म्हणजे आयुष्यं, गाणं म्हणजे मांगल्य, आणि गाणं म्हणजे सत्य, शिव आणि सुंदरही. ही जाण तुम्ही अनेक पिढ्यांना दिली, त्यातलेच आम्ही काही भाग्यवंत.





ग.दि. माडगूळकर


सुधीर फडके


राजा परांजपे